म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ९९५
IRBK-0100995

# म्राट



लेखक :-
शां. गो. गुप्ते

IRBK-0100995
IRBK-0100995

किंमत १२ आणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.
३०३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

Marathi Granth Sangrahalaya Thana
G.I.P. Railway

# संगीत शिवसम्राट

लेखक

श्री० शांताराम गोपाळ गुप्ते

'हिरा हरपला', 'रणरागिणी', 'ब्रह्मकौस्तुभ', 'दख्खनचा मोहरा', 'पेशवाईनंतर', 'सवता सुभा', 'वारांगना', 'रक्तध्वज', 'वेणुनाद', 'परीक्षा', 'सार्वभौम' वगैरे नाटकांचे कर्ते

[ सदर नाटकाचे चित्रपटादि सर्व हक्क ग्रंथकर्त्यांचे स्वाधीन आहेत.]

आवृत्ति पहिली

IRBK-0100995
IRBK-0100995

डिसेंबर सन १९३०

किंमत बारा आणे

प्रकाशक
बलवंत विष्णु परचुरे
परचुरे, पुराणिक आणि मंडळी, बुकसेलर्स
माधवबाग, मुंबई नं. ४

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार पुणें नं. २

Marathi Granth Sangrahalaya Thana

# समर्पण

कांट्याशिवाय गुलाबाला शोभा नाहीं; विरोधा-
शिवाय सिद्धीला गोडी नाहीं; विषाशिवाय
अमृताची थोरवी पटत नाहीं;–किंबहुना सुख-
दुःखाच्या संमिश्रणांतच मानवी जीवनाची
संभाव्यता आहे ! जी भावना गुलाबी गेंदा-
आड दडालेल्या कंटकमय परिस्थितीला
मखमाली मार्दव देते, विरोधी यातनां-
च्या विषाला जी मृदुल संवेदना
अमृताची गोडी आणते, दुःखनिश्वा-
सांनीं जडावलेल्या हृदयाचा भार,
उद्यांच्या अज्ञात आशेवर विसा-
वून हलका करते, ती दिव्य
भावना परिस्थितीचें बंधन
किती काल जुमानणार ?
अशी भावना कुठें उदित
झाली असेल का ?
असेल तर त्या प्रत्य-
क्षांतील गुलशन-
च्या प्रतिबिंबाला
हें गुलशनचें
आत्मदान
समर्पण !

# प्रस्तावना

“शिवसम्राट्” म्हणजे कल्पनेच्या पायावर उभारलेला एक पत्त्यांचा बंगला! ऐतिहासिक सत्यांच्या वाऱ्याची किंचित्सुद्धां झुळूक त्याला जमीनदोस्त करील! ऐतिहासिक व्यक्ति, कांहीं ऐतिहासिक सत्यांच्या गुंफणींत गुंतवून एका नाजूक प्रश्नाचा विचार करण्याचा प्रयत्न प्रस्तुत नाटकांत केलेला मार्मिकांना दिसून येईल! परंतु हा ‘गुलशन शिवाजी’चा काल्पनिक Romance केवळ कल्पनेंतही क्षणमात्र सहन न करणाऱ्या प्रेमळ इतिहासभक्तांना अलमगीरची ‘झेबू’—‘माझ्याकडे पहा’ म्हणून हटकल्याशिवाय राहाणार नाहीं!

सदर नाटकाचे प्रयोग सुप्रसिद्ध गायक श्री० **कृष्णराव शेंडे** यांनीं आपल्या **‘सरस्वती संगीत मंडळी’** कडून अत्यंत लोकप्रिय केले होते. परंतु त्यांच्यावर अकल्पित शारीरिक आपत्ति आल्यामुळें त्यांना रंगभूमीवरून विश्रांति घेणें भाग पडलें. परंतु श्री० **त्रिंबकराव धारणकर** यांनीं याच नाटकानें आपल्या गोमांतकीय बालनटांच्या **‘मोहन संगीत मंडळी’**ची सुरवात करण्याचें ठरवून त्याचा प्रथम प्रयोग तारीख ४।१०।३० रोजीं **पणजी** ( नवा गोवा ) येथें मनोहर सजावटीनें, अत्यंत सुव्यवस्थितपणें रंगभूमीवर आणला. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील प्रकाशक **‘परचुरे, पुराणिक मंडळी, मुंबई’** यांनीं धंद्यापेक्षां आपलेपणाकडेच विशेष लक्ष देऊन सदर नाटक, त्यांच्या आजपर्यंतच्या लौकिकास साजेशाच सुंदर स्वरूपांत बाहेर आणलें याबद्दल त्यांचे आभार मानण्यापेक्षां, हें आपलेपणाचें ऋण तसेंच वागवण्यांत लेखकाला आनंद होत आहे.

सातारा
ता. १।११।१९३०

सर्वांचा नम्र,
**शांताराम गोपाळ गुप्ते**

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. नं. २२५
ता. 22-2-39
ठाणे.

# शिवसम्राट्

[ गद्य-पद्यात्मक नाटक ]

[ जाळीदार पडद्यांतून छत्रपति शिवराय अश्वारूढ असून त्यांच्यावर देवांगना पुष्पमाला वहात आहेत व मार्गे कैलासाधिपति शंकर त्यांना आशीर्वाद देत आहेत असा देखावा.]

## मंगलाचरण

पद १ लें. [ राग—सोहा, एका ]

आमोद भरला मनिं । अविरत अजि या सुगानीं ।
प्रकटे शिव-नृपति-कवनिं । वाग्देवी मानी ॥ ध्रु० ॥
धारि निटिलीं चंद्रकोर । नीलकंठ उरग-पाल । झणिं
करि शिव शांत जनां । वारुनि संकर हा ॥ १ ॥

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[स्थळ—**विजापूर**-दरोग्याची राई. घाबरलेली **गुलशन** व **गजरा** प्रवेश करतात.]

**गुलशन**—काय म्हटलंस गजरा ? ते मराठेच दिसतात ! आणि त्यांचा रोंख आपल्याकडेच आहे ?

**गजरा**—खात्रीनं मालिक. ते पहा त्या झाडाखालीं. त्यांना दाढ्या मुळींच नाहींत नी त्यांचा इरादासुद्धां खात्रीनं दग्याचा दिसतो ! त्याशिवाय ते इतके बेफाम नसते. आपले भाईसुद्धां-ते पहा-घाबऱ्या घाबऱ्या परत दौडूं लागले ! काय होणार खुदाला माहीत !

**गुलशन**—खुदावर विसावण्याची ही वेळ नाहीं. साऱ्या औरतशाहीचा इतबार राखण्याचा विडा उचललेले मराठे, आपल्यावर चवताळले याचं कारण बाबांचा कसाईखाना ! गजरा, आल्या प्रसंगाला तयार झालंच पाहिजे !—

पद २ रें. [राग-मांड, अर्धा घुमाळी]

**काल सखी ! खल आला । बंधन दारुण झाला ॥ ध्रु० ॥ फिरला तारा । नशिबा आला । सौख्य गमे विलयाला ॥ १ ॥**

ते पहा, इकडेच दौडूं लागले ते—

[घाबरलेले भोई प्रवेशतात.]

**एक भोई**—मालिक, एकदम मेण्यांत घुसा. बुरा वख्त गुदरला आहे आज—

**गुलशन**—मेरे भाई हो, जिवाची निगा न धरतां दुष्मन रोंखून धरा ! तुमच्या लडकी तुमच्या बरोबर आहेत हें विसरूं नका ! माझ्या अब्रूची लाज तुम्हांला आणि तुमची लाज त्या इलाहीला !

**एक भोई**—हुजूर, गर्दन जाईपर्यंत दुष्मन आपल्याकडे फिरकणार नाहीं ! आपण मेणा मात्र सोडूं नका.

**गुलशन**—अल्ला तुम्हांला जरूर यश देईल.

(दोघी मेण्यांत बसतात; भोई मेण्याभोंवतीं उभे राहातात.)

**विसाजी**—[ कांहीं जवानांसह प्रवेशून ]–कुठं–कुठं आहेत त्या पोरी ? आतां इथं होत्या ! काय ही लबाडी ? चला, मेण्याला गराडा घाला.

**भोई**—खबरदार !

**विसाजी**—पोरी हातीं देतां कीं नाहीं ?

**भोई**—नहीं, एकदम नहीं !

**विसाजी**—बेमुर्वत हरामजाद्या, कुणापुढं हें बोलतोस ? सरदार विसाजीपुढं ! एक शब्द न बोलतां त्या मुसलमान पोरी स्वाधीन कर. नाहीं तर—

**एक भोई**—नाहीं तर !—नाहीं तर काय होणार ?

**विसाजी**—नाहींतर तरवार चालेल; या घडीला मुडदे पडतील.

**एक भोई**—या जिवंत हाडांचा पाहरा या मेण्याभोंवतीं असतांना काय मगदूर आहे तुझी या मेण्याकडं फिरकण्याची ?

**विसाजी**—वैसी बात ? (लढूं लागतात.)

**गुलशन**—( एकदम मेण्यांतून बाहेर पडून ) हां—ठेरो; भाई, परवरदिगारकी कसम ! ठेरो ! विसाजी, एकाकी मुसलमान लडकीवर गर्दी करणं आपल्यासारख्या मराठी सरदाराला साजून दिसतं का ? विसाजी, तुमच्या लडकीवर—

**विसाजी**—लडकी ? माझीच लडकी कशाला ? छोरी, माझ्या हिंदी बांधवांच्या किती पोरी तुमच्या सुलतानीं दंडेलीला आजवर बळी पडल्या असतील ? आमच्या किती बायाबापड्यांची अब्रू तुझ्या भाईबंदांनीं दिवसाढवळ्या राजरोस लुटली असेल ?

**गुलशन**—म्हणून आपण आपल्या अब्रूला विसरून, आपल्या लौकिकाला पायांखालीं तुडवून आज असे राक्षस होतां ? हिंदूंच्या ताज कीर्तीला काळोखी आणतां ? विसाजी, एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं तिचं वांसरूं कापावं ?

**विसाजी**—अल्बत् ! 'इस हाथ दे इस हाथ ले !' या हाताचे झाडे या हातावर द्यावे लागतात, हा जगाचा नियम आहे !

**गुलशन**—किती नीच विचारसरणी ही ! शहाजीराजांचे भाईबंद इतके नीच !

**गजरा**—उगीच नाहीं गुलाबसाहेब त्यांचा इतका द्वेष करीत !

**विसाजी**—कोण ? त्या गुलाबची मुलगी ? वारे तकदीर ! किती विलक्षण योगायोग ! या विसाजीला कसअस्सल समजणाऱ्या कसायाची छोरी !–गुलशन,

दगडाचे देव बनविण्याचे धडे आम्हां हिंदूंकडून तुम्ही केव्हां घ्याल तेव्हां घ्या; पण मानवी देवमूर्तींचा, दगडी दिलाचा कसाई करण्याची तुमची कला,-माझ्यासारखा किती पूर्णत्वानं उचलतो तें तुला आतांच दिसेल! चला-एकदम या पोरींना गिरफदार करा.

गुल्शन—जान सलामत असे तों ही गुल्शन अनीतीची बंदिवान् होणार नाहीं!-चलो, मेरे भाई हो, इसी वख्त कूच करो. (मेण्याकडे जाऊं लागते.)

विसाजी—खबरदार पुढं पाऊल टाकशील तर—

गुल्शन—( भोई लोकांस ) चलो-भाई, चलो—

विसाजी—पाहातां काय? व्हा पुढें आणि पकडा त्या हरामखोरांना—

( विसाजीचे लोक पुढें होतात.)

गुल्शन—खुदा-परवरदिगार-मेरी आबरू तुमारी मेहेर-

विसाजी—विसर आतां त्या खुदाला! या तरवारींच्या काटाकाटींतून वांचल्यावर मग खुदाचं नांव!-( विसाजीचे लोक गुल्शन व गजरा यांना कैद करतात.) बोल, कोणता खुदा तुला आतां सोडवणार?

गुल्शन—सैतान, हिंदु-मुसलमीनका मालिक! इस दुनियाका जहांपनाह!-

शिवाजी—(प्रवेशून)-हा शिवाजी! हिंदुत्वाचा अभिमानी हा शिवाजी—

पद ३ रें. [ राग-भूप, त्रिताल ]

**धावे या देव लोकां ॥ ध्रु० ॥ शिव-कर जगिं मिरवित**
**जया; दया न त्या। नया, लया न ने। सुखें हा;। हत**
**बलता। महाबला। खला ॥ १ ॥**

सोडा, या निरपराध स्त्रियांना एकदम सोडून द्या. या शिवाजीचा तुम्हांला हा हुकूम आहे—

(विसाजीचे लोक दोघींना सोडून शिवाजीला मुजरे करून दूर उभे राहातात.)

विसाजी—हुकूम! बाप हुकूम करतो म्हणून बेटाही हुकूम करूं लागला! अरे-माझेच लोक दगाबाज! खाल्ल्या मिठावर उलटणारी अवलाद—

एक शिपाई—खात्रीनं मराठ्याची नव्हे!-पण तें खाल्लं जाणारं मीठच जर असं कमजात असेल तर कोणताही जातीचा मराठा, त्या मिठाला असा कायमचा राम राम ठोकील!!



शिवाजी—स्त्रियांच्या आशीर्वादांत दैवी कल्याणाचें अधिष्ठान असतें; पण तळतळाटांत ब्रह्मांडाचा प्रलय असतो !

अंक १ ला—पान ५०

**शिवाजी**—शाबास रे जवान ! हिंदूंना स्त्रियांसारखं दैवत नाहीं ! स्त्रियांच्या आशीर्वादांत दैवी कल्याणाचं अधिष्ठान असतं; पण तळतळाटांत ब्रह्माण्डाचा प्रलय असतो !

**विसाजी**—भोंसले, आपल्यासारख्या परकी अज्ञानानं या नसत्या उठाठेवी करण्याचं कांहींच कारण नाहीं ! आपली कक्षा मासाहेबांच्या पदराबाहेर गेली असली म्हणून ती विजापूरच्या वेशीला येऊन भिडली, असं समजूं नका ! राजकारण तुम्हांला अजून समजायचं आहे !

**शिवाजी**—राजकारण ! विसाजी, शरम नाहीं वाटत हे शब्द उच्चारायला ! निरपराध, निष्पाप स्त्रियांना छळण्यांत कोणतं राजकारण तुम्ही साधणार ! राजकारणाच्या नांवाखालीं प्रत्यक्ष माझे भाईबंद-स्वतःला अभिमानानं हिंदू म्हणवून घेणारे-विसाजी, -तुमच्यासारखे नीतिभ्रष्ट-माझे धर्मबंधु असले, तरी असल्या नीच कृत्याबद्दल ते या शिवाजीचे जन्माचे हाडवैरी होतील !

**विसाजी**—बस्स, अधिक भडकलांत तुम्ही ! एकदम दूर व्हा. दुसऱ्या-करितां आपल्याच लोकांशीं विरोध करणं मासाहेबांना पसंत पडणार नाहीं !

**शिवाजी**—पण मासाहेबांच्या कीर्तीकरितां, या देहांत जीव आहे तोंपर्यंत हा विरोध मला केलाच पाहिजे ! मासाहेबांच्याच पदराची आण घेऊन, अबलेचा पदर सांवरण्याची ही मीं प्रतिज्ञा केली आहे ! हें कृत्य मासाहेबांना पसंत पडणार नाहीं ! गोष्टच नको ! जी गोष्ट सर्वसाक्षी देवाला पसंत, ती मासाहेबांना पसंत असलीच पाहिजे ! स्त्रियांची अब्रू विसरण्याइतकी मासाहेबांची वृत्ति नीच नाहीं समजलांत ? चला, विसाजी ! स्त्रीजातीची अब्रू उघडी करणाऱ्याच्या चामडीचा पदर सोलून, तो त्या अब्रूवर घालण्याकरतां, तुमच्या पापी इच्छेशीं मरेपर्यंत विरोध करायला हा शिवाजी तयार आहे ! (तरवार उपसतो.)

**विसाजी**—पण भोंसले, जे आपल्या स्त्रियांची उघड उघड विटंबना करतात, त्यांच्याकरतां जिवावर उदार होणं शहाणपणाचं नाहीं !

**शिवाजी**—कुणाच्या-कुणाच्या तोंडून हे शब्द निघतात ? विसाजी, तुमच्या ? एका हिंदूच्या ? तुमच्या हिंदू स्त्रियांची बेअब्रू झाली म्हणजे तुम्हांला चीड येते; पण या गरीब परक्या पोरीला छळतांना तुम्हांला उत्साहाच्या उकळ्या येतात ! विसाजी, तुम्हांला आई होती ? निदान पत्नी तरी आहे ना ? मग बोला, तुमच्या

मातेची, तुमच्या पत्नीची अशीच छळणा जर परक्यानं केली तर तुम्हांला आनंदच होईल का ? विसाजी, तुमच्या मातेच्या व तुमच्या पत्नीच्या स्त्रीपणांत आणि या गरीब परक्या पोरीच्या स्त्रीपणांत काय फरक ?

**विसाजी**—(स्वगत) शब्दाला शब्द वाढवूं कीं मार्गांत येणाऱ्यांना सरसहा खतम् करूं ? मनाची धडाडी जिरवणारे हे अडथळे ठोकरीनंच दूर केले पाहिजेत ! ( उघड ) बस्स ! भोंसले, हा नसता वितंडवाद मुळींच नको ! प्रत्यक्ष शहाजीराजे जरी आडवे आले तरीसुद्धां मी माझा मनसुबा बदलणार नाहीं !

**शिवाजी**—तर मग राजांना न जुमानणारं मस्तक धडावर राहायला मुळीं योग्यच नाहीं !

( शिवाजी व विसाजी लढतात; विसाजीची तरवार निसटते व शिवाजी हातावर वार करतो.)

पकडा या हरामखोराला-राजांच्याकडे मोठ्या बंदोवस्तानं घेऊन चला. ( विसाजीचेच लोक विसाजीला पकडतात.)—विसाजी, सत्पक्षाचा साथी देव असतो, समजलांत ? तुमची तरवार हातची निसटली आणि तुम्ही माझे कैदी झालांत !

**विसाजी**—तरवार निसटली माझ्या दैवानं—

**शिवाजी**—म्हणजेच दैवी प्रेरणेनं ! परमेश्वरी प्रेरणेवरच दैवाची दिशा अवलंबून असते ! चला घेऊन त्याला. (विसाजीला नेतात.) बेगम !

**गुलशन**—मालिक—

**शिवाजी**—काय भलताच हा गौरव ?-पण हा अकल्पित प्रसंग—

**गुलशन**—पीरसाहेबांच्या दर्शनाकरतां गेलों होतों ! दरोग्याहून परत चाललों होतों, इतक्यांत हा प्रसंग गुदरला ! पण आपण कसे इकडे ?

**शिवाजी**—कांहीं राजकीय-स्पष्टच सांगायचं म्हणजे अदिलशाहीचा आणि आमचा कायमचा सलोखा घडवून आणण्याकरितां राजांच्या आज्ञेवरून मी इकडे आलों. जवळच डेरे देऊन सहज बाहेर पडलों तों ही गडवड ऐकली; म्हणून इकडं आलों ! आतां अगदीं निर्धास्त असा.

**गुलशन**—असले कुलवंत बहाद्दर जवळ असतांना धास्ती कशाची ? मालिक, विसाजीच्या पापी अटकेंतून आपण माझी सुटका केलीत, पण त्याच घडील

आपल्या उपकारांच्या रेशमी जाळ्यांत हा जीव कायमचा गुंतवलात ! आजच्या उपकाराची फेड म्हणून हा जीव अल्लाच्या साक्षीनं या पायीं बहाल करतें !

पद ४ थें. [ राग-तिलंग, त्रिवट ]

**अतुल गुणीं रमत । विनत पायीं नार । तव कृति**
**करी विमूढ । जन अनिवार ॥ ध्रु० ॥ नवनवलाचा ।**
**अभिनव भरला । तरल मनिं भाव । मृदु हळुवार ॥१॥**

**शिवाजी**—विजापूरच्या वेशींत पाऊल टाकतांच, मुसलमानांच्या दोस्तीचा हात, आपल्या निष्पाप हातांच्या रूपानें माझ्या हातीं आला, असेंच मी समजतों !– बेगम, आपल्यासारख्यांची ही बहुमोल दिल्‌दौलत मी आजन्म पूज्य मानीन !

पद ५ वें. [ राग-दुर्गा, त्रिवट ]

**देवता ! भविता। निरविता। या भालां ॥ ध्रु० ॥**
**सन्मुखा उदित मजला। मंद हातें। न्यावया विभव-**
**गतिला। रामा शुभदा। सुरसरिता। गमसि। थोर।**
**पुण्यकाला। आतां ॥ १ ॥**

**गुल्शन**—पण आपल्यासारख्यांनीं माझ्यासारख्या दुष्मन जातीवर दया दाखवणं याचा अर्थ ?

**शिवाजी**—क्षात्रधर्म ! बेगम, क्षात्रधर्म धर्माधर्मांच्या भेदाकडे मुळींच दृष्टि देत नाहीं. क्षत्रियाची समशेर न्याय, नीति, समता आणि दया यांचीच पाठराखी असते ! अशीच मासाहेबांची या शिवाजीला आजपर्यंतची सांगी आहे ! आणि भवानीला साक्षी ठेवून या चौबुरुजांतच माझ्या " हिंदवी स्वराज्याचें " मंदिर उभारण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे.

**गुल्शन**—इलाहीच्या कृपेनं आपली समशेर या कामीं खात्रीनं विजयी होईल.

**शिवाजी**—मूर्तिमंत " स्वराज्यदेवता " तर मला हा आशीर्वाद देत नाहीं ना ?—

पद ६ वें. [ राग-जिल्हामांड, केरवा ]

**उषा हे रंगेली। मज सामोरी ॥ ध्रु० ॥ देई धीरा।**
**तम-भ्रम-निरतां । जणुं चंद्रकला। चपला। ललना।**
**न तुला। कमला हे। उदेली ॥ १ ॥**

---

## प्रवेश दुसरा

[स्थळ—विजापूर. गुलाबखानाच्या वाड्यांतील एक भाग. अल्ला प्रवेशतो.]

अल्ला—सताया, सताया-एकदम सताया! वाटेल तसली नाठाळ गायें असली तरी या अल्लाच्या सुरीखालीं बिनहरकत मान देते; पण गुलाबखान मात्र शिरजोर तो शिरजोरच! कुणाचा होऊं नये चाकर म्हणतात तें अगदीं खरं! जिच्याकारितां ह्या खानाचा शिरजोरपणा ती गजरा पाहिली तर भित्र्या लाजाळूची जात! लाजाळूला हात तरी लावावा लागतो; पण हिला मी दिसलों रे दिसलों, कीं हिच्या उमद्या उमरीची रोषनाई गेलीच मावळून! शेंकडों गाईंच्या गर्दन या अल्लानं उतरल्या असतील; पण एकसुद्धां गाय या गजराइतकी भित्री नव्हती!-क्या किया जाय! आज दिन छे बरीस हुवा; मगर ओ दिलखुष जनाना धरमकी बात छोडतेबी नही और शादिबी—(गजरेस पाहून.) या अल्ला! कौन? गजराजान!

गजरा—खानसाहेब-अहो खानसाहेब,(अल्लास पाहून) अगबाई, कोण? अल्ला!

अल्ला—तोबा-तोबा;मै क्या बडा शैतान हूं गजराजान? इतकी डर? तुझ्याशीं जानजिगर दोस्ती करूं पाहणाराची डर?

गजरा—तुझ्यासारख्याशीं जानजिगर दोस्ती म्हणजे जित्या मृत्यूची मुलाखत! त्यापेक्षां तडकाफडकीं जमीनदोस्त झालेलं काय वाईट? पण खानसाहेब कुठं आहेत?

अल्ला—ओ है! मगर गजरा, पहिले एकच बात—

गजरा—तुझ्या बाता मग. आधीं खानसाहेबांना भेटूं दे! माझं काम आहे-लौकर सांग—

अल्ला—आधीं माझी बात मग तुझं काम! गजराजान, तूं माझ्याशीं शादी करणार कीं नाहीं? तूं सांगशील. तें करायला मै तयार हूं!

गजरा—होय ना? मग शादीची गोष्ट बोलायची तर आधीं हातचा सुरा फेंक आणि हिंदु—

अल्ला—हिंदु! हिंदूत आणि मुसलमानांत तूं फरक काय काढतेस? मुसलमान दाढी राखतो तर शहाजीसारख्या अस्सल मराठ्यालाही दाढी असतेच! आतां मुसलमानांना शेंडी तेवढी कमी असते; पण गजराजान, तुझी इच्छाच

बा. ... नी. ...

असेल तर ही उणीव मी भरून काढीन ! कारण केसांचें पीक पाण्याशिवाय वाढतं नी मोसमाशिवाय पिकतं !

**गजरा**—( स्वगत ) बाई ग बाई ! आतां याच्या तावडींतून सुटूं तरी कशी ?

**अल्ला**—क्या गजरा ! जबाब नाहीं ? मी तुला आवडत का नाहीं ?

**गजरा**—तुझ्यापेक्षां मरण कुणालाही आवडेल !—आमच्या पुराणांतल्या स्त्रियांची पाठराखणी करणाऱ्या मेल्या साऱ्या यक्षिणी आजच कुठं गडप झाल्या देव जाणं ! का एखाद्या चवचाल देवाच्या दरबारांत रंगढंगांत नी नाचरंगांत गुंगून गेल्या ? भीतीनं मला तर हुडहुडी भरायची वेळ आली आहे !

**अल्ला**—गजराजान, माझ्यांत तुला काय कमती दिसतं ?—अशी भेदरतेस का ? डरो मत ! गाईंचा हा अल्ला आपल्या प्यारीचा पालनवाला आहे. मी कांहीं कमी बांका शिपाई नाहीं ! नुसत्या नजरेची किंवा पदरपालवणीची खूणगांठ मनांत बांधून, प्यारीची गांठ घेण्याकरतां रात्रीं बेरात्रीं जिवाचं रान करून, रानावनांतून भटकायला मला कांहींच वाटत नाहीं ! हेंच काय, पण इष्काच्या बाजारांतल्या झाडून साऱ्या अव्वल दर्जाच्या चिजा माझ्या छानपछानीच्या आहेत ! डरो मत ! !

**गजरा**—( स्वगत ) मला गुदमरून गेल्यासारखं व्हायला लागलं आहे या माऱ्यापुढं ! घामानं नुसती डबडबून गेलें मी ! मघांची ती मराठ्यांची भालेराई पुरवली; पण ही ओळखीच्या चोराची घिसाडघाई नको ग बाई !

**अल्ला**—इष्काच्या सैन्यांतल्या नुसत्या बोलघेवड्या बाजारबुणग्यापुढंच जर तूं अशी पाघळूं लागलीस तर बेडर बहादराच्या माऱ्यापुढं तुझं पाणीच होईल कीं !

**गजरा**—तसं जर याच घडीला होतं तर नशीबच समजलं असतं ! म्हणजे त्या पाण्यांत हात घालतांच भलत्याच आशेची कशी माती होते हें तरी तुला कळलं असतं.

**अल्ला**—ही कशी भलती आशा ? तूं औरत, मी मरद ! आपली शादी व्हायला काय हरकत ! धरम आड येत असेल तर सुनाव ! ठोकरून देतों त्याला आणि राखतों शेंडी ! मर्दाला साजेसा नूर आहेच ! अग हा नूर म्हणजे मर्दानी रुबाब आहे रुबाब ! अदमीच्या एका नुराची बरोबरी करायला दहा कपडे लागतात ! " एक नूर अदमी और दस नूर कपडा " क्या समजा ?

गजरा—डॉबल माझं! अल्ला, आधीं खान कुठं आहेत तें सांग रे; माझं काम आहे; अगदीं जरुरीचं काम आहे बघ.

अल्ला—वैसा? फेर सुनाव! एकदम सुनाव! मै तेरा गुलाम! गजराजान, मी करतों काम गुल्शनबीका.

गजरा—हां तेंच, तेंच काम. जाऊं दे तर मला! नाहीं तर खान रागावतील बरं.

अल्ला—ओ खान गया खाटीकखानेमे! वैसा लपं छपं मत् करो.

गजरा—अरे नारायणा! मग आतां?—

अल्ला—कूच भी नही! मगर एकच सवाल.

गजरा—हं: देवा, धाव रे धावण्या आतां—

अल्ला—हा मरद अल्ला तूं सांगशील तें करायला तयार आहे. तूं शादी केलीच पाहिजेस! जर हें कबूल नसेल तर—

गजरा—तर काय अल्ला?—मी तुझ्या तावडींत गरीब गाय कां रे सांपडले आहे?

पद ७ वें. [कवाली]

**रमणि-हृदया। रंगवाया। रीत कां ही कामुका?**
**॥ध्रु०॥ हृदय कंपन घे बघतां। तव रूप डोळां सया!।**
**धीर ना लव। जीव विटला ॥ १ ॥**

अल्ला—अग, गाय असतीस तर इतका वेळ लागलाच नसता! या अल्लाला पाहतांच माझी इच्छा ओळखून तिनं आपली गर्दन पुढं झुकवली असती!—बोल-कबूल?

गजरा—काय?

अल्ला—शादी—

गजरा—साफ नाहीं—

अल्ला—आतांपर्यंत हा अल्ला तुझ्याशीं अल्लाच्या गाईप्रमाणं वागला; पण आतां मात्र—

गजरा—काय होणार।

अल्ला—असा गाईच्या अल्लाप्रमाणं वागणार! (मानेवर सुरा ठेवतो.) देख ले-शादी कबूल?

**गजरा**—धावा-धावा ! मेलें हो मेलें-खानसाहेब, धावा—

**अल्ला**—अफसोस् ! ये क्या हुवा ? गजराजान, प्रेमानं मानेवर सुरा ठेवला तों इतका आरडाओरडा केलास ? क्या किया जाय ? या अल्ला ! तोबा-तोबा,-ओ शैतानभी आया ! गजराजान, इधर छूप जाव; छूप जाव ! तुला नी मला जर इथं त्यानं पाहिलं तर दोघांनाही धाडील खाटीकखान्यांत ! छूप जाव.

**गजरा**—पण निरोप ?

**अल्ला**—मी सांगतों ?

**गजरा**—कोणता ?

**अल्ला**—अल्लाके मालुम !

**गजरा**—अल्लाला काय ठाऊक ? दगड ! गुलशनबी शहाजी राजांच्याकडे ! अगबाई, ते पहा खान आलेच आतां ?

**अल्ला**—छूप जाव; इधर छूप जाव ! ( एका दारानें तिला आंतील दालनांत घालवितो.) आँ ? किधर गया ?

**गुलाबखान**—क्यँ-क्या धूम मचाई हो ? कौन ? अल्ला !

**अल्ला**—हां जी हुजूर—

**गुलाबखान**—इधर कायकू वास्ते ?

**अल्ला**—एक नाठाळ जनावर, रस्सी तोडकर दौडकरके इधर आया; उस्के पीछे हमबी आया.

**गुलाबखान**—क्या ? जनावर ! और गोषाके अंदर ! पागलकी बात हमारे सामने कहते हो ! अभी देखेगा. [ जातो.

**अल्ला**—या वेळीं अस्मानकी बिजली कडाडून डोक्यांत पडती तर क्या मजा हो जायेगी !

**गुलाबखान**—( गजरेस कानाला धरून आणतो.) हैवान, ये देख ले तेरा जनावर !-गजरा—

**गजरा**—सरकार, कसूर माफ ! गुल्शनबी शहाजी राजांच्याकडे शिवाजी भोंसल्याबरोबर—

**गुलाबखान**—अफ्सोस ! ओ शिवाजी विजापूरमे ? जाव, अब्बीके अब्बी

जाव; और घडीके अंदर गुल्शनबीकूं हमारे सामने खडी करो, वैसा शहाजी राजाकू मेरा हुक्म फर्माव ! जाव.

गजरा—( बाजूस ) सुटलें एकदांची ! या 'अफसोस्'च्या दणक्यानं कुठं उडून जातें कीं काय, वाटलं होतं ! [जाते.

गुलाबखान—और अल्ला—

अल्ला—( स्वगत ) अल्ला, अभी तूं मूरगीके माफक मर गया !

गुलाबखान—अभीके अभी तेरी पथारी ओ खाटिकखानेमे फेक देव ! मगर आज दिनसे तुमकू गोषाकेपास आनेका सख्त मनाई है ! [ जातो.

अल्ला—जिवावर आलें होतें तें शेंपटावरच निभावलें ! हरकत नाहीं ! मी नाहीं फिरकलों गोषाकडे तर गोषाच येईल माझ्याकडे ! अल्ला; क्या ताज-तकदीर तेरा !

---

## प्रवेश तिसरा

[ स्थल—विजापूर; शहाजीराजांचा महाल, जिजाऊ आरशांत पहात आहे.]

जिजाऊ—हें असं काय बरं होतं ? आरशांत पाहायला म्हणून जातें नी माझ्या शिवाजीची मनोहर मूर्ति छत्रपतीच्या रूपांत विजयी मुखानं, माझ्याकडे पहात आहे, असं मनोरम चित्र मला कां बरं दिसावं ?

पद ८ वें. [ राग–सिंदुरा, त्रिवट ]

**नित अभिनव प्रिय नवल कां भासे? । हृदय-रमण**
**पुलकित, नेत्र-राग । विरत तरलगति । तनय-मूर्ति-**
**प्रति ॥ ध्रु० ॥ विजय कांत हसवि सहज कामिनिला ।**
**परि देतां सुत-निधान । तयिं पालखिं । ब्रह्म विलसे ॥१॥**

हृदयांत रात्रंदिवस चाललेल्या त्याच त्या विचारांचा तर हा परिणाम नसेल ना ? कां शिवबा आजच इथं येणार म्हणून मनाच्या उल्हासामुळं, मला हा गोड भ्रम होत आहे आज ? कांहीं कां असेना–'शककर्ता छत्रपति तुमच्या कुलांत निर्माण होईल'.हा बाळा-च्या जन्माआधींचा साईंजींचा आशीर्वाद, शिवाई, खरा ठरूं दे म्हणजे झालं ! दीन-दुबळ्यांची लाज राखण्याकरतां या महाराष्ट्राच्या बेताल आखाड्यांत उतरलेल्या,

या माझ्या लेंकरावर तुझी प्रेमाची पांखर असूं दे म्हणजे झालं! अगबाई, पण काय? शिवबाच्या जागीं ही त्याची पितृमूर्ति कशी? ( वळून शहाजीकडे पाहते.)

शहाजी—( पुढें येऊन ) एकदम तर खरीच! पण आपण आतांशा शिवबाच्या विचारांत इतक्या गुंग असतां कीं, आमची आपल्याला आठवणसुद्धां होत नाहीं! मग आम्ही आलों केव्हां आणि गेलों केव्हां याकडे भावी छत्रपतींच्या मातोश्रींचें लक्ष गेलें नाहीं तर कांहीं नवल नाहीं!

जिजाऊ—स्वारीचं तर आत्तांच येणं झालं; पण जर कदाचित् माझी चूक—

शहाजी—छेः छेः! मनांत भलत्या कल्पना मुळींच येऊं देऊं नका; राणीसाहेब, आपल्या हातून हरघडी अशाच चुका व्हाव्यात. शिवाजीच्या छत्रचामरांच्या विचारांत या शहाजीचा आपल्याला विसर पडला असतांना, ध्यानमग्न झालेली आपली धीरगंभीर मनोहर छबी, जागच्या जागीं खिळून पाहात रहावी असेंच वाटतें! नका, नका अशा लाजूं! मराठशाहीच्या लाजेचा गोषा, कितीतरी वेळां मोगल सिंहासनासमोर जलूम-जबरदस्तीनें खोलण्यांत आला असेल! राणी, महाराष्ट्राच्या दुबळ्या अब्रूचा गोषा सांवरण्याकरितां आपण आपला गोषा झुगारून दिला आहे हें मला माहीत कां नाहीं? मग राणी, अशा महत्त्वाकांक्षेनें झुगारलेला गोषा, या शृंगारांत तरी कशाला?

पद ९ वें. [ राग-शंकरा, त्रिवट ]

**प्रिय सखा सखि! या। शांतवाया। भाव विलोला**
**विफला। विलासमया॥ ध्रु०॥ नुरे आस लव कदा**
**मनाला। विरल मोह-रति सकल सुगुणिं या॥ १॥**

जिजाऊ—हृदयेश, या प्रसंगीं या जिजाऊनं दुसरं कोणतं वर्तन करायचं होतं? दुबळा महाराष्ट्र निरपराध स्त्रीजातीच्या मुखानं अब्रूपायीं केंविलवाणा टाहो फोडीत असतांना, आपल्या राष्ट्र-देवीची तरी लाज कुठं राहिली! एखाद्या कंगाल लक्ष्मीच्या पदरपालवणीनंसुद्धां राष्ट्रदेवीच्या अब्रूला धक्का बसतो ही आपलीच ना सांगी? महाराज, मोगल सिंहासनासमोर लाचार ठरणाऱ्या या आपल्या देशाच्या द्रौपदीच्या लाजेसाठीं कृष्णतेजाचा अवतार या महाराष्ट्रांत होण्याकरितां प्रत्येक स्त्रीनं द्रौपदीच्या दीन वाणीनं देवाचा धांवा केला पाहिजे असं इकडूनच ना नेहमीं सांगायचं होतं—

**शहाजी**—आणि हा धांवा आपल्या बाबतींत एकदम खराही ठरला! आपली स्तुति करण्याच्या उद्देशानें मी बोलत नाहीं; पण राणीसाहेब, शिवबाच्या रूपानें खरोखरीच प्रत्यक्ष परमात्मा आपल्या धांवण्या धावला!

**जिजाऊ**—खरोखरच जर माझी तपस्या इतकी फळाला आली असेल. तर—

**शहाजी**—तर-तर काय? बोला; अभिमानाच्या ऊर्मीनें उसळणाऱ्या बोलांना असें आवरून धरूं नका! अवास्तव अभिमान, उथळपणानं गर्वाच्या कोटींत जातो, पण शंकित मनाचा हा असा चोरटा अभिमान मनाच्या समाधानाला कारण होतो. नका, अशी दृष्टि दुरावूं नका! या असल्या शृंगारानं मनाचा उन्माद पार मावळून जातो. दृष्टीला दृष्टि रोंखून त्या डोळ्यांतून उसळणाऱ्या तेजोमय पुण्यगंगेंत समाधि घ्यावी असें वाटतें! असल्या या शृंगारनजरेनं नजरबंदी होण्याऐवजीं, दैवी तेजाच्या जादूनं हा शहाजी, जागच्या जागीं खिळून नजरेचा बंदीवान् होतो! ती पहा, तिरव्या नेत्रकटाक्षांत चमकलेली माझ्या शिवबाची तेजस्वी नजर! तें उदार स्वभावाची ग्वाही देणारें तें बाकदार नाक, त्या कमानदार विशाल भुवया, आहाहा! आपलीच तेजाळ मूर्ति शिवाजीच्या रूपानें "हिंदवी स्वराज्याचा" जयजयकार करण्याकरतां—

**शिवाजी**—(आंतून) हिंदवी स्वराज्याचा जयजयकार असो.

(शिवाजी प्रवेशून उभयतांस प्रणाम करतो.)

**शहाजी**—जरूर, कोण? शिवबा? (भेटतात)–कुशल?

**शिवाजी**—कुशल, पूर्ण कुशल! आपल्या आणि मातोश्रींच्या आशीर्वादानें पूर्ण कुशल!

**जिजाऊ**—कांहीं नवल खबर?

**शिवाजी**—मासाहेब, जगांत जोंपर्यंत मानवी स्वभावाला पापपुण्याचा पायबंद बसलेला नाहीं, तोंपर्यंत नवलाईला काय वाण?

**शहाजी**—म्हणजे?

**जिजाऊ**—येतांना वाटेंत कांहीं विपरीत घडलं काय?

**शिवाजी**—नाहीं! विपरीत होणार होतें! पण तें आपल्या आणि भवानीच्या आशीर्वादानें टळलें. या शिवाजीला आजपर्यंत न मिळालेलें यश आज सहज लाभलें. या शिवाजीची स्वराज्याला वाहिलेली समशेर आज एका पवित्र कार्यांत विजयी झाली—

**जिजाऊ**—लौकर बोल ! तुझ्या प्रत्येक शब्दाबरोबर जीव कसा अधीर होतो.

**शिवाजी**—ही उतावळी उत्सुकता वाढविण्यांतच त्या प्रसंगाचें महत्त्वही वाढणार आहे. प्रसंगांत सांपडलेल्या एका सुशील बेगमला माझ्या हातीं आज अब्रूचें दान मिळालें !

**शहाजी**—शाबास शिवबा, शाब्बास ! हें स्त्रीजातीचें यश आपल्या मासाहेबांच्या पायीं नजर कर; कारण स्त्रियांचा विशेष अभिमान स्त्रियांनाच असतो. आज या तमाम हिंदुस्थानांत, या बिचाऱ्या गाईंची छळणा थांबविणारी, स्त्रीजातीच्या अब्रूकरितां तडफीनें उसळणारी एकही समशेर या दुर्दैवी देशाला लाभली नाहीं ! पण शिवबा, ही तुझी तेजस्वी तडफ मात्र या निराश देशाची आशा पूर्ण करील असा मला भरंवसा वाटतो.

**शिवाजी**—आपल्यासारख्या महाभागाची पुण्याई काय करणार नाहीं ? विजापुरकरांना नजरेच्या जरबेंत खेळविणारा पराक्रम, प्रत्यक्ष दिल्लीपतीला पायबंद घालणारी मुत्सद्देगिरी ज्यांच्या रोमरोमांतून संचार करते, त्या पुण्यपुरुषाची कृपादृष्टि या शिवाजीची महत्त्वाकांक्षा खात्रीनें पुरी करील ! मासाहेब, परक्यांच्या त्रासानें सतावून 'त्राहि त्राहि' म्हणणाऱ्या स्त्रीजातीचें हें अभय आपल्या पायीं—

**जिजाऊ**—नको, त्या मुक्त झालेल्या गाईंच्याच पायीं तें वहा. बाळ, या भारतवर्षांत माझ्यासारख्या स्त्रियांचं नांव घेण्याची आज कुणाची प्राज्ञा आहे ? इकडच्यासारखे राजधुरंधर-सेनासागर माझ्या शेजारीं असतांना, तुझ्यासारखा जलाल नाग माझ्यापुढें सदैव खडा असतांना,-माझ्याकडे वाकड्या नजरेनं पाहाणाऱ्याची नजर दुसऱ्याच क्षणाला शाबूत राहायची नाहीं ! पण निराधार जिवाची जाचणी कोण नाहींशी करणार ? साऱ्या देशांत स्वातंत्र्याची आबादानी राहावी म्हणूनच हा " हिंदवी स्वराज्याचा " उपक्रम !

**शहाजी**—पण राणी, तें 'सुराज्य' 'स्वराज्या'शिवाय होणें शक्य नाहीं ! आजपर्यंत परकी सत्तेंत सुराज्य आणण्याचा आम्हीं शिकस्तीचा प्रयत्न केला, परतंत्र परिस्थितीशीं झगडतां झगडतां, आमची मुत्सद्देगिरी थकली ! आमचा पराक्रम भागला, आमच्या सुराज्याच्या कल्पनेचा शेवट दुसऱ्यांनाच शहाजोग शिरजोर बनविण्यांत झाला ! आमच्या कमाईचें यश दुसऱ्याची दौलत बनून, त्या दौलतीचे आम्हांला गुलाम बनावं लागलं ! शिवबा, कोणत्याही परिस्थितीमुळं जिवाला बसलेल्या बंधनांचा संस्कार मनोवृत्तीवर नकळत झाल्याशिवाय

नौबद, दुर्बलांतली दुर्बल ही नारीजात अलम् दुनियेंत दुमदुमून सोडल्याशिवाय राहणार नाहीं! हो–पुढें हो! आणि या दुखावलेल्या नागिणीची क्षमा माग! करुणा भाक! स्त्रीजातीची कृपा कल्याणाची पहिली पायरी आहे!

विसाजी—क्षमा! हंः! राजे फिरून सांगतों कीं मी पूर्ण निर्दोषी आहें! राजे शिवाजी आणि ही पागल बिजली—

शिवाजी—खबरदार विसाजी! घटकेपूर्वी हातून तरवार उडाली, पण या घडीला जिभेचा पट्टा सुद्धां उतरला जाईल. पुढच्या निर्लज्ज शब्दाबरोबर कुणाचाही मुलाहिजा न धरतां तें बेफाम मस्तक मासाहेबांच्या पायावर धूळ खात जाईल.

जिजाऊ—बाळ गुल्शन, काय प्रकार घडला तो सांग बरं!

गुल्शन—मासाहेब, क्या कहूं? मी आणि माझी दासी गजरा दरग्याहून परत येत होतों, इतक्यांत राईंत या सैतानानं—

विसाजी—खामोष! दाढीवाल्या सैतानांचीं कृत्यें अद्याप हिंदूंच्या डोळ्यांपुढून गेलीं नाहींत!

शहाजी—बस्स, कळला सारा प्रकार! विसाजी, तुझ्या नीचपणाचा कळस झाला! तुझ्यासारखे स्त्रीजातीला विसरणारे, ज्या स्त्रीजातीच्या प्रेमळपणामुळें तुझीं हीं पोसलेलीं मुर्दाड हाडें आज असा निर्लज्ज उद्दामपणा बजावायला उभीं राहिलीं, तीं यापुढें जगांत राहायलाच मुळीं लायक नाहींत! ओढा त्याला–या शहाजीराजाच्या लौकिकाला लागलेली ही काळोखी माझ्या पुढून एकदम न्या! अदिलशाहीच्या सिंहासनासमोर उभा सोलून याला केल्या कृत्याचा जाब विचारीन? न्या.

विसाजी—राजे, अन्याय होत आहे–हा! मी वीर आहे; हिंदूच्या अब्रूची किंमत जितकी आपणांला, तितकीच या आपल्या निमकहलाल—

जिजाऊ—निमकहलाल! विसाजी, निमकहलाल हा शब्द आतां या तोंडीं मुळींच साजत नाहीं! निमकहराम, भोसल्यांचं निमक आजच इतकं उलटलेलं दिसलं–समजलास?

विसाजी—मासाहेब, त्या समशेरीची शपथ—

शिवाजी—समशेरीची शपथ! तुझ्यासारख्या नामर्दाला कसली आली आहे समशेरीची योग्यता? समशेरीचा इतवार वीरांना! तुझी ही पापी समशेर–ही पहा–हा शिवाजी, महाराजांच्या देखत अशी पायाखालीं तुडवून–तुझ्या पुरुषार्थाला

या तुझ्या नादान हिंदुत्वाला असा धुळीला मिळवीत आहे. (तरवार पायानें तुडवितो.) विसाजी, तूं आज हिंदुत्वाला मुकलास !

**शहाजी**—न्या. याला एकदम दरबारीं हजर करा !

**जिजाऊ**--महाराज, एकच विनंति—

**शहाजी**—याच्याचबद्दल ?

**जिजाऊ**—होय, महाराज हुकूम मागं घ्या ! भोंसल्यांच्या कीर्तीला उदारपणाची प्रभावळ आहे ! अपकीर्तीनं मेलेल्या या मढ्याला आतां मारण्यांत कोणता पुरुषार्थ ? माणुसकीचा आत्मा म्हणजे कीर्ति ! इज्जत गेली कीं प्राण गेला ! शिवबानं याच्या पुरुषार्थाला पायीं तुडवल्यानंतर त्याच्या उरल्या जिवाला मारण्यांत काय हंशील ? याला पश्चात्तापाची हीच वेळ आहे ! याला मारून जें यश भोंसल्यांना मिळणार नाहीं तें यश या मेलेल्या हिंदूचा पश्चात्तापानं जिवंत हिंदु झाल्यानं खात्रीनं मिळेल !

**शहाजी**--राणी, ह्या हरामखोराचे या पोरीला उद्देशून उच्चारलेले "पागल बिजली" शब्द ऐकतांच तिच्या पवित्र चेहऱ्यावर उमटलेलें तें उद्वेगाचें चित्र या शहाजीच्या डोळ्यांपुढून हलत नाहीं ! या नीचपणापणाचें मीं जर शासन केलें नाहीं तर ही हळवी नारीजात माझ्या पौरुषाचा धिक्कार करील ! नका राणी, तुमच्याच जातीचा अपमान करणावर दया दाखवून सापाला पोसूं नका. व्हा-दूर व्हा, आपल्या विनंतीचा अव्हेर करतांना आपला अपमान होणार, पण या गरिब बालेच्या हृदयाची तळमळ शांत होणार !

**जिजाऊ**—दया वीरांचं भूषण नाहीं का ? बाळ गुल्शन्, सांग, तुझा अपराध करणाऱ्याला जिवंत ठेवल्यानं तूं त्याला जिंकशील, कीं त्याला एक वेळ मारून जगांतून कायमचा नाहींसा केल्यानं तूं त्याचा सूड घेशील ? शत्रूला दया दाखवून त्याला जिवंत ठेवल्यानं पुढच्या प्रत्येक भेटीला तो मागच्या आठवणीनं मरत असतो ! बाळ, तूं यावर दया करावीस. तुझा हा दुष्मन-आमच्या कीर्तीचा हा कलंक-अपमानानं जिवंतपणींच कसा मरतो तें दिसेल !

**गुल्शन**—मासाहेब काय जबाब देऊं मी ! या गुल्शनला आपला असा आतां मनसुबाच राहिला नाहीं ! शिवाजीराजांच्या इच्छेंतच माझी इच्छा विरून गेली !

**शहाजी**—साऱ्या हिंदु-मुसलमानांची जर अशीच दिलजमाई होती तर हें हिंदुस्थान सुखाचें माहेरघर होतें !

गुलशन—राजे, मासाहेबांकरितां, महाराजांच्या नांवाकरितां या तुझ्या–काय बोलूं ? कुणाकरितां तरी तुझ्यावरून जान कुर्बान करणाऱ्या या गरीब जिवाकरितां याला जीवदान—

शिवाजी—बेशक ! जा–विसाजी मासाहेबांचे पाय धर महाराजांची क्षमा माग ! आणि हें काळें तोंड पुन्हा आम्हांला दाखवूं नकोस ! जा; सोडा त्याला.

विसाजी—(स्वगत) दैवाचा फासा उलटेल तर या बेऱ्यांच्या हाडांचे फासे करावयाला मला काय वेळ लागणार आहे ? (उघड) भोंसल्यांचा हा बंदा आपल्याला हा शेवटचा मुजरा करीत आहे ! ही तरवार—

जिजाऊ—नाहीं. तिला हात लावण्याचा तुम्हांला आतां अधिकार नाहीं ! तुमच्या ह्या नव्या जन्मांत आपल्या कर्तबगारीनं कीर्तिवंत अशी नवी समशेर मिळवा ! तुमची मायभूमि तुमची प्रेमानं कुरवंडी करायला पुन्हाही तयार होईल ! स्त्रीजात आपल्या पापी पुत्राला सुद्धां विसरत नसते हें लक्षांत ठेवा ! जा—

[ विसाजी मुजरा करून जातो.

शहाजी—शिवबा, या तुझ्या सुशील गुल्शनला तिच्या मकाणाकडे तूंच पोंचीव. तिचें रक्षण तूंच केलेंस–तूंच या प्रकरणाचा शेवट लाव ! विजापुरांत पाऊल टाकतांच गुलाबखानसारख्या हुजुरातीच्या बड्या सरदाराला उपकारानें असें बांधून घेतल्यावर हुजुरातीला जिंकणें फारसें कठीण नाहीं !–पालखी आतांच तयार राहील. [ जाते.

जिजाऊ—थांब अं बाळ ! मुलुखगिरीहून विजय घेऊन आलेल्या पुत्राची दृष्ट आईनं काढलीच पाहिजे ! कारण बाहेरच्या परकी दृष्टीपेक्षां आईचीच दृष्ट पुत्राच्या बाबतींत अधिक पायरव्याची असते ! चल आंत. [जाते.

शिवाजी—गुल्शन—

गुलशन—दिलावर—

शिवाजी—मासाहेबांच्या या निर्व्याज आनंदाचा वांटेकरी होण्याकरितां, गुल्शन, आजच्या यशाच्या शुद्ध निरभिमानी आनंदानें मासाहेबांसमोर मला जाऊं दे ! गुल्शन, तुझ्यापायीं मिळालेल्या या विजयाच्या निशाणीचा या समशेरीचा स्वीकार करून, मला माझ्या विजयश्रीच्या अभिमानी दडपणांतून मोकळा कर ! या यशाचा स्वीकार केलास कीं माझ्या विजयाचा निर्दोष आनंद तेवढा माझ्या जवळ राहून, त्या विजयाची खरी मालकीण तूं होशील ! कोणत्याही विजयाचा

...वाचनालय शाख.
११५
नाटक



आनंद आत्माभिमानाच्या छायेवर तरंगत असतो, आणि हा यशाचा घातुक अभिमान घातुकपणानेंच नकळत मनावर बिंबून मानवी गर्वाची कमान चढूं लागते ! ही गर्वाची चढती कमान-गुल्शन-मानवी जीवनाच्या अधःपातांत विलीन झालेली असते ! म्हणून गुल्शन, या यशाचा स्वीकार करून, माझ्या ध्येयाच्या पेशाला आवश्यक असणाऱ्या यशाभिमानाच्या संन्यासाचा पहिला धडा मला घालून दे ! हें तुझ्याच पुण्याईनें मिळालेलें यश तुलाच अर्पण असो !—(तरवार तिच्यापुढें ठेवतो.)

पद ८ वें. [ राग बेहाग; त्रिताल ]

**सुयशा लावि लांछना । अभिमान। खल-काल**
**तापवि हा ॥ध्रु०॥ हा लोभ दारुणा । मोहदा सदा जनां ।**
**न कळत न वळत । नेत त्यास हा लया महा ॥१॥**

**गुल्शन**—हां-हां, मालिक-मालिक, हें काय ? (तरवार उचलून) बा जलाल बेगम, या पायमल्लीनं आपला इतमाम बिघडला असेल नाहीं बरं ? जी रण-मर्दांच्या यशाचा नूर ती माझ्या गरिबाच्या हातीं कशी साजून दिसणार ? जहानी साजन, आपला हा माझ्या नकळत झालेला उपमर्द आपल्या धन्याची आजन्म छाया बनून मी भरून काढीन हीच माझी कसम ! इलाहो, औरत-शाहीच्या या पाठराखणीचा हिंदुधर्मा—'मराठ्यांचा पादशाहा' झालेला पाहून दिलाला आराम पडेपर्यंत मेरा जान सलामत रखो !

पद ९ वें. [ राग-देस, त्रिताल ]

**या शंकितशा कंपितशा हृदया द्या अभया । परभाव**
**निमाला सारा, हा धर्म विसरला ।—मनिं रामहि तूं ।**
**रहिमहि तूं । मालिक या ॥ ध्रु० ॥ "अतुल नृपति"**
**हा नाद निनादो । जनिं शिवराणा विजयांत नांदो ।**
**हितगुज मनिंचें फोल न होवो । दे सदया तूं या**
**अभया ॥ १ ॥**

## — अंक पहिला समाप्त —

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[स्थळ—गुलाबखानाचा वाडा. एका दालनांत गुलाबखान व विसाजी बोलत आहेत.]

**विसाजी**—गुलाबखान! खरोखर मोठ्या नामुष्कीची गोष्ट झाली! या शिवाजीनें आपल्या दरबारी इभ्रतीवर घाला घातला असता तरी हरकत नव्हती; पण आपल्या अब्रूवर—

**गुलाबखान**—खरोखर, या काफर लोकांना केव्हां नेस्तनाबूद करण्याचा वखत या अदिलशाहींत येईल खुदा जाणे! पण ही पागल पोर कशी त्याला आषक? नाहीं, विश्वास बसत नाहीं विसाजी!

**विसाजी**—आपण माझ्या शब्दांवर विश्वास ठेवा अथवा नका ठेवूं; पण मी माझ्या डोळ्यांवर विश्वास नको का ठेवूं? गुलाबखान, वीराला समशेरीइतकें कांहींच प्रिय नसतें. माझ्या समशेरीची आण; शिवाजीला आणि गुल्शनला मीं प्रत्यक्ष एके ठिकाणीं पाहिलें.

**गुलाबखान**—त्या वेळीं गोषा नव्हता?

**विसाजी**—नव्हता-गुलाबखान, बिलकूल नव्हता; एकाद्या-आतां स्पष्टच बोलल्याशिवाय इलाज नाहीं, उन्माद चढलेल्या एकाद्या बेफाम स्त्रीप्रमाणें शिवाजीच्या पायावर तिनें आपलें मस्तक ठेविलें! आपल्या अब्रूला केवढा हा डाग! दोस्तीमुळें जीव बेदील होतो.

**गुलाबखान**—इतका बदमाष हा शिवाजी? यांत शहाजींचें तर अंग नाहीं ना?

**विसाजी**—यांत शहाजीचें अंग असण्याचा संभव नाहीं; पण शिवाजीच्या इथें येण्यांत मात्र कांहींतरी त्याचा कारस्थानी डाव असावा! मला तर जबर संशय आहे—

**गुलाबखान**—कसला संशय?

**विसाजी**—जवळपास नाहीं ना कुणी?

**गुलाबखान**—त्याची नाहीं हो फिकीर; असलें तरी त्याची रवानगी एकदम कसाईखान्यांत करतां येईल ! बेशक बोला तुम्ही—

**विसाजी**—या अदिलशाहीची वजिरात या पोराहातीं जाऊन, आपल्या-सारख्यांना त्याच्या पायीं कुर्निसात करण्याचा—

**गुलाबखान**—क्या-क्या बुरी बात ? अदिलशाहीची वजिरात या शिवाजीला ?

**विसाजी**—हो-हो या शिवाजीला ! खानसाहेब, हा पाताळयंत्री शहाजी कोणत्या वेळीं कोणते डाव टाकील याचा काय भरंवसा ? शहाजीचें खात्रीनें पूर्वींच कारस्थान झालें असलें पाहिजे ! त्याशिवाय हा पुंड इतका राजरोस अदिलशाहींत येणें शक्य आहे का ?

**गुलाबखान**—तुमचा कयास चूक वाटत नाहीं ! आपल्या हो-याप्रमाणें जर झालें तर हा शिवाजी एका बाजूनं दरबारी सत्ता आमच्यावर गाजविणार आणि या पोरीच्या वर्तनामुळें बेअब्रू झाली म्हणून प्रत्येक ठिकाणीं आम्हांला खालीं पहावें लागणार ! खरोखर, डोकें भणाणून गेलें ही बातमी ऐकून ! पोरी मोठ्या झाल्या कीं इष्काच्या निशेनें भडकल्याच—

**विसाजी**—पण याला उपाय हा पाहिलाच पाहिजे—

**गुलाबखान**—उपाय ! उपाय ! शहाजीचीच बुद्धि फिरली का ? काय उपाय काढणार ? असली बापाची अब्रू जाळणारी छोरी उभी जाळून टाकली तरी फिकीर नाहीं. पण शहाजीचा पाठिंबा असलेल्या या शिवाजीचा बंदोबस्त कसा करायचा ?

**विसाजी**—खरेंच, असल्या अवघड प्रश्नाची पकड जिवाला बसली तर कांहीं नवल नाहीं ! उपाय एकच—

**गुलाबखान**—कोणता ?

**विसाजी**—तुमच्या निरोपाप्रमाणें गुल्शनला घेऊन शिवाजी इतक्यांत इथें येईल. त्या वेळीं ( कानांत कांहीं सांगतों.)-शिवाजी इथें आल्याची बातमी अजून कुठेंच फुटली नाहीं !

**गुलाबखान**—अफसोस-मेरा दिल बहुत डरता है—

**विसाजी**—खानसाहेब, महत्त्वाकांक्षी माणसाला हें वर्तन शोभत नाहीं ! अदिलशाहीची वजिरात घेण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या बहाद्दराचें हृदय असें कोंबडीच्या पिलाचें असावें ! हृदयाचा फत्तर करून हातच्या समशेरीला त्यावर

परजावी लागते, तेव्हांच मेली महत्त्वाकांक्षा जिवंत होते! पोटच्या पोराचा गळा देखतां डोळां सोडवावा लागतो! सरदार, शिवाजीच्या मुत्सद्देगिरीला शह देण्याकरतां हाच डाव खेळला पाहिजे! पोरीचा मोह आड येत असेल तर—

गुलाबखान—पोरीचा मोह? अब्रू गमावणाऱ्या पोरीचा मोह? काफरासमोर नुसता गोषा झुगारणाऱ्या पोरीचा मोह या गुलाबला पडला नसता–पण कां–कुणास ठाऊक नकळत जीव जड होतो—

विसाजी—पोरीला कोणत्याही रीतीनें वागवणें–खान, तुमच्या हातीं आहे आणि वेळ आली तर—

गुलाबखान—तर काय?

विसाजी—आतांच सांगितल्याप्रमाणें पोरीचा गळा नको का सोडवायला?

गुलाबखान—या अल्ला!!

अल्ला—(प्रवेशून)–हां जी हुजूर!!

विसाजी—इकडं ये. (कानांत सांगतो.) यांत कसूर झाली तर गर्दन तुझी मारली जाइल!

अल्ला—आँ! ये क्या बला!

विसाजी—बस्स! सांगितल्याप्रमाणें व्यवस्था ठेव. (अल्ला जातो.) खान, हा [illegible] कीं महत्त्वाकांक्षेला मुकलात! गुलशनची व्यवस्था कशीही लावा. जातों मी. शिवाजीनें वाड्यांत पाऊल टाकलें कीं वाड्याची नाकेबंदी झालीच म्हणून समजा! (स्वगत) आणि कांहीं घोटाळा झाला तर हा विसाजी परस्पर निसटलाच म्हणून समजा! [जातो.

गुलाबखान—विसाजीच्या सांगीप्रमाणें खरोखरीच गुल्शन काफरच्या काबूंत गेली असेल का? विसाजीनें जर गुल्शन–शिवाजीला एकाच ठिकाणीं पाहिलें तर त्याचवेळीं विसाजी पुढें कां झाला नाहीं? पण या असल्या विचारानें जानांजेगर महत्त्वाकांक्षेला खतम् करण्याचा वख्त येऊन, शिवाजी हातचा पसार व्हायचा! (कानोसा घेऊन)–हीं पावलें वाजूं लागलीं! क्या मनसुबा मुकर? बस्स! एकच–आधीं महत्त्वाकांक्षा आणि मग गुल्शनचा प्रश्न.

[शिवाजी व गुल्शन येतात.]

शिवाजी—सरदारसाहेब, आपल्या निरोपाआधींच आपली दौलत आपल्या स्वाधीन करायला निघालों होतों! हा घ्या आपला जान—

**गुलाबखान**—अल्ला—

**अल्ला**—(चार जवानांसह प्रवेशून) हां हल्ला, हुजूर ! (शिवाजीस धरावयास धांवतात.)

**गुल्शन**—हें काय ?—

**शिवाजी**—हां, खबरदार ! गाईंचा कसाईखाना एका घटकेंत मनुष्यांचा मुडदेखाना होईल ! पण गाईसारख्या मुक्या दुबळ्या जिवांच्या तडफडाटापेक्षां या मानवी जनावरांची काटाकाट शंभर पटींनीं पुरवली ! काय हा प्रकार ! खानसाहेब, दोस्तीच्या पोटीं अशी दगाबाजी ? जातिवंताला हें शोभत नाहीं.

**गुलाबखान**—मूख क्यँ बे देखते अल्ला ?—

**अल्ला**—हां-हल्ला हुजूर—(पुढें होतो. गुल्शन मध्यें येते.)

**गुल्शन**—खबरदार ! अल्लाकी कसम एक पाऊल पुढं टाकशील तर ! साहेब, ये क्या मनसुबा ? ही दगाबाजी विसाजीमुळं तर नाहीं ना ? साहेब, ही तुमची गुल्शन ज्यांच्यामुळं तुमच्यापुढं आज हंसऱ्या नुरांत उभी राहिली, त्या बहाद्दरावर हा गहजब ? तुमच्या लडकीच्या अब्रूची भीक तुमच्या पदरांत टाकणाऱ्या कुलवंत बहाद्दरावर ही इतराजी ? साहेब, दोस्ताच्या गळ्याला फास लावून, दुष्मनाच्या गळ्यांत गळा घालण्याइतकी महमदी पैदास बेइमान झाली तर जगांत जातिवंताच्या पायपोसाजवळ तरी आपल्याला जागा मिळेल का ?

**गुलाबखान**—पागल छोरी, दूर-एकदम दूर हो !

**गुल्शन**—एकदम लडकीला दूर झुगारून देण्याइतकं जहर, बाबा, आपल्या कानांत कुणींहो ओतलं ? ज्या मर्दानं आपल्या जिवाची कदर न करतां आज विसाजीच्या हातून माझी अब्रू राखली त्या-या देवाला, माझ्या डोळ्यांदेखत गाईंच्या दावणीला लावणार ? बाबा, रानटींतला रानटी प्राणीसुद्धां आपल्या उपकारकर्त्याचा बंदा होतो. पण बाबा ! गाईंच्या रक्तपातानं न द्रवणारं आपलं फरसबंदी हृदय, या तुमच्या छोरीच्या अश्रूंनीं विरघळेल का ?-जिवाची तळमळ-तडफडाट होतो ! गरीब गाईंच्या हंबरड्यानं न वळणारा तुमचा सैतानी जीव या तुमच्या गुल्शन, च्या हंबरड्यानं वळेल का ? बोला, बाबा, बोला—

**गुलाबखान**—क्या ? उपकाराच्या काल्पनिक बंधनानें माझ्या महत्त्वाकांक्षेला मी पायबंद घालूं ? ज्या काफर लोकांना खतम् करण्याकरितां, हृदयांत क्रूरपणा बाणावा म्हणून कसाईखान्यांत बारा वर्षें गाईंची कत्तल करून हृदयाचा फत्तर बनवला

**गजरा**—रामाच्या नांवानं भूत पळून जातं म्हणतात; पण तें हिंदूचं असेल तर! हें तर 'रहीम-अल्ला' बडबडतंय् ! ही कांहींतरी मुसलमानी चेष्टा असावी ! आतां काय करूं रे देवा ? आतां थोडी लबाडीच करूं का ? (उघड) रहीम-अल्ला—

**अल्ला**—(स्वगत) ये क्या न्यारी मजा ? रहीम-अल्ला ! म्हणजे पहिल्याच सैतानानें आपली हिंदी पगडी फिरवली वाटतें ? का या पडीक जागेंतली सारीच भुतावळ खडी झाली ? तोबा-तोबा—

**गजरा**—भीतीनं जिभेचा लोळा-गोळा झालाय् ! डोळे उघडून पाठीशीं सैतान आहे का एकादा धटिंगण आहे तें पाहण्याची सुद्धां सोय उरली नाहीं ! तरी आईनं मरतांना मला निरवून सांगितलं होतं कीं, "पोरी, सांज झाली कीं भरल्यासरल्या अंगीं एकटी म्हणून बाहेर पडूं नकोस; तूं आहेस हलक्या अंगाची !"

**अल्ला**—पाहूं का डोळे उघडून ? पण या अंधारांत दिसणार तरी काय ! आणि पाहण्याची छाती होणार तरी कुणाला ? डोळे कुणीं हातांत दिले काढून तरी दिसणार नाहीं कांहीं ! अल्ला ! भीतीशीं बिलकूल संबंध नसणारे असे आणखी दोन डोळे ऐन प्रसंगीं उपयोगी पडण्याकरितां प्रत्येक मनुष्याला दिले असतेस तर काय मजा आला असता ! या वेळीं ते डोळे उघडून या सैतानापुढें बेडर उभा राहिलों असतों !

**गजरा**—भूत तर खात्रीनं नव्हे ! इतक्या वेळांत मला झपाटल्याशिवाय खात्रीनं राहिलं नसतं ! विचारतेंच एकदम-मग होईल तसं जाईल ! ! आई अंबाबाई, तूं नसलीस तरी तुझं शस्त्र तरी माझ्या हातीं आहे. मला धीर दे ! (उघड) कोण रे तूं ? बोलत कां नाहींस ? (स्वगत) सुटलें एकदांची.

**अल्ला**—खुदा या-क्या तेरी अल्लाकी दैना ?-मै-मै अल्ला—

**गजरा**—कौन-अल्ला ? (स्वगत) चांगलाच पेंचांत सांपडला आहे ! याचा माझ्या मागचा भुंगा कायमचा घालविण्याकरतां चांगलीच संधि आहे ही. (उघड) इधर कायकू वास्ते ?

**अल्ला**— (स्वगत) आज दिन केलेली गाईची काटाकाट मलाच काटण्याकरतां उभी राहिली कीं काय ? याच घडीला रात्र कशी पडली ? अल्लाला माझी नाहीं-पण आपल्या नांवाची तरी कांहीं कदर असायला पाहिजे होती ! क्या बुरा वख्त आया ? सैतान तर मला मुळींच दिसेना. मी मात्र सैतानाच्या पुरा

काबूंत गेलों ! या डोळ्यांत रात्रीच्या वेळीं चंद्रज्योतीचा प्रकाश पडण्याची कांहींतरी खुबी अल्लानें करायला पाहिजे होती !

**गजरा**—सवाल क्यौं नहीं ?—

**अल्ला**—( स्वगत ) दिल्लीपलीकडे बर्फाचा एक बडा डोंगर आहे म्हणतात ! मला वाटतें अशाच एकाद्या घडीला भीतीनें गारठून थिजलेला तो एक माझ्या-सारखा अजब प्राणी असावा !–गारठून गेलों अगदीं !

**गजरा**—जबान खोलो—

**अल्ला**—( स्वगत ) जबान या वेळीं तुटून गेली असती किंवा देखतां देखतां या देहाची इमारत फरारी करण्याचा तकवा जर या पायांत असता, तर या सैतानाच्या हातावर याच घडीला तुरी दिल्या असत्या !

**गजरा**—गडबड करेगा तो तेरी हात, पाव सब कटवा देंगे !—

**अल्ला**—( स्वगत घाबरून ) अफसोस ! तुकडे पडणारे अवयव अल्लानें मनुष्याला मुळींच न देतां जर त्याला एखादा जिवंत गोळा बनवलें असतें तर काय बहार होती ? अस्साच्या अस्सा गडगडत एखाद्या सांधीकोंपऱ्यांत पोबारा केला असता ! छेः! अशा बेहिमती जिण्यानें मरण्यापेक्षां हातपाय हालवून मेलेलें काय वाईट ?

**गजरा**—( स्वगत ) आतां मूळ मुद्द्यावरच यावं (उघड) अल्ला, तुमने गजरा नामका छोरीकू बहोत सताया है ! ये बात सच्ची ?

**अल्ला**—बिलकूल नहीं ! जबान कलम केली तरीसुद्धां कबूल करणार नाहीं ! आषकबाजींत तकलीफ बिलकूल नहीं !

**गजरा**—मगर ओ छोरी तुमारेपर आषक नहीं ये बात सच्ची ?

**अल्ला**—नहीं, जनाना गोषाच्या आडमार्गानेंच लपत छपत आषकबाजी करीत असतो ! मर्दाची खुली सलामी, पापणीच्या पडद्याआड, नजरेच्या जरबेंत ठेवण्यांत कोणतीही औरत तरबेज असते !

**गजरा**—बेशरम ! मर्दाच्या फाजीलपणाकडं त्या नुसती डोळेझांक करीत असतात एवढंच !

**अल्ला**—आणि त्यांच्या डोळेझांकीबरोबर आपल्याला कोणीच पाहात नाहीं अशा समजुतीनें, मर्दानें वाटेल तसा हमामाहुतुतु घातला तर तो दोष कुणाचा ?

**गजरा**—एकच सवाल ! गजराका नाद छोडनेकू तुम तय्यार है क्या नहीं ?

अल्ला—( स्वगत ) गजरानेंच माझ्यावर मारेकरी घालून शेवटीं हा असा उलटा डाव साधला काय ? इष्काची गुलाबी खुलावट कधीं कधीं रक्ताच्या रंगानें रंगून निघते त्यांतलाच हा वख्त गुदरला ! या अल्ला—

गजरा—जबाब ?

अल्ला—एकदम बंद—

गजरा—बोलो-गजराका नाद छोडनेकू तुम् तैयार है क्या नहीं ?

अल्ला—( स्वगत ) कांहीं केलें तरी खतम् होणारच ! जिवंत राहून इष्काला मरण्यापेक्षां, जीव जाऊन इष्काचा निरोप घेतलेला काय वाईट ? ( उघड ) नाहीं !

गजरा—नहीं ? फिर मरनेकू तय्यार रहो !

अल्ला—( स्वगत ) तोबा-तोबा ! परवर-दिगार ! गजराजान ! तुमारा नामपर ये जान आज कुर्बान है !

गजरा—( स्वगत ) अगबाई, आतां ? याला 'मरायला तयार हो' म्हणून सांगितलं पण या अंधारांत हा जर आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळायला लागला, तर याची गर्दन उतरण्याऐवजीं माझाच कुठं तरी कपाळमोक्ष व्हायचा !

अल्ला—( स्वगत ) क्या ? अजून गर्दन उतरली नाहीं ? ये क्या अजब तमाशा ? सैतानांतच जोर नाहीं कीं मीच पुन्हा जिवंत झालों ? छेः, अंधारांतले घोंटाळे अल्लाला सुद्धां उमगणार नाहींत म्हणतात तें खरं ऑ ?

गजरा—( स्वगत ) हा पळाला कीं काय ? या अंधारानें सारा घोंटाळा केला ! पण दिवस असता तर मलाच पळतां भुई थोडी झाली असती ! छे—असली संधि दवडणं बरं नाहीं ! ( उघड )-अल्ला !

अल्ला—उपटला सैतान !

गजरा—मरनेकू तैय्यार ?

अल्ला—हां तैय्यार ! अल्ला, तेरा नाम सलामत रखो—

गजरा—( स्वगत )-नसती धांवपळ करून स्वतःच कुठं तरी तडफडण्यापेक्षां लांबूनच आवाजाच्या रोंखानं, भालाफेंकीप्रमाणं तरवार झुगारावी झालं ! आयुष्याची दोरी भक्कम असेल तर चुकेल नेम आणि तीच जर सरली असेल, तर तरवारीच्या नुसत्या वाऱ्यानंसुद्धां तुटून जाईल. ( उघड ) मर जा, अल्ला ! ( तरवार फेंकते. )

अल्ला—या अल्ला, खुदा, मर गया-मर गया ( मेल्याप्रमाणें खालीं पडतो. )

गजरा—(स्वगत) हा तर 'मरगया' ओरडला ! आणि तरवार तर खालीं पडल्याचा आवाज आला ! हा खरंच मेला कीं मेल्यानं मेल्याचं नुसतं सोंग केलं ! कांहींच कळत नाहीं ! पुढंही होण्याचं धाडस होईना ! आतां पारडं उलटणार कीं काय ?

अल्ला—( पडल्या जागेवरून ) मी खराच जिवंत आहें कीं सैतानच फरारी झाला ? कीं मीच सैतानाच्या राज्यांत आहें ?

गजरा—( स्वगत ) करावाच जिवाचा धडा ! पाहतें हळूच मेला कीं काय तें ! मेला असला तर करावा पोबारा—(हळुहळू चालूं लागते.)

अल्ला—( स्वगत ) पावलांची चाहूल ! अफ़सोस ! या वेळीं माझ्यावर जर एकदम कबर उत्पन्न होईल तर आतां खात्रीनें वांचेन—

गजरा—कुठंच नाहीं ! मेला पळाला कीं काय ? ( अल्लाला पाय लागून अडखळते ) अगबाई, हा तर मेला जिवंत ! कीं नुसता भास ? अल्ला-हलत सुद्धां नाहीं, मी गजरा—

अल्ला—(एकदम उठून) कोण ? गजरा ! भले बहाद्दर ! मग इतका वेळ मीं धोतरा खाल्ला होता कीं काय ?

गजरा—( स्वगत ) हं भरलीं आतां शंभर ! मेल्या बायकी बुद्धीनं दगा दिला ! आतां आल्या प्रसंगाला तोंड दिलंच पाहिजे.

अल्ला —हरामजादी ! तरवारीनं मान कापणार होतीस नाहीं ? बोल, इथें कशी आलीस ?

गजरा—जसा तूं तशीच मी !

अल्ला—माझ्या जिवावर उठण्याकरतां ?

गजरा—आणि मघाशीं तूं शिवाजीच्या जिवावर उठला होतास तेव्हां ?

अल्ला—म्हणजे ? मघांचा घोंटाळा तूं केलास तर ? तरी म्हटलें या अल्लाचा मनसुबा फसला कसा ? हरामजादी—

गजरा—हां—सबूर अल्ला ! मघांशीं तूं कुणाला दुखवलं आहेस ध्यानांत आहे ना ? त्याच्याच बाजूनं वागलास तर तुझं कोटकल्याण होईल; नाहीं तर—

अल्ला—जान गमवायचा वख्त आला तरी हरकत नाहीं; पण धन्याचें निमक विसरणार नाहीं !

त्याच काफरांचा राजा-माझ्या महत्त्वाकांक्षेच्या आड येणारा माझा हाडवैरी-आपण होऊन माझ्या हातीं लागला असतांना, त्याला सोडूं ? हं : ! गुल्शन, जन्मसंबंधाचे नाजूक धागे जगाच्या महत्त्वाकांक्षेच्या ओढाताणींत तुटत असतात ! चल-दूर हो ! अल्ला !—

अल्ला—हां हुजूर ! ( जवानांस )-चलो-पकडो—

गुल्शन—( मध्यें येऊन ) ठेरो-अल्ला-ठेरो ! साहेब ! बापाचं नातं तोडून तुम्हीं मला दूर झुगारून दिलंत; द्या ! पण मला माझ्या माणुसकीला सोडतां येत नाहीं ! तुम्हांला बजावून सांगतें-जिकडे भोंसले तिकडे ही गुल्शन ! ज्यानं दोनदां माझ्याकरतां आपल्या प्राणावर संकट ओढून घेतलं त्याच्यावरून बाबा, या गुल्शनचा जान कुर्बान !! चला, न्या-मलाही न्या !! अल्लाघरची ही बिनमोल दौलत जर कसाईखान्यांत आज अशी खतम् होणार असेल-तर इलाही-असलं अस्मानी जवाहीर तूं पैदा तरी कां केलंस ?

गुलाबखान—क्या ? काफराच्या वतीनें माझ्याशीं दुष्मनगिरी ? गुल्शन, ही छाती कुणाची आहे माहीत आहेना ?

गुल्शन—आहे-पूर्ण माहीत आहे कीं ही छाती एका कसायाची आहे ! बापाची नाहीं !

गुलाबखान—बहोत आच्छा—

गुल्शन—भोसले-भोसले ! क्या कहूं ? इलाही, तुमारी इस दुनियाको रियासद खलास हो गयी क्या ?

शिवाजी—नाहीं, गुल्शन ! इलाहीची रियासद दुनियेंत नांदते म्हणूनच दुनिया चालते ! गुल्शन, माझ्याबरोबर हाल सोसण्याचा हट्ट सोडून दे ! संकटांशीं झगडतां झगडतां मरणें हा आम्हां वीरांचा धर्म आहे ! स्त्रियांचा नाहीं ! गुल्शन, स्त्रीजातीच्या कल्याणाकरतां जिवाला मुकण्यांत खरा पुरुषार्थ आहे ! आणि म्हणूनच तुझ्यासारख्या दुबळ्या गाईच्या करतां मान देत असतांना या शिवाजीला मुळींच वाईट वाटत नाहीं ! गाईप्रमाणें गरीब असणाऱ्या स्त्रीजातीच्या अभिमानी एकनिष्ठ हृदयाची जाणीव या शिवाजीला पूर्णपणें आहे.

गुल्शन—मग त्या गाई असल्या मर्दाची मान राखण्याकरतां आपल्या माना मृत्यूला कां बहाल करणार नाहींत ?

गुलाबखान—अल्ला—

अल्ला—हुजूर—

गुलाबखान—पकडो—

गुलशन—(शिवाजीनें दिलेली तरवार उपसून) क्या मगदूर है तेरी ?

गुलाबखान—या अल्ला ! ये क्या हुवा ?–तोबा तोबा ! अल्ला, सुरा खेंचो—

अल्ला—अफसोस ! सुरा कसाईखान्यांत हुजूर !

गुलशन—अल्ला, चले जाव !

[ पडद्यांत शहाजीचे लोक—" सरकार, भिऊं नका. भिऊं नका ! शाबास शाबास ! दरवाजा फोडा " असें ओरडतात.]

गुलाबखान—या अल्ला ! हे तर शहाजीचे लोक ! हे कसे घुसले आंत ?

अल्ला—हुजूर, हुकुमाप्रमाणें त्यांना गिरफदार करून सदरेला बांधून ठेवलें होतें ! मगर ये क्या हुवा अल्लाके मालुम ! !

[ शहाजीचे लोक येऊन तरवारी उपसतात. शिवाजीला पकडण्याकरितां अल्ला व जवान पुढें होतात. गुलशन मध्यें येऊन सर्वांना रोखून धरते.]

गुलशन—दिलवर !

शिवाजी—गुल्शन, मृत्यूबरोबर तुझा विसर या शिवाजीला पडेल ! !

[ तरवारी रोखून जातात.

---

## प्रवेश दुसरा

[ स्थळ—विजापूर. गुलाबखानाच्या वाड्याची एक पडकी बाजू. एका बाजूनें गजरा समशेर घेऊन व दुसऱ्या बाजूनें अल्ला पाठमोरे प्रवेशतात. ]

गजरा—( अल्लाचा धक्का लागतांच )–'इडा पिडा टळो नी अमंगळ पळो रे देवा !' असल्या पडीक जागेंतसुद्धां कोण आलं मेलं धडपडायला ?–राम-राम ! ( डोळे झांकते.)

अल्ला—या अल्ला ! ये क्या पिडा ! सताड जागेंत सैतानाचा राहावा असतो म्हणतात; त्यांतला तर हा प्रकार नाहीं ना ? रहीम-अल्ला रहीम-अल्ला—

**गजरा**—रामाच्या नांवानं भूत पळून जातं म्हणतात; पण तें हिंदूचं असेल तर! हें तर 'रहीम–अल्ला' बडबडतंय्! ही कांहींतरी मुसलमानी चेष्टा असावी! आतां काय करूं रे देवा? आतां थोडी लबाडीच करूं का? (उघड) रहीम-अल्ला—

**अल्ला**—(स्वगत) ये क्या न्यारी मजा? रहीम-अल्ला! म्हणजे पहिल्याच सैतानानें आपली हिंदी पगडी फिरवली वाटतें? का या पडीक जागेंतली सारीच भुतावळ खडी झाली? तोबा–तोबा—

**गजरा**—भीतीनं जिभेचा लोळा-गोळा झालाय्! डोळे उघडून पाठीशीं सैतान आहे का एकादा घटिंगण आहे तें पाहण्याची सुद्धां सोय उरली नाहीं! तरी आईनं मरतांना मला निरवून सांगितलं होतं कीं, "पोरी, सांज झाली कीं भरल्यासरल्या अंगीं एकटी म्हणून बाहेर पडूं नकोस; तूं आहेस हलक्या अंगाची!"

**अल्ला**—पाहूं का डोळे उघडून? पण या अंधारांत दिसणार तरी काय? आणि पाहण्याची छाती होणार तरी कुणाला? डोळे कुणीं हातांत दिले काढून तरी दिसणार नाहीं कांहीं! अल्ला! भीतीशीं बिलकूल संबंध नसणारे असे आणखी दोन डोळे ऐन प्रसंगीं उपयोगी पडण्याकरितां प्रत्येक मनुष्याला दिले असतेस तर काय मजा आला असता! या वेळीं ते डोळे उघडून या सैतानापुढें बेडर उभा राहिलों असतों!

**गजरा**—भूत तर खात्रीनं नव्हे! इतक्या वेळांत मला झपाटल्याशिवाय खात्रीनं राहिलं नसतं! विचारतेंच एकदम–मग होईल तसं जाईल!! आई अंबाबाई, तूं नसलीस तरी तुझं शस्त्र तरी माझ्या हातीं आहे. मला धीर दे! (उघड) कोण रे तूं? बोलत कां नाहींस? (स्वगत) सुटलें एकदांची.

**अल्ला**—खुदा या–क्या तेरी अल्लाकी दैना?–मै–मै अल्ला—

**गजरा**—कौन–अल्ला? (स्वगत) चांगलाच पेंचांत सांपडला आहे! याचा माझ्या मागचा भुंगा कायमचा घालविण्याकरतां चांगलीच संधि आहे ही. (उघड) इधर कायकू वास्ते?

**अल्ला**—(स्वगत) आज दिन केलेली गाईची काटाकाट मलाच काटण्या-करतां उभी राहिली कीं काय? याच घडीला रात्र कशी पडली? अल्लाला माझी नाहीं–पण आपल्या नांवाची तरी कांहीं कदर असायला पाहिजे होती! क्या बुरा वख्त आया? सैतान तर मला मुळींच दिसेना. मी मात्र सैतानाच्या पुरा

काबूत गेलों ! या डोळ्यांत रात्रीच्या वेळीं चंद्रज्योतीचा प्रकाश पडण्याची कांहींतरी खुबी अल्लानें करायला पाहिजे होती !

**गजरा**—सवाल क्यौं नहीं ?—

**अल्ला**—( स्वगत ) दिल्लीपलीकडे बर्फाचा एक बडा डोंगर आहे म्हणतात ! मला वाटतें अशाच एकाद्या घडीला भीतीनें गारठून थिजलेला तो एक माझ्या-सारखा अजब प्राणी असावा !–गारठून गेलों अगदीं !

**गजरा**—जबान खोलो—

**अल्ला**—( स्वगत ) जबान या वेळीं तुटून गेली असती किंवा देखतां देखतां या देहाची इमारत फरारी करण्याचा तकवा जर या पायांत असता, तर या सैतानाच्या हातावर याच घडीला तुरी दिल्या असत्या !

**गजरा**—गडबड करेगा तो तेरी हात, पाव सब कटवा देंगे !—

**अल्ला**—( स्वगत घाबरून ) अफसोस ! तुकडे पडणारे अवयव अल्लानें मनुष्याला मुळींच न देतां जर त्याला एखादा जिवंत गोळा बनवलें असतें तर काय बहार होती ? अस्साच्या अस्सा गडगडत एखाद्या सांधीकोंपऱ्यांत पोबारा केला असता ! छेः! अशा बेहिमती जिण्यानें मरण्यापेक्षां हातपाय हालवून मेलेलें काय वाईट ?

**गजरा**—( स्वगत ) आतां मूळ मुद्द्यावरच यावं (उघड) अल्ला, तुमने गजरा नामका छोरीकू बहोत सताया है ! ये बात सची ?

**अल्ला**—बिलकूल नहीं ! जबान कलम केली तरीसुद्धां कबूल करणार नाहीं ! आषकबाजींत तकलीफ बिलकूल नहीं !

**गजरा**—मगर ओ छोरी तुमारेपर आषक नहीं ये बात सच्ची ?

**अल्ला**—नहीं, जनाना गोषाच्या आडमार्गानेंच लपत छपत आषकबाजी करीत असतो ! मर्दाची खुली सलामी, पापणीच्या पडद्याआड, नजरेच्या जरबेंत ठेवण्यांत कोणतीही औरत तरबेज असते !

**गजरा**—बेशरम ! मर्दाच्या फाजीलपणाकडं त्या नुसती डोळेझांक करीत असतात एवढंच !

**अल्ला**—आणि त्यांच्या डोळेझांकीबरोबर आपल्याला कोणीच पाहात नाहीं अशा समजुतीनें, मर्दानें वाटेल तसा हमामाहुतुतू घातला तर तो दोष कुणाचा ?

**गजरा**—एकच सवाल ! गजराका नाद छोडनेकू तुम तयार है क्या नहीं ?

अल्ला—( स्वगत ) गजरानेंच माझ्यावर मारेकरी घालून शेवटीं हा असा उलटा डाव साधला काय ? इष्काची गुलाबी खुलावट कधीं कधीं रक्ताच्या रंगानें रंगून निघते त्यांतलाच हा वख्त गुदरला ! या अल्ला—

गजरा—जबाब ?

अल्ला—एकदम बंद—

गजरा—बोलो–गजराका नाद छोडनेकू तुम् तैयार है क्या नहीं ?

अल्ला—( स्वगत ) कांहीं केलें तरी खतम् होणारच ! जिवंत राहून इष्काला मरण्यापेक्षां, जीव जाऊन इष्काचा निरोप घेतलेला काय वाईट ? ( उघड ) नाहीं !

गजरा—नहीं ? फिर मरनेकू तय्यार रहो !

अल्ला—( स्वगत ) तोबा–तोबा ! परवर-दिगार ! गजराजान ! तुमारा नामपर ये जान आज कुर्बान है !

गजरा—( स्वगत ) अगबाई, आतां ? याला 'मरायला तयार हो' म्हणून सांगितलं पण या अंधारांत हा जर आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळायला लागला, तर याची गर्दन उतरण्याऐवजीं माझाच कुठं तरी कपाळमोक्ष व्हायचा !

अल्ला—( स्वगत ) क्या ? अजून गर्दन उतरली नाहीं ? ये क्या अजब तमाशा ? सैतानांतच जोर नाहीं कीं मीच पुन्हा जिवंत झालों ? छेः, अंधारांतले घोंटाळे अल्लाला सुद्धां उमगणार नाहींत म्हणतात तें खरं आँ ?

गजरा—( स्वगत ) हा पळाला कीं काय ? या अंधारानें सारा घोंटाळा केला ! पण दिवस असता तर मलाच पळतां भुई थोडी झाली असती ! छे–असली संधि दवडणं बरं नाहीं ! ( उघड )–अल्ला !

अल्ला—उपटला सैतान !

गजरा—मरनेकू तैय्यार ?

अल्ला—हां तैय्यार ! अल्ला, तेरा नाम सलामत रखो—

गजरा—( स्वगत )–नसती धांवपळ करून स्वतःच कुठं तरी तडफडण्यापेक्षां लांबूनच आवाजाच्या रोंखानं, भालाफेंकीप्रमाणं तरवार झुगारावी झालं ! आयुष्याची दोरी भक्कम असेल तर चुकेल नेम आणि तीच जर सरली असेल, तर तरवारीच्या नुसत्या वाऱ्यानंसुद्धां तुटून जाईल. ( उघड ) मर जा, अल्ला ! ( तरवार फेंकते. )

अल्ला—या अल्ला, खुदा, मर गया–मर गया ( मेल्याप्रमाणें खालीं पडतो. )

**गजरा**—(स्वगत) हा तर 'मरगया' ओरडला ! आणि तरवार तर खालीं पडल्याचा आवाज आला ! हा खरंच मेला कीं मेल्यानं मेल्याचं नुसतं सोंग केलं ! कांहींच कळत नाहीं ! पुढंही होण्याचं धाडस होईना ! आतां पारडं उलटणार कीं काय ?

**अल्ला**—( पडल्या जागेवरून ) मी खराच जिवंत आहें कीं सैतानच फरारी झाला ? कीं मीच सैतानाच्या राज्यांत आहें ?

**गजरा**—( स्वगत ) करावाच जिवाचा धडा ! पाहतें हळूच मेला कीं काय तें ! मेला असला तर करावा पोबारा—(हळुहळू चालूं लागते.)

**अल्ला**—( स्वगत ) पावलांची चाहूल ! अफ़सोस ! या वेळीं माझ्यावर जर एकदम कबर उत्पन्न होईल तर आतां खात्रीनें वांचेन—

**गजरा**—कुठंच नाहीं ! मेला पळाला कीं काय ? ( अल्लाला पाय लागून अडखळते ) अगबाई, हा तर मेला जिवंत ! कीं नुसता भास ? अल्ला-हलत सुद्धां नाहीं, मी गजरा—

**अल्ला**—(एकदम उठून) कोण ? गजरा ! भले बहाद्दर ! मग इतका वेळ मीं धोतरा खाल्ला होता कीं काय ?

**गजरा**—( स्वगत ) हं भरलीं आतां शंभर ! मेल्या बायकी बुद्धीनं दगा दिला ! आतां आल्या प्रसंगाला तोंड दिलंच पाहिजे.

**अल्ला**—हरामजादी ! तरवारीनं मान कापणार होतीस नाहीं ? बोल, इथें कशी आलीस ?

**गजरा**—जसा तूं तशीच मी !

**अल्ला**—माझ्या जिवावर उठण्याकरतां ?

**गजरा**—आणि मघाशीं तूं शिवाजीच्या जिवावर उठला होतास तेव्हां ?

**अल्ला**—म्हणजे ? सर्वांचा घोंटाळा तूं केलास तर ? तरी म्हटलें या अल्लाचा मनसुबा फसला कसा ? हरामजादी—

**गजरा**—हां—सबूर अल्ला ! मघाशीं तूं कुणाला दुखवलं आहेस ध्यानांत आहे ना ? त्याच्याच बाजूनं वागलास तर तुझं कोटकल्याण होईल; नाहीं तर—

**अल्ला**—जान गमवायचा वख्त आला तरी हरकत नाहीं; पण धन्याचें निमक विसरणार नाहीं !

गजरा—आणि गजरा !

अल्ला—इकाच्या सामुदे सारे रंग फिके पडतात ! प्यारी सुनाव—

गजरा—( स्वगत ) वेळ आली आहे, तर गुल्शनबीचं एक काम साधावं. उपयोग होईल केव्हां तरी ! गुल्शनजान, तुझ्यापायीं बरं हा लपंडाव. ( उघड ) तर मग वाटेल त्या वेळीं गुल्शनजानला सदर खुली पाहिजे ! "शिवाजी" शब्दाबरोबर सदर खुली पाहिजे—

अल्ला—एकदम नहीं ! शिवाजीचें नांव नाहीं घेऊं देणार.

गजरा—तुझ्या आवडत्या गजरेचं न।व घेतील त्या. मग तर हरकत नाहीं ?

अल्ला—बिलकूल नहीं ! मगर मेरा तकदीरका कवाड कभी खोलेगा ?

गजरा—एकदम ! मात्र आजचा सारा प्रकार, या कानाचा त्या कानाला कळतां कामा नये ! शिवाजीराजे विजापुरांतून हालले कीं तुझ्या भाग्याची सदर उघडलीच म्हणून समज !

अल्ला—अल्लाकी कसम ?

गजरा—अल्ला, तेरी कसम—

पद ११ वें [ कवाली ]

**प्रेमचतुरा बाला । मूक वदे बोला रे ॥धृ०॥ नच**
**अनुराग कधीं । कांत-पदीं जव जडतां । दचकत**
**चालतसे । चंचलता नच उचिता ॥ १ ॥**

---

## प्रवेश तिसरा

[ स्थळ—विजापुर. गोलघुमट. रात्रीच्या वेळीं गुल्शन प्रवेशते.]

गुल्शन—हरदिन या गुल्शनचा दिल् राजे शिवाजीच्याच पायीं अधिकाधिक कां बरं गुंतला जावा ? त्या रणमर्दाला देखतां साऱ्या नात्यांचा विसर पडून, मनाची समाधि लागते ! विसाजीसारख्या बिनदिलाच्या मनुष्याच्या चित्रांतली सैतानी वृत्ति कुठं आणि अस्मानी ध्येयामागं लागलेल्या या मराठा बहादूराच्या



गजरा—प्रेम चतुराबाला। मूक वदे बोला रे ॥ धृ० ॥

अंक २ रा—पान ३२.



गुलशान—मजला बोले माझा राजा ॥

अंक २ रा—गान ३३.

गोड जादूची भुलावणी कुणीकडे ! बापाच्या कसाई दुर्गंधींत कुजत पडलेल्या या गुल्शनचा बहर, त्यां शिवदर्शनाबरोबर फुलून गेला ! इलाहीच्या अवतारा, जिवाच्या जादुगारा, तुझ्या जिव्हाळ्याच्या चढत्या निशेबरोबर, दुनियेची अटक तोडून, जीव उल्हासानं तुझ्या अस्मानी ध्येयांत विरून जाण्याकरितां मोकाट सुटला ! जिवाचा बुल्बुल हृदयाच्या पिंजऱ्यांतून तुझ्या पावित्र्याच्या गगनीं गुंगून गेला—

पद १२ वें. [ राग–पहाडी, कवाली ]

**मजला । बोले । राजा । लीले । खेळे । नयनीं**
**डोले, बोले माझा । राया ॥ ध्रु० ॥ अनुरति हृदया ।**
**नवथर दरिया । उसळे राया । देह-धन मन ।**
**क्षणक्षण उधळुनी । प्रेम-रस-रंग-प्याले । प्याले ।**
**न्हाले ॥ १ ॥**

छत्रपति शिवराय, प्यारे दिलोजान, माझ्या दिलाचं फूल करून तुझ्या पूजेला हजर ठेवीन ! पण राजा, राष्ट्रदेवीची पूजा तूं आपल्या मस्तकाच्या फुलानं करणार. माझ्या परधर्मी जीवाची त्यापुढं काय मोहबत ? पण राजे, फूल होण्याची योग्यता नसलेली ही महमदी गुल्शन राष्ट्रमातेच्या मंदिराकडे जाणाऱ्या तुझ्या पायवाटेवर आपल्या निष्पाप रक्ताचा गालीचा पसरून ठेवील ! हाच माझा इतमाम ! बोला-बोलाचा पडसाद देणाऱ्या या बोलघुमटाच्या कारागिरीनं जगाला थक्क केलं असेल, पण ज्यानं साऱ्या महाराष्ट्राला एकच बोल बोलायला लावलं त्या कारागिरापुढं माझ्यासारखे किती जीव आपली दिलदौलत उधळून देतील ! पण पतित पित्यां-च्या या पापी पोरीची पूजा, त्या राष्ट्रमाईला रुचेल का ? जन्मानं पतित, पण कर्मानं, मनानं पवित्र असणाऱ्या जिवाचा मनोभावाचा नजराणा कुणाच्याही पायीं साजूनच दिसणार ! राष्ट्रमातेला धर्माधर्माचा विचार नसतो; जिवंत प्रेमाची ती भुकेली असते.

शिवाजी—( प्रवेशून ) कोण ? कोण तें ?

गुल्शन—छत्रपतींच्या पायांची दासी !

शिवाजी—माझी सई मला या शब्दानें संबोधते !

गुल्शन—इतकी कुठं आहे या जिवाची योग्यता !

**शिवाजी**—मग कोण ? या बोलघुमटाची पहाटेची मजा पाहण्याकरतां येतांच, दर्शन देण्याकरतां त्यांतून उतरलेली स्वर्गीय मूर्तिमंत कला-देवी ?

पद १३ वें. [ राग–रामकली, त्रिवट ]

**विचरे कला । का मंदपायीं? । निरखावया । शोभा स्वयें ही ? ॥ ध्रु० ॥ सुरलोक-रामा । अरुणानुगामा । उडु-लेणीं ल्याली । प्रसरे विभा ही ॥ १ ॥**

**गुलशन**—नाहीं–मी गुल्शन ! दिलवर, आपल्या गुणांवर बेहोष झालेली दुबळी—

**शिवाजी**—या पवित्र मंगल वेळेला ? साजन, किती बिनमोल शुभशकून, तूं प्रत्येक वेळीं करतेस ? या शिवाजीची भाग्यदेवी तर नाहींस तूं ?

**गुलशन**—इतकं भाग्य या गुल्शनच्या वांट्याला कुठून येणार ? राजा तुझ्या पराक्रमसूर्याभोंवतीं प्रदक्षिणा घालणारी मी एक चिमुकली चांदणी ! मी–अनाथ—

**शिवाजी**—अनाथ ! गुल्शन अनाथ ? गुल्शन–प्यार गुल्शन, या शिवाजीचे बोल जर उपहासांत गणले जाणार नसले तर, गुल्शन, या शिवाजीच्या हातीं तुझा हात असतांना तूं अनाथ कशी असशील ? शब्दाकरतां शीर देणाराचे हे शब्द आहेत ! गुल्शन, ध्येयापायीं प्रसंगीं जन्मदात्याला विसरणाराचे हे शब्द आहेत !

**गुलशन**—काय-काय ऐकतें मी ? हा जिवाचा आधार-माझ्या सुखाचा ठेवा असा एकाएकीं माझ्या हातीं आला ?

**शिवाजी**—वेडी कल्पना तुझी ! गुल्शन, दिशाभूल तर नाहीं झाली तुझी ? मनांत आणलें तर प्रत्येक जीवाला–साऱ्या देशाला सांवरून धरतां येईल ! एवढाच माझा हेतु. गुल्शन, तुझ्या बोलण्याचा रोख—

**गुलशन**—अझून तुझ्या ध्यानीं नाहीं आला ? शिवराय, माझी भुलावणी नको रे करूं ! आशेचा मोह पाडून निराशेच्या जाळ्यांत हा भोळा जीव फशीं गुंतवूं नकोस ! सांग–सांग तुझी भाग्यदेवी नाहीं, पण तुझी पायधूळ दासी तरी—

**शिवाजी**—अरेरे ! गुल्शन, काय बोलतेस हें ? मी नाहीं तुझी भुलभुलावणी केली, पण तूं मात्र स्वतः फसून मलाही फसवूं पाहतेस ! गुल्शन, हे नादान विचार या शिवाजीच्या हृदयांत नाहींत ! मासाहेबांच्या शिकवणीनें या शिवाजीला या मायामय नात्यांचा पुरा संन्यास आला आहे ! लौकिक नात्यांचा फकीर हा शिवाजी, भलत्याच कल्पनांत रंगून गेला आहे ! गुल्शन, एक क्षणभर इकडे पहा.-हा पाहिलास या पहांटेच्या प्रसन्न वेळीं या दुनियेच्या पाठीवर उसळणारा हा रुपेरी दरिया ! धुक्याची कल्पना नाहींशी होऊन स्वर्गंगेचा महापूर या जीवमात्राला पावन करण्याकरतां स्वर्गांतून उसळून येत असावा असें वाटतें न वाटतें तोंच रात्रीच्या वेळीं हीं नक्षत्रांचीं दिव्य लेणीं लेवून, थाटामाटानें एकांताचा मनसुराद आस्वाद घेत बसलेल्या भूदेवीच्या पांढऱ्या पातळाचा हा पायघोळ तर नाहीं ना, असा मनोरम भास होतो ! पण गुल्शन, दहा कदमांपलीकडे दृष्टीचा दिमाख चालूं न देणाऱ्या, कल्पनेला धुंदकारून सोडणाऱ्या या रुपेरी दरियाच्या उसळत्या फेंसांत, अंशरूपानें दिसणाऱ्या दीनवाण्या जगाकडे कल्पनेला किंचित् ताण देऊन दृष्टि फेंक ! या मायामय शांत जादूच्या स्वर्गीय भुलावणीच्या पोटीं किती निराश्रित दुबळे जीव "त्राहि-त्राहि" म्हणून टाहो फोडीत असतील ? किती गरीब गाई उद्यांच्या निराशामय आशेची वाट पाहात असतील ?

**गुल्शन**—पण मोहवश झालेला जीव आंधळा असतो ! जगाच्या जहरी सुखाला लाथाडून, सुखाआड दडालेली दारुण दुःस्थिति त्याला पाहतां येत नाहीं !

**शिवाजी**—तीच दृष्टि माझ्या मासाहेबांनीं साफ केली ! हातीं आल्यापलीकडचें पाहण्याची संवय माझ्या मासाहेबांनींच मला लावली ! गुल्शन, माता—सुजाण माता म्हणजे दीन देशाच्या उद्धार करणाऱ्या जागत्या देवता आहेत.

पद १४ वें [ राग-कानडी, झपताल ]

**धन्य तुलना न या । मातृ-चरणा । विभव-धाम ।**
**मंगल मया ॥ ध्रु० ॥ गुणवत रामा । ललना-ललामा ।**
**प्रकटे भुवनि माता । शुचतावना ॥ १ ॥**

**गुल्शन**—माझं सुख या तकदिरीं नाहीं ! हा अभागी जीव जगांत आला आणि माझ्या माचा आत्मा अनंतांत विरून गेला ! 'मा' म्हणतांच केविलवाणा

'हमा' ओरडणाऱ्या छकुल्या वासरासमोर कत्तल होणाऱ्या गाईंचं चित्र डोळ्यांपुढं सायसंगीत उभं राहतं !

**शिवाजी**—आणि अशाच जीवांचा शोकाग्नि शांत करण्याकरतां प्रत्यक्ष परमात्मा प्रत्यहीं हे दैवाचे दुःखाश्रु भूदेवीच्या पदराआड गाळीत असतो. बेगम, ऐहिक मोहांत गुंगून जायला या शिवाजीला अवसरच नाहीं ! आज महंमदशहानें यावें, देशांत झोटिंगपादशाही गाजवून, हजारों गोरगरिबांची पशूप्रमाणें कत्तल करावी;-देवदयेनें या हिंदुस्थानांत कांहीं एक-राहिलें नाहीं,ही सुवर्णभूमि मातीमोल झाली-असें समजून देवांच्या मूर्ति सुद्धां फोडाव्यात; तुझ्या सारख्यांची इज्जत बेदरकार लुटावी; हजारों गाईंचे तांडे-जणुं काय त्यांना जीवच नाहीं, या समजुतीनें चराचर कापून सैतानाला सुद्धां लाज लावावी ! ज्या गोमातेच्या पायीं पोटाला मिळून आज या देशाचीं हाडें उभीं आहेत, त्याच गोमातेची कत्तल करून, तिच्या रक्तांत देशाच्या भाग्याचा चिखल करावा !

**गुल्शन**—पण ही व्यापक दृष्टि यायला, भांबावलेल्या जिवाला आपल्यासारख्यांच्या आसऱ्याची जरुरी कां वाटूं नये ? इलाहीच्या स्वरूपांत लीन होण्याकरतां-साधारण जनतेला, पहिली पायरी म्हणून तुमच्यांत दगडाच्या देवाची जरुरी असतेच ना ? सामान्य लोकांची दृष्टि गूढ, व्यापक कल्पनेंत स्थिरावत नाहीं !

पद १५ वें [ राग-बेहाग, त्रिताल ]

**वद कधि माया । सेवी मोहें विवेका ? ॥ ध्रु० ॥**
**विलासी जनाला । विकारी मनाला । विसावा सुखाचा । लाधे भोळ्या भावें । जगाया ॥ १ ॥**

**शिवाजी**—किती अल्लड ही कल्पना ? गुल्शन, प्रत्येक जिवानें जर स्वतःला सामान्य कोटींत ओढून घेतलें, तर ही मायदेशाची विटंबना अशीच कल्पांतापर्यंत अखंड चालू राहील ! सांग-सांग गुल्शन, हा मायदेश कुणाचा ?

पद १६ वें. [ कवाली ]

**सखि । देश हा कुणाचा । जो येइ यांत त्याचा ॥ कां ? ॥ घिर दारुणापदांचा । विकल्या मुक्या जिवांचा ? ॥ ध्रु० ॥ तें राम-राज्य गेलें । किति तख्त-**

राज मेले । ही आर्यभू विटाळे । भू-माय वार-योषा
॥ कां? ॥ १ ॥ हा हिंद-वासियांचा । ज्या जनि तयांत
त्यांचा । इतबार ना कुणाचा । दे देवतांसि थारा ॥२॥

सांग, या प्रश्नाचा शेवट कोण कधीं लावणार ? स्वतःच्या सुखांत गुंगून जाणाऱ्या जनतेच्या नादावलेल्या दृष्टीला, मायदेशाला आलेली ही केविलवाणी दशा केव्हां दिसणार ? सोन्याच्या झळाळीऐवजीं निःसत्त्व प्रेतांच्या हाडांची रांगोळी या भारतांत पसरली, तरी सुद्धां ही स्वतःच्या सुखाची लालसा पुरे नाहींच ना होत ?

**गुलशन**—काय बोलूं ? महाभाग, काय बोलूं ? शरमेच्या बोलांना तोंडांतून वाव नाहीं. हा नादान बेहिमती जीव तुझ्या गोड वाणीनं सुखावतो, पण दुसऱ्याच क्षणाला स्वतःच्या नालायकीमुळं दुःखी होतो ! अमृत तरी पचवतां आलं पाहिजे ना ?

**शिवाजी**—वैभवाच्या सोनेरी झळाळीऐवजीं गाईच्या निष्पाप दुबळ्या जिवांच्या देहांतून रक्ताचे भडक फवारे उफाळूं लागले; हिऱ्याऐवजीं गाईंचीं हाडें देशांत दिसूं लागलीं; हिमालयापासून कुमारीपर्यंत आणि कुमारीपासून विधवापर्यंत, दुबळ्या स्त्रीजातीच्या कर्कश किंकाळ्या एकसारख्या ऐकूं येऊं लागल्या तरी मी मोहांत पडूं ? बोल, भोळ्या जीवा, काय कारणानें तुला या शिवाजीचं इतकें वेड लागलें ?

**गुलशन**—आपलं वेड ? दुनियेच्या बागशाहींत असली खास इलाहीच्या झातची फुलवंतीची दौलत नांदतांना पाहून कुणाला वेड लागणार नाहीं ! गुणांच्या राजा, अरे एकजात औरतशाहीच्या दिलाचा खजीना तुझ्या पायीं हजर झाला पाहिजे ! सांग, धर्माचा प्रश्न आड येत असेल तर सांग; याच घडीला धर्माची अटक तोडून, मायेला दूर झुगारून -तुझ्या धर्मांत आनंदानं पाऊल टाकायला तयार आहें ! कां ? बोलत कां नाहींस ? जबरीनं शेंडी कापून दाढी वाढवलेला जातीचा हिंदु जर मुसलमान होतो तर आनंदानं धर्मांतर करून हिंदु व्हायला तयार झालेल्या महमदी जीवाला हिंदु धर्माचीं कवाडं कां बंद ?

**शिवाजी**—केवळ भिन्न धर्मांच्या भिन्न आनुवंशिक पण अवश्य असणाऱ्या संस्कारांमुळें ! गुलशन, राष्ट्रांतल्या धुरीणांनींच जर हा वर्णसंकर सुरू केला तर कालांतरानें मुसलमान, हिंदु, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्यांत खात्रीनें संकर सुरू होऊन आनुवंशिक संस्कारामुळें विशिष्ट जातींत वास्तव्य करणारें, राष्ट्राला

जिवंत राखणारें तेज, नामशेष होऊन कर्तव्याचा बोजवारा उडेल! समाजाच्या शक्तिसर्वस्वाला, चैतन्याला अवश्य असणारा हा वर्णभेद मोहाला बळी पडून मी कसा मोडूं! गुलशन, तुझ्या महंमदी धर्मांत कोणती गोष्ट वाईट आहे म्हणून तूं हें धर्मांतर करतेस? जगांतील कुशाग्र बुद्धिमत्तेला पटणाऱ्या तत्त्वाशिवाय कोणत्याही धर्माची स्थापना चिरस्थायी होत नाहीं! या हिंदु शिवाजीला हिंदु धर्माइतकाच आदर, गुल्शन, तुझ्या महंमदी धर्माबद्दल आहे! आज तूं मोहवश झाल्यामुळें हें धर्मांतर करशील, पण ही मोहाची पहिली कैफी लाट ओसरतांच जन्मधर्माच्या अभिमानानें, स्वीकारलेल्या धर्माच्या हमालीबद्दल तुझें तुलाच वाईट वाटेल! सोड, गुल्शन हा वेडा विचार सोडून दे!

**गुल्शन**—कसा सोडूं? आपल्याबद्दलच्या ज्या भावनेला हृदयाच्या पाळण्यांत अंगाई गाऊन आजवर मोठ्या आशेनं जिवंत ठेवून वाढविलं, त्याच जिवाशीं एकजीव झालेल्या भावनेचं प्रेत मी होऊन-भोंसले, भोंसले-कसं हो पाहूं? हृदयाचा पाळणा केला पण त्या पाळण्याची आज चिता कशी हो करूं? या गुल्शनचा इतका धीर होईल का? आपल्यासारख्या रणमर्दांना सरावामुळं हृदयाची चीरफाड करतांना कांहींच वाटत नसेल; पण औरतशाहीला केवळ भावनांचा सुद्धां खून सहन होत नाहीं! मी माझ्या प्रेमाचं प्रेत कसं पाहूं? त्या प्रेताच्या स्मशानयात्रेआधीं या डोळ्यांतलं पाणी ती चिता विझवायला पुढं होईल! राजे, हिंदवी स्वराज्याच्या तख्तावर पट्टराणी म्हणून नाहीं पण या पायींचे रुजामे झाडणारी-तुझ्या दैवी गुणांवर बेहोष झालेली एक बटीक म्हणून—

**शिवाजी**—गुल्शन, भोळ्या गुलबहार, अरेरे! काय हें? या शिवाजीचे दैवी गुण तुझ्यासारख्या भोळ्या जीवांच्या आयुष्याची जर अशी दारुण निराशाच करणार असले-हा शिवाजी जर हळव्या नारीजातीच्या तळतळाटालाच कारण होणार असला-तर त्या गुणांबरोबरच या देहाचाही शेवट—

**गुल्शन**—नका, पुढचे शब्द बोलूं नका! आपण जगाला मुकल्यावर राजे आपल्या मागोमाग-माझं आणि माझ्या प्रेमाचं प्रेत पडेल! माझ्या एकटीच्या निराशेपायीं हे चार खून करण्याइतक्या राक्षसी वृत्तीची ही गुल्शन नाहीं! राजे, आपल्या गुणांवर देशाच्या भाग्यदेवीचं कुंकूं असतांना मी एकटीच्या सुखापायीं त्या वैभवदेवतेच्या मंगलसूत्राला कां हात घालीन? असला लाखांतला मोहरा सलामत राखण्याकरतां माझ्या सारख्यांचे शेंकड्यांनीं

बळी पडले तरी काय हरकत ! राजे, आपल्या हातीं बसविली जाणारा " हिंदवी स्वराज्याची कोनशिला " प्रेमाच्या धाग्यांनीं सांवरून धरण्याकरितां, त्या स्वराज्य-मंदिराच्या पायांत मी आपखुशीनं हंसत उडी घ्यायला तयार आहें ! केवळ धर्मामुळं माझ्या प्रेमाचा हिरमोड—

**शिवाजी**—नाहीं-गुल्शन, अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे तुझी दृष्टि खेंचल्या-मुळं तुझी दिशाभूल झाली आहे ! गुल्शन, ज्या भावनेचा या हृदयाला कधीं स्पर्श सुद्धां झाला नाहीं त्या भावनेंत स्वतःला बळेंच गुरफटून, तुला मी कसें फसवूं ? गुल्शन, तुझें माझ्या गुणांवर प्रेम आहे ना ? मग किंचित् भावनेला धक्का देऊन, तिला बंधुप्रेमाचें रूप देणें तुला जड कां वाटतें ? हा शिवाजी आनंदानें, अभि-मानानें, तुझा जन्माचा भाई होईल ! केवळ गुणांवर विसावलेल्या प्रणयाला, प्रेमाचें सात्त्विक स्वरूप देणें अवघड असलें तरी अशक्य नाहीं !

**गुल्शन**—जनानी हृदयाची कल्पना तुझ्या मर्दानी मनाला नाहीं ! राजे, मनानं स्वीकारलेल्या मर्दाच्या पायांवर देहाचं देणं देण्यांत आम्हां करारी बायकांना स्वर्गीचं समाधान वाटतं ! भाई, जीभ शब्दाचा उच्चार करील; पण मनाला शब्दा-चा भाव पटणार नाहीं ! मेरे प्यारे दिलोजान, शेंकडों गाईंचा हंबरडा थांबवण्या-करितां जीवाचं मोल द्यायला तयार झालास; पण या एका गाईचा हंबरडा तुला नाहीं ना थांबवतां येणार ? डोळ्यांदेखत ही एका गाईची होणारी हत्या पाहण्या-चा कठोरपणा, राया, तुझाच ना ?

**शिवाजी**—नाहीं, हा कर्तव्याचा कठोरपणा हिंदवी स्वराज्याच्या कल्पनेचा नेता या नात्यानें, गुल्शन, कर्तव्य म्हणून तुझ्या प्रेमाचा माझ्या हातून अमानुष रीतीनें खून होत असतांना, तुझ्या हृदयाला होणाऱ्या यातना या शिवाजीच्या आंतड्याला पीळ पाडतात ! जा, गुल्शन, माझ्या भगिनीप्रेमाच्या सिंहासनावर अधिष्ठित असलेल्या माझ्या प्रेमाच्या प्रतिबिंबा, या शिवाजीच्या दृष्टींतून निघून जा ! हा कठोर शिवाजी, बंधुप्रेमाचें आणि तुझ्या प्रणयाचें एकरूप होणें अशक्य म्हणून माझ्या प्रेमाबरोबरच-तुझ्या प्रणयाला भडाग्नि देऊन, माझ्या लाडक्या गुल्शनला जन्माचा विसरून जायला तयार आहे ! जा—

**गुल्शन**—कशी जाऊं ? तुझ्या इष्काच्या कैफानं मी दिवाणी बनलें रे ! राजा, मी दिवाणी झालें—

पद १७ वें. [ कवाली ]

मेहेरबानी रखो राजा ! रे दिलमे ॥ ध्रु० ॥ आंखे जहरी जादू है । मेरा भान भुलगया । दिल् गमाया ॥ १ ॥ तेरी कीरत न्यारी है । जान दिवाना । रे दिल् दिवाना ॥ २ ॥

आपल्या हातीं ही मान मुरगाळ; पण भाई–नको नको तो शब्द ! तुला मासाहेबांची–राजे शहाजींची आण आहे.

शिवाजी—मनानें निश्चित केलेल्या मार्गांत प्रत्यक्ष मायबापांचा मुलाहिजा हा शिवाजी धरणार नाहीं ! सोड–गुल्शन, हा वेडा विचार सोडून दे !

पद १८ वें. [ राग–बागेसरी, त्रिताल]

सखी ! त्यजी मोह माया–मया । फुका सुखभास हा ॥ ध्रु० ॥ अतुल गुण-कला । शोभवि काया । त्यागि प्रेमा । ना ये दया या ॥ १ ॥

[ तिला ढकलून जातो.

गुल्शन—ठेरो,–ठेरो–मेरे प्यारे दिलोजान, ठेरो !–काय पाहिलं मीं ? इष्काच्या जाळ्यांतून बेदरकार सुटून जाणारा अलौकिक वीर ! फसगतीनं या हृदयाच्या पिंजऱ्यांत विश्वासानं बसलेला माझा प्रेमाचा चंडोल आज एकाकी कायमचा भरारला ! रणांगणांत समशेरीच्या काटाकाटींत आजादिन हजारों रणमर्दांनीं विजय मिळविला असेल, पण या इष्काच्या लढाईंत कोणता वीर कामीं आला नाहीं ? कुलवंत मराठेबहाद्दर, जगांतल्या जातिवंत शूरांना या इष्की दुनियेंत, मनोवृत्तींच्या झगड्यांत, अशक्य असणारं यश आज आपण मिळवलंत ! इष्काच्या जहरी प्याल्याला झुगारणाऱ्या जवान मर्दा, या गुल्शनच्या उमद्या उमरीचा बगीचा, तुझ्याकरतां फुलला, तो तुझ्याच नांवानं कोमेजून–सुकून जाणार ! इष्काच्या अलसगिरा, यापुढं दुनियेच्या सुखाला मुकलेल्या या गुल्शनचा रंगेल बहर तिच्याजवळ राहाण्याची आतां मुळींच जरुरी नाहीं–म्हणून आपल्या राज्यांत त्याला आतां घेऊन चला ! घडीघडीच्या अवकाशानं

या गुल्शनच्या सौंदर्याचा गुलाबी गेंद मंदावून, तो शुष्क होऊन हा देह मातीला मिळण्याच्या आधींच त्याची माती होऊं द्या.

पद १९ वें. [राग-देस, त्रिवट]

अल्ला! लया न्या ही सु-काया। लव नच रति मज।
उरलि सुख-मया॥ ध्रु०॥ पुलकित पति-पदिं। त्यागी
मज आजी। गति किति। खरतर। जनि वांया!॥ १॥

## — अंक दुसरा समाप्त —

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ स्थळ—विजापूर, शहाजीराजांचा महाल. शहाजी प्रवेशतात.]

**शहाजी**—राजनिष्ठा, पुत्रवात्सल्य, कीं स्वदेश ? 'हिंदवी स्वराज्य' स्थापण्याची महत्त्वाकांक्षा मनांत बाळगून, कांट्यानें कांटा काढण्याचा डाव खेळायला गेलों, तो डाव उलटा झाला ! राज्यस्थापनेच्या ऐवजीं राजनिष्ठा नशिबीं आली ! हरकत नाहीं ! याच फसल्या डावाच्या फाशांत शत्रूला फसविण्यांत या शहाजीची शहामत दिसून येणार आहे ! हिंदवी स्वराज्याचा, फसून गुलामगिरीला पडणारा हा शहाजीचा पहिला आत्मबली या गुलामगिरींत सुद्धां स्वातंत्र्यापेक्षां अधिक करामत करील ! मराठ्यांचा नेता म्हणून गाजत असलेल्या या शहाजीची एक समशेर, या परकी तख्ताला सांवरण्याकरतां पुढें होतांना, माझ्या मागें त्याच सिंहासनाला उलथून टाकायला, सपाट्यानें उसळणाऱ्या माझ्या भाईबंदांच्या लाखों समशेरी या धुंद सम्राटाच्या कैफी नजरेला मुळींच दिसणार नाहींत -! शिवाजी, लाडक्या रणमर्दा, ज्या आशामय आयुष्याच्या मुशाफरींत या शहाजीच्या हातीं निराशेची माती येऊन नशिबीं गुलामगिरी आली, त्याच मुशाफरींत तूं संपादन केलेल्या स्वातंत्र्याच्या तेजानें, आज अदिलदरबारीं त्याला दिपवून सोड ! तुझ्या तेजाच्या प्रभावानें या परतंत्र शहाजीची पोकळ राजनिष्ठा कदाचित् एकदम फुटून, दुसऱ्याच्या या ताबेदारींत वाटेल त्याच्या रक्तानें रंगलेल्या या शहाजीच्या समशेरीचा गंज, कदाचित् कायमचा उडून जाईल ! ! आणि या फसल्या डावांत डाव खेळण्याची जरुरी कदाचित् या शहाजीला उरणारही नाहीं ! अदिलशहाचा आजचा वाढदिवस महाराष्ट्राच्या भाग्याचा अरुणकाल तर ठरणार नसेल ना ?

पद २० वें. [ राग—तिलंग, त्रिवट ]

**हा जणुं भाग्य-सुकाल । सुमंगल ॥धृ०॥ जय-मद**
**चढला । भान विसरला । रण-रति करि संचार ।**
**सुमंगल ॥ १ ॥**

म. ग्र. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ................ नों. दि ..............
वि. .................. क्र. ..................



**जिजाऊ**—हा दरबारी साज आज माझ्या हातानें मी अंगावर चढविणार !

अंक ३ रा—पान ४३.

[ जिजाऊ दरबारी पोषाख व तरवार घेऊन प्रवेशते.]

**जिजाऊ**—महाराजांचा हा दरबारी साज आज माझ्या हातानं मी अंगावर चढवणार ! (शिरपेंच बांधून) किती मनोहर ही शोभा ! आपल्या पराक्रमाची शोभा आपल्या तेजस्वी मुखमंडलाभोंवतीं अधिकच तेजानं चमकूं लागते ! ही समशेर, किती साजून दिसते ही ! या विक्रमशाली हातीं ही तरवारीची नागीण येतांच अलम दुनियेंतली परतंत्रता पायीं दासी व्हायला पाहिजे असा गोड भास होतो !

**शहाजी**—तें भाग्य या शहाजीचें नाहीं ! राणी, हा पराक्रमी शहाजी-दिल्लीच्या दरबारी समशेरी नजरेच्या जरबेंत रोखून धरणारा शहाजी पराक्रमी ! पण कुणाला ? स्वातंत्र्याला नाहीं ! गुलामगिरीला ! ! या शहाजीचा पराक्रम स्वतःच्या गुलामगिरीबरोबर दुसऱ्यांची गुलामगिरी वाढविण्यांतच गेला ! या शहाजीच्या मुत्सद्देगिरीच्या पेंचांत त्याची स्वतःची कर्तबगारी कायमची पिचत पडली !

**जिजाऊ**—पण याच गुलामगिरींत स्वातंत्र्याचा सूर्य उगवला ना ? पित्याची अर्धवट राहिलेली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी देवानं त्याच्या पुत्रावर सोंपवलेली असते !

**शहाजी**—(स्वगत) करूं कां थोडी मजा ! (उघड) होय, पण राणी—

**जिजाऊ**—पण ! पण काय ? कसली शंका इकडच्या मनांत आली ?

**शहाजी**—कसली शंका ! जिजाऊ, कर्तव्य येऊन पडलें आहे ! राणी, विचारानेंच जीव हैराण होतो ! माझा विचार ऐकाल, तर तुमची चित्तवृत्ति भडकून जाईल ! या क्षणाला अभिमानानानें या मस्तकावर चढवलेला हा शिरपेंच आपण खालीं खेंचून घ्याल ! या शहाजीकडे-अभिमानी प्रेमळपणानें रोखलेल्या या तेजाळ दृष्टींत भयंकर तिरस्काराचा जहरीपणा चमकूं लागेल ! आणि राणी, वीरपत्नीकडून पराजयी पतीचा होणारा अपमान आपल्या हातीं या शहाजीला निमूटपणें सोसावा लागेल !

**जिजाऊ**—बोला, महाराज ! आपल्या विचारानं भडकून जाण्याइतकी ही जिजाऊ अविचारी नाहीं ! जाधवांच्या कुळींतून ही जाधवांची जिजा, ज्या वेळीं भोंसल्यांची घरधनीण झाली, त्याच वेळीं जाधवकुळींच्या अविचाराला ही जिजाऊ जन्माची विसरली ! बोला, कोणता भयंकर विचार ? या अदिलशाहीच्या सलोख्याच्या

डावाआड एकादा धाडसी मनसुबा–अदिलशाही एकदम उलथून पाडण्याची शिवबाला आज्ञा–कां होणार आहे ? असलाच आविचार असेल तर आपली पायधूळ, आपला बाळ शिवाजी, आनंदानं, अभिमानानं आपल्या इच्छेला मजुरा करायला केव्हांही तयार आहे ! हा भोंसल्यांच्या जिवाचा आधार भवानीच्या साक्षीनं, मी केव्हांच महाराष्ट्रमाउलीच्या ओट्यांत घातला आहे–बोला, आपली इच्छा या अपत्यस्नेहाचा संन्यास घेतलेल्या जिजाऊजवळ बोला मात्र, आपल्या बोलाबरोबर महाराष्ट्राचा, माझ्या जपणीस असलेला हिरा मी आपल्या पायीं सादर करीन ! बोला !

**शहाजी**—काय बोलूं ? माझा विचार बोलून दाखवायला या शहाजीला आतां मघांइतका सुद्धां धीर उरला नाहीं ! आपल्या प्रत्येक शब्दाबरोबर या जिभेवर घोंटाळणारे शब्द आंत आंत ओढले जातात !

**जिजाऊ**—यापेक्षां भयंकर विचार ! दुर्दैवी आर्यावर्ताच्या पायीं जडलेली गुलामगिरीची बेडी एकदम निखळायचा विचार ! दिल्लीच्या सार्वभौम तख्तावरून शहाअलमला खेंचून मराठ्यांचा जरीपटका दिल्लीच्या वेशीवर फडकविण्याचा विचार विजयी समशेरीला दिल्लीच्या सिंहासनावर ठेवून, 'हिंदुपदपादशाही'ची ग्वाही फिरविण्याचा विचार ? बोला, रणबहादूर आपल्या नेत्रसंकेताबरोबर गुलामगिरीच्या नरडीचा घोंट घ्यायला टपलेला सिंहाचा छावा आपल्यासमोर माझ्या हातीं मोकळा सुटेल ! दिल्लीच्या जुलमी सम्राटाला आपल्या पायीं हजर करण्याकरितां, हा मराठ्यांचा मोहरा जर एकदम इरेस पडला नाहीं, तर या जिजाऊच्या कुसव्यानं, शिवाजीसारख्या नरसिंहाला जन्म दिला नसून, एका भेकड कुत्र्याला जन्म दिला असें समजून त्या भेकड निःसत्त्वाचं मी तोंड सुद्धां पाहणार नाहीं !

**शहाजी**—राणी, अशा चढत्या मर्दाईचा, गगनाला गवसणी घालण्याचा इरादा असता तर जीव इतका बेदिल होता ना ? राणी, ही कर्तव्याच्या अस्मानांतली बेसुमार भरारी घडीभर थांबवून आपल्या कल्पनेची चढती कमान कल्पनेबाहेर एकद खालीं उतरा आणि मग—

**जिजाऊ**—म्हणजे ? अभद्र विचार आणि इकडच्या हृदयांत ? निर्वाणीच्या बोलानं जिवाचं समाधान करा. प्रत्येक अपत्य ही राष्ट्रमातेची बहुमोल ठेव म्हणून मातापित्या हातीं असते ! त्या अपत्याला अधोगतीचा मार्ग दाखविणारा पिता देशाचा दावेदार तर होतोच; पण वीरमातेचा सुद्धां वैरी होतो ! कोणताही

विचार असला तरी बेमुर्वत बोला! भोंसल्यांच्या नांवाकरतां राष्ट्राचा गुन्हा करण्यापेक्षां पातिव्रत्याचा निर्दोष अपराध करायला ही जिजाऊ तयार आहे!

**शहाजी**—तर मग राणी, या शहाजीकडं दुस्मानाच्या कठोर नजरेनें पाहून माझे शब्द ऐका! राणी, आज अदिलशहाच्या दरबारीं शहाला बरोबरीच्या नात्यानें चौदाव्या वर्षी तडफीनें न केलेला कुर्निसात् आपल्या शिवाजीला करावा लागेल!

**जिजाऊ**—कुर्निसात्? कुणाच्या-कुणाच्या तोंडून हे शब्द?—राजांच्या? महाराष्ट्राला स्वतंत्र करून "हिंदवी स्वराज्याची" स्थापना करीन अशी प्रतिज्ञा करणाऱ्या जातिवंत मराठ्याच्या? गुलामाची मनोवृत्तिसुद्धां गुलामच असणार! ही भोंसल्यांची जिजाऊ-भावी छत्रपतीची माता म्हणून निकरानं सांगतें कीं, आपली घरधनीण जिजाऊ आपल्या गुलामगिरींत मेली! या स्वतंत्र जिजाऊचा शिवाजी आज अदिलदरबारीं येईल, तो अदिलशहाशीं बरोबरी म्हणून कुर्निसात करण्याकरतां येणार नाहीं! तर "जुलमी पारतंत्र्याच्या नरडीचा घोंट घेणारा अवतार पुण्याच्या कडेकपारीं वावरूं लागला,-आतां तरी सावध होऊन गो-माउलींचा छळ थांबवा" असं शहाला आणि त्याच्या कृपेची भाकर खाणाऱ्या आपल्यासारख्या निमकहलाल गुलामांना बजावण्याकरतांच येईल!

( जाऊं लागते; शहाजी तिचा हात धरतो.)

**शहाजी**—शाबास! जिजाऊ, शाबास! या शहाजीला आज धन्य केलेंस! शहाजीच्या या बुद्धिडावांत या शहाजीलाच तूं आज बिनशर्त जिंकलेंस! मुत्सद्दे-गिरीची घमेंड असणारा हा शहाजी आपल्या तेजानें आज दिपून गेला! राणी, आपल्या पवित्र सहवासांत, स्वतःला पावन समजणारा हा गुलाम शहाजी भोंसल्यांच्या या कीर्तीजवळ झाल्या गुन्ह्याची माफी मागत आहे.

**जिजाऊ**—मग कां बरं हा लपंडाव खेळायचा?

**शहाजी**—या दिव्य हृदय-मंजुषेंतील दिव्य रत्नांच्या तेजाची प्रभा किती प्रखर आहे हें अजमावण्याकरतां! राणी, शिवाजीला "हिंदवी स्वराज्याच्या" पुकाऱ्याची तुतारी आज अदिलशहाच्या वाढदिवसाच्या मुहूर्तानें दुष्मनाच्या दारीं खुशाल फुंकूं द्या! या शहाजीची समशेर त्याची पाठराखणीच करील! जा, राजनिष्ठ शहाजीला हा स्वातंत्र्याचा संदेश शिवबाला सांगायचा धीर होत नाहीं! म्हणून हें काम आपणच करा. [ जातो.

**जिजाऊ**—भोळ्या जिजाऊ, आज तिकडल्या मुत्सद्देगिरीवर मात करायला म्हणून गेलीस ती स्वतःच फसलीस !–निजामशहा–आदिलशहाच्या दरबारला ज्याच्या अलौकिक बुद्धिवैभवानं भरून टाकलं, प्रत्यक्ष दिल्लीपतीला सुद्धां ज्याच्या बुद्धीची दहशत, त्याला बुद्धीच्या डावांत जिंकण्याची–जिजाऊ, तुझी हौस कशी पुरी होणार ? अदिलशाहीची नौकरी ही गुलामगिरीच का ? खास नाहीं !–हें एक कोडं आहे ! शिवबाला अट्टाहासानं स्वातंत्र्याचा उपदेश करणारा, परक्यापुढं हात जोडतो-यांत राजनिष्ठेपेक्षां बुद्धिवैभवाचीच करामत अधिक असली पाहिजे ! खात्रीनं ही गुलामगिरी म्हणजे मुत्सद्देगिरीची जातिवंत कारवाई आहे ! राजे ! आपल्या आज्ञेप्रमाणं आज आपला बाळ दरबारीं येईल तो निर्वाणीच्या शब्दानं मराठ्यांचे अधिकार अदिलशहाजवळ मागण्याकरतांच येईल !!

पद २१ वें. [ राग–बेहागडा, झपताल ]

**स्वातंत्र्य-संग्रामीं । खल-नाश घडवोनी । मांगल्य-**
**दाता । कुलवंत राणा ॥ ध्रु० ॥ भरला जयाचा । रव**
**हा सुखाचा । शिवराय होवो । शुभ-सौख्यकारी ॥ १ ॥**

[ जाते.

---

## प्रवेश दुसरा

[ स्थळ—विजापूर. दरबारच्या रस्त्याची एक बाजू. काळा पोषाख केलेला अल्ला कांहीं जवानांसह प्रवेश करतो.]

**अल्ला**—खडे रहो ! एक घडीके अंदर आपने सामने शिवाजीका मेना आयेगा ! एकदम हल्ला चढा देव ! मगर ध्यानमे रखो–खाली शिवाजीकू गिरफदार करनेका खानका हुक्म है ! कुछ आफत गुदराई तो आपकू खाटीक-खाना जरूर मिल जायेगा ! समजा ? चलो–शिवाजीबरोबर गुल्शनबी असणारच–आणि गुल्शनचं निशाण म्हणजे ती गजरा ! गजरा दिसली रे दिसली, कीं मी "तैयार" म्हणून इशारा देतों ! चलो-टेहळणी करीत मी इथें बसतों ! तुम्ही शेजारच्या गल्ल्यांतून दबून राहा ! [ जवान जातात.

**गजरा**—( फुलांची परडी घेऊन प्रवेशते.) म्हणजे ? इतक्यांत मेणा कोणत्या

वाटेनं गेला ? शिवाजीराजांचा मेणा दिसतांच, त्यांना दरबारच्या आधीं हार घालतां यावा म्हणून गुल्शनबीनं मला शेजारच्या फुलाजीकडून हार आणायला सांगितलं ! आणि इतक्यांत मेणा कुणीकडं वळविला ?

**अल्ला**—(पडद्यांतून) तय्यार !

**गजरा**—अगबाई ! म्हणजे ? हा काय घोंटाळा ? हें विजापूर म्हणजे दिवसाढवळ्या दंगाधोपा करण्याचं माहेरघरच झालं म्हणायचं !

**अल्ला**—( जवानांकडे तोंड करून उलटा प्रवेशतो.) आस्ते कदम ! निगा रखो ! आस्ते कदम !

**गजरा**—(स्वगत) हे कोण मेले ? मला हे पकडणार कीं काय ? आतां पळूं तरी कुठून ?

**अल्ला**—तय्यार ! मेणा इतक्यांत येईल ! मेणा दिसला रे दिसला कीं एकदम हमला चढा देव !

**गजरा**—( स्वगत ) आवाज तर ओळखीचा वाटतो ! हा अल्ला तर नाहीं ?

**अल्ला**—(स्वगत) निरनिराळ्या वेळीं चिमणी-कावळ्यांसारखे निरनिराळे आवाज काढण्याची कला देवानं मनुष्याच्या नरड्यांत ठेवली, पण या अल्लाचं नरडं मात्र गरनाळेची नळी बनवलं !! भसाड्या सुराशिवाय सूर नाहीं निघायचा नरड्यांतून !

**गजरा**—हा अल्लाच !

**अल्ला**—(स्वगत) ही बिलंदर कार्टी मला ओळखणारच ! आणि अजून मेणा तर नाहीं ! तोंड वळवून पाहीन म्हटलें तर पोरटीच्या डोळ्याला डोळा देण्याची छाती नाहीं ! छेः ! इतकी पेंचाची असते का ही नोकरी ? डोळे असून आंधळा झालों कीं आज ! कायरे एखदा मेणा बिणा दिसतो का ?

**शिपाई**—हां जी, मेणा-मेणा !

**अल्ला**—फेर हल्ला चढा देव !

**गजरा**—अगबाई, तो तर गुलाबसरकारचा मेणा ! मेणा गेला सुद्धां !

**अल्ला**—या अल्ला ! म्हणजे ? शिवाजीनें हातावर तुरी दिल्या कीं काय ? या पोरीनेंच सारा घोंटाळा केला असला पाहिजे ! बस्स !—पकडो ! —( शिपाई गजरेला पकडतात.) याच छबेलीनें हा घोंटाळा केला ! शिवाजी दरबारांत पोंचला सुद्धां असेल ! शिवाजी नाहीं तर हीच !! बेटीनें दोनदां या अल्लाची दाढी सफाईनें कापून हातीं दिली कीं !—

**जिजाऊ**—भोळ्या जिजाऊ, आज तिकडल्या मुत्सद्देगिरीवर मात करायला म्हणून गेलीस ती स्वतःच फसलीस !–निजामशहा–आदिलशहाच्या दरबारला ज्याच्या अलौकिक बुद्धिवैभवानं भरून टाकलं, प्रत्यक्ष दिल्लीपतीला सुद्धां ज्याच्या बुद्धीची दहशत, त्याला बुद्धीच्या डावांत जिंकण्याची-जिजाऊ, तुझी हौस कशी पुरी होणार ? अदिलशाहीची नौकरी ही गुलामगिरीच का ? खास नाहीं !–हें एक कोडं आहे ! शिवबाला अट्टाहासानं स्वातंत्र्याचा उपदेश करणारा, परक्यापुढं हात जोडतो - यांत राजानिष्ठेपेक्षां बुद्धिवैभवाचीच करामत अधिक असली पाहिजे ! खात्रीनं ही गुलामगिरी म्हणजे मुत्सद्देगिरीची जातिवंत कारवाई आहे ! राजे ! आपल्या आज्ञेप्रमाणं आज आपला बाळ दरबारीं येईल तो निर्वाणीच्या शब्दानं मराठ्यांचे अधिकार अदिलशहाजवळ मागण्याकरतांच येईल !!

पद २१ वें. [ राग–बेहागडा, झपताल ]

**स्वातंत्र्य-संग्रामीं । खल-नाश घडवोनी । मांगल्य-**
**दाता । कुलवंत राणा ॥ ध्रु० ॥ भरला जयाचा । रव**
**हा सुखाचा । शिवराय होवो । शुभ-सौख्यकारी ॥ १ ॥**

[ जाते.

---

## प्रवेश दुसरा

[ स्थळ—विजापूर. दरबारच्या रस्त्याची एक बाजू. काळा पोषाख केलेला अल्ला कांहीं जवानांसह प्रवेश करतो.]

**अल्ला**—खडे रहो ! एक घडीके अंदर आपने सामने शिवाजीका मेना आयेगा ! एकदम हल्ला चढा देव ! मगर ध्यानमे रखो–खाली शिवाजीकू गिरफदार करनेका खानका हुक्म है ! कुछ आफत गुदराई तो आपकू खाटीक-खाना जरूर मिल जायेगा ! समजा ? चलो–शिवाजीबरोबर गुल्शनबी असणारच–आणि गुल्शनचं निशाण म्हणजे ती गजरा ! गजरा दिसली रे दिसली, कीं मी "तैयार" म्हणून इशारा देतों ! चलो - टेहळणी करीत मी इथें बसतों ! तुम्ही शेजारच्या गल्ल्यांतून दबून राहा ! [ जवान जातात.

**गजरा**—( फुलांची परडी घेऊन प्रवेशते.) म्हणजे ? इतक्यांत मेणा कोणत्या

वाटेनं गेला ? शिवाजीराजांचा मेणा दिसतांच, त्यांना दरबारच्या आधीं हार घालतां यावा म्हणून गुल्शनबीनं मला शेजारच्या फुलाजीकडून हार आणायला सांगितलं ! आणि इतक्यांत मेणा कुणीकडं वळविला ?

**अल्ला**—(पडद्यांतून) तय्यार !

**गजरा**—अगबाई ! म्हणजे ? हा काय घोंटाळा ? हें विजापूर म्हणजे दिवसा-ढवळ्या दंगाधोपा करण्याचं माहेरघरच झालं म्हणायचं !

**अल्ला**—( जवानांकडे तोंड करून उलटा प्रवेशतो.) आस्ते कदम ! निगा रखो ! आस्ते कदम !

**गजरा**—(स्वगत) हे कोण मेले ? मला हे पकडणार कीं काय ? आतां पळूं तरी कुठून ?

**अल्ला**—तय्यार ! मेणा इतक्यांत येईल ! मेणा दिसला रे दिसला कीं एकदम हमला चढा देव !

**गजरा**—( स्वगत ) आवाज तर ओळखीचा वाटतो ! हा अल्ला तर नाहीं ?

**अल्ला**—(स्वगत) निरनिराळ्या वेळीं चिमणी-कावळ्यांसारखे निरनिराळे आवाज काढण्याची कला देवानं मनुष्याच्या नरड्यांत ठेवली, पण या अल्लाचं नरडं मात्र गरनाळेची नळी बनवलं ! ! भसाड्या सुराशिवाय सूर नाहीं निघायचा नरड्यांतून !

**गजरा**—हा अल्लाच !

**अल्ला**—(स्वगत) ही बिलंदर कार्टी मला ओळखणारच ! आणि अजून मेणा तर नाहीं ! तोंड वळवून पाहीन म्हटलें तर पोरटीच्या डोळ्याला डोळा देण्याची छाती नाहीं ! छेः ! इतकी पेंचाची असते का ही नोकरी ? डोळे असून आंधळा झालों कीं आज ! कायरे एखदा मेणा बिणा दिसतो का ?

**शिपाई**—हां जी, मेणा-मेणा !

**अल्ला**—फेर हल्ला चढा देव !

**गजरा**—अगबाई, तो तर गुलाबसरकारचा मेणा ! मेणा गेला सुद्धां !

**अल्ला**—या अल्ला ! म्हणजे ? शिवाजीनें हातावर तुरी दिल्या कीं काय ? या पोरीनेंच सारा घोंटाळा केला असला पाहिजे ! बस्स !—पकडो ! —( शिपाई गजरेला पकडतात.) याच छबेलीनें हा घोंटाळा केला ! शिवाजी दरबारांत पोंचला सुद्धां असेल ! शिवाजी नाहीं तर हीच ! ! बेटीनें दोनदां या अल्लाची दाढी सफाईनें कापून हातीं दिली कीं !—

गजरा—धांवा हो धांवा ! हे मेले धटिंगण माझ्यावर—

अल्ला—खबरदार ! शिवाजीचा मेणा कुठं आहे ?

गजरा—मला काय माहीत ?

अल्ला—अरे वा ! तुझी गुल्शनबी आणि तो शिवाजी एका ठिकाणीं असायचे हें मला माहीत का नाहीं ? बोल, कोणत्या वाटेनं शिवाजीचा मेणा गेला ? परवां शिवाजीचे लोक वाड्यांत ऐन वेळीं सोडून मला फाशीं दिलेंस आणि आजही ! बरी सांपडली आहेस तावडींत ! अश्शीच्या अश्शी खानाच्या समोर नेतों आणि साऱ्या भानगडींचें कारण तूं म्हणून देतों सांगून ! ! हो—डर कशाला ?

गजरा—आणि परवांचं वचन ? विसरलास वाटतं ?

अल्ला—पण त्या वेळीं अल्ला खाटीक होता !

गजरा—आणि आजचा अल्ला शिपाई आहे एवढंच ना ? पण बिनदिलाच्या खाटकाला शिपाई होणं फारसं जड नसतं ! अल्ला, आज इष्काला सुद्धां विसरलास ?

अल्ला—न विसरून करूं काय ? परवां शिवाजी हातचा निसटल्यापासून खान माझ्या गळ्यावर टपलाय् ? पोटाकरतां हा प्रेमाचा तोटा—

गजरा—पहा बरं ! मग पुन्हा म्हणशील कीं, "गजरा, मेरा तकदीरका कवाड कभी खोलेगा ?"

अल्ला—पण मला आतां पक्कें कळलें आहे कीं, त्या कवाडाची किल्ली तुझ्यासारख्या छट पोरीच्या हातीं आहे म्हणून ! खान गया खाटीकखानेमे ! पण माझ्या इष्काकरतां तरी मी तुला आज खानासमोर नेणार ! तुम्हां पोरींच्या पोकळ शब्दांवर विसंबणारा शेवटीं पागल ठरतो ! चलो, खेंचो !

गजरा—सबूर सबूर. अल्ला ! माझे शब्द तूं पोकळच समजलास का ? मीं तुझ्या जवळून काय चोरून ठेवलं होतं बरं ? तूं मात्र—

अल्ला—कां बरें ? माझ्या तोंडांत अशी कोणती गुप्त गोष्ट टिकते म्हणून ती तुला कळायची राहिली होती ? आज गुल्शन-शिवाजीची भेट होऊं द्यायची नाहीं हा खानाचा इरादासुद्धां मी तुझ्याजवळ एकदम बोललों होतोंच ना ? शत्रूला स्वतःच दग्याची कल्पना देणारा माझ्याइतका विश्वासू कुणीच सांपडणार नाहीं ! पण तुझा पीळ—

गजरा—याला कारण आमची जातीची लाज ! प्रत्यक्ष पतीशींसुद्धां मनमोकळं बोलायची आम्हां हिंदु स्त्रियांना लाज वाटते ! ! मग तूं तर—

अल्ला—अजून परकाच ना ?-अच्छा. खेंचो—

गजरा—अल्ला, स्त्रियांचं मन कळायची कला तुझ्यांत नाहीं हेंच खरं.

अल्ला—तुझा विश्वास धरूं कसा ? तूं काय केलं आहेस म्हणून तुझा विश्वास मीं धरावा ? आज शिवाजीला परवांप्रमाणेंच फरारी करून माझे दांत पाडलेसच ना ?

गजरा—पण मला काय माहीत तूं शिवाजीला पकडणार आहेस म्हणून ? आणि शिवाय, इष्काच्या राज्यांत मर्दानं नेहमीं औरतीच्याच इच्छेप्रमाणं वागावं लागतं, समजलास ?

अल्ला—ऐसा ? पण तुझ्यावर अजून माझा विश्वास बसत नाहीं !

गजरा—मग काय करूं म्हणजे तुझा विश्वास बसेल ?

अल्ला—तो हार—

गजरा—छेः छेः ! लग्नाआधीं परक्यांशीं हार-गजऱ्यांचे खेळ खेळण्याची आम्हां हिंदु स्त्रियांना धर्माची मनाई आहे ! देवांची पूजा आमच्यांत फुलांनीं करतात. अल्ला, आज देव म्हणून मी तुझी पूजा करीन वाटल्यास ! पण एक वचन दे.

अल्ला—तुझ्या वचनानें हैराण केलें अगदीं ! अच्छा-सुनाव—

गजरा—गुल्शनजान आणि शिवाजी यांच्या यासंबंधांत माझं अंग आहे असं चुकून सुद्धां कुठं बोलायचं नाहीं आणि शिवाजी विजापुरांत असेतों त्याचं नांवही घ्यायचं नाहीं.

अल्ला—पण पोटाची वाट ?

गजरा—तसं वागल्यानं जर उपाशीं मेलास तर जिकडं अल्ला तिकडंच हा गजरा—

अल्ला—हायरे मेरी अस्मानकी परी ! छोड-छोड देव ! आणि कुणाचाही मेणा मारून शिवाजीचा मेणा म्हणून खानासमोर घेऊन जा ! चले जाव ! (शिपाई जातात.) मेरी प्यारी गजराजान—

गजरा—हं, हा घे हार—

अल्ला—वाहव्वा ! गजरा, आजचा हा थाट पाहून तूं एक अस्मानकी मालन दिखती है !

गजरा—आणि माळणीनं कुणालाही फुलं दिलीं तरी त्यांत पाप मुळींच नसतं ! खरं ना अल्ला ?

पद २० वें. [ न होई ही दासी० ]

**ना जाई ही काया पापापदीं ॥ ध्रु०॥ विमल-कार्य-कारी । वरी कान्त नारी । स्व-धर्मास तारी । अभिमान हा । हो संकरारी ॥ १ ॥**

---

## प्रवेश तिसरा

[ स्थळ—विजापूर. अदिलशहाचा दरबार. अदिलशहा तक्तावर. शहाजी इतर सरदार व मानकरी योग्य जागीं. मागच्या बाजूस गच्चीवर गोषा. गोषांत राजस्त्रिया व गुल्शन.]

**अदिलशहा**—राजे शहाजी, सरदार, दरकदार, अल्लाच्या मेहेर नजरेनें आजचा दिन आला. आज आमच्या रयतेची ही खुशाली पाहून आम्ही बेहोष खूष झालों ! आमच्याही खुशालीची ख्याल म्हणून आज विजापुरांत होणारे हुजुरातीचे तमाम गुन्हे आम्ही एकदम माफ करीत आहोंत. राजे शहाजी, आमच्या खुशीच्या दिवशीं राजे शिवाजीचा आणि आमचा कायमचा सलोखा घडवून आणणें आपल्या हातीं आहे ! आजदिन नेकजातपणानें केलेली या तक्ताची चाकरी, राजे, शिवाजीचा दोस्तीचा हात आमच्या हातीं देऊन पूर्ण कराल असा आम्हांला भरंवसा वाटतो.

**शहाजी**—हुजूरदरबारीं शिवाजी इतक्यांत दाखल होईल ! एकमेकांची दिलसफाई झाली, कीं दोस्ती व्हायला काय अवकाश लागणार ?

**अदिलशहा**—बेशक ! आणि राजे, शिवाजीसारख्या जातीच्या मर्दाशीं बरोबरीच्या नात्यानें दिलजमाई करण्यांत आम्हांला बिलकूल नामुष्की येणार नाहीं अशी आमची खात्री आहे ! (पडद्यांत तुतारी तोफा, वगैरे.) देखो ! आमच्या विचाराला या सरबत्तीनें साथ दिली ! या हिंदु-मुसलमानांच्या दोस्तीवर या अदिलशाहीचा इतमाम दुनियेंत असाच गाजत राहील !

[ पुन्हा तुतारी, तोफा वगैरे. शिवाजी प्रवेशतो.]

**शिवाजी**—( प्रत्येक पावलाबरोबर मुजरा करीत ) हा पहिला मुजरा माता भवानीला, दुसरा राजे शहाजींना आणि हा तिसरा मुजरा मातोश्री जिजामाता !

गुलशन—( सज्जांतुन ) डोळ्यांचं पारणं फिटलं ! असलीं आदिलशाहीचीं हीं सोनेरी सिंहासनं लाखानं उधळून द्यायला हवीत या हिंमतबहाद्दरावरुन !

( गोषांतून शिवाजीवर फुलें येतात. )

अदिलशहा—वारे बहाद्दर ! बारे दाणा दुष्मन ! !

शिवाजी—शहा अदिल. दरबारी रिवाजाला सोडून तख्ताला मुजरा केला नाहीं ! पण दोस्ती-दुष्मनगिरीच्या शिवेवर मुजऱ्याला मुळीं वावच नाहीं !

विसाजी—काय ? जाणूनबुजून हा हुजूरचा उघड उघड अपमान ? राजे शहाजी, हुजूरच्या सहनशीलतेचा हा फाजील फायदा शिवाजीराजे घेत आहेत ! दरबारी शिरस्ता आपल्याला माहीत आहे. पादशाही तख्तापुढें कुणाचाही मुलाहिजा नाहीं ! कुर्निसात न करतां छातीठोक दुष्मन म्हणून तख्तापुढें चाललेला हा शिवाजीचा बेमुर्वत उद्दामपणा दरबारी समशेरींना सहन होणार नाहीं.

गुलाबखान—अलबत्; राजे, दरबारच्या अपमानाबरोबर पादशाही इभ्रतीचा अपमान करूं नका आणि करवूंही नका. शिवाजी, अब्बीके अब्बी कुर्निसात्—

शिवाजी—कुर्निसात् ? वीराला नामुष्की आणणारा कुर्निसात् ? आणि असला कुर्निसात् हा शिवाजी करणार ?

शहाजी—खान, भलताच प्रश्न काढून विनाकारण बखेडा करूं नका ! हा प्रश्न हुजूरचा आहे-आपला नाहीं ! हुजूरच्या अन्नाचा हा मिंधा आणि बंदा शहाजी हुजूरकदमांजवळ एकदां सोडून दहादां मुजरा करील; पण—

विसाजी—पण शिवाजीला पादशाही तख्तापुढें मान वांकवायला सांगणार नाहीं असेंच ना ! ही तर उघड चिथावणी आहे.

शिवाजी—खबरदार, यांत राजांचा बिलकूल संबंध नाहीं !

गुलाबखान—आँ ! हें तर उघड सफाईचें कारस्थान आहे ! एकानें कानावर हात ठेवायचे तर दुसऱ्यानें समशेर उपसायची ! हुजूरकदमांला हा प्रकार कसा मंजूर होतो ? शिवाजी, एकदम कुर्निसात्, माबाप सरकारकू—

शिवाजी—कोण कुणाचे माबाप ? दिवसाढवळ्या गाईंच्या खिलारांना तोरस्तीं कापून काढणारे, या आर्यावर्ताला मूर्तिमंत नरकाचें रूप देणारे कुणाचे मा-बाप ? जबरीनें शेंडीची दाढी बनविणारे, परक्या धर्माला पायीं तुडविणारे, अनाथ अबलांची अब्रू बेशरमपणानें लुटणारे कुणाचे मा-बाप ? स्वतःचें पोटा

जाळण्याकरितां दुसऱ्याच्या–शेजाऱ्याच्या इमलीला चूड लावणारांचे हे पोशिंदे कुणाचे मा–बाप! तुमच्यासारख्या कसायांचे–जातीच्या सैतानांचे–समजलांत?

अदिलशहा—( स्वगत ) शाबासरे बहाद्दर! क्या अस्मानकी तडफ है! क्या अल्लाकी अजब करामत है!

गुलाबखान—तोबा–तोबा! बेफाम मरगठ्ठा, तुम क्या दिवाना है? याद राख; शहाजीराजांच्या जोरावर बडबड करशील तर बापासकट तख्तापुढं मुर्दे पडतील.

शिवाजी—या मरगठ्ठयाच्या मनगटांतल्या मर्दुमकीनें " मी मी " म्हणणाऱ्या जवान मर्दांचीं हाडें आजपर्यंत खिळखिळीं करून सोडलीं आहेत! या गुलामी दरबारचा त्यापुढें काय पाड?

विसाजी—खान, शब्दाला शब्द देऊन काय फायदा? तख्ताची इभ्रत आपल्याला राखली पाहिजे! हुजूरचा शांतपणा आपल्या निष्ठेचा कस पहात आहे! शिवाजी, एकदम तख्ताला कुर्निसात कर; नाहीं तर—

शिवाजी—नाहीं तर काय होणार मराठे मर्द! नाहींतर कोणता पराक्रम आपण गाजवणार?

विसाजी—तें उद्दाम मस्तक समशेरीच्या एकाच झटक्यानं हुजूरपायीं हजर केलें जाईल! कुर्निसात—

शिवाजी—गर्दन तुटून पडेल, पण हा शिवाजी कुर्निसात करणार नाहीं! मुजरा आईबापाकरितां असतो, ईश्वरी अवताराकरितां असतो–सर्वसमर्थ देवाकरितां असतो!

अदिलशहा—(स्वगत) वारे मर्द! या शहाची बुद्धि डोळ्यांत एकवटून तुझी मर्दाईच कां बरें पाहूं लागली? तोंडाच्या तोफेंतून बेदर्द सुटणारी ही शब्दांची सरबती एकसारखी ऐकत रहावें असेंच वाटतें!

विसाजी—एकंदरींत या प्रकारांत थोरांचीच कारवाई विशेष आहे का? हरकत नाहीं! हुजूरच्या वाढदिवसाच्या मुहूर्तानं ही मुतसद्दी अवलाद जर या विजापुरांत खतम् होणार असेल तर ठीकच आहे! शिवाजी, पुन्हा एकदां—

शिवाजी—बजावण्याची मुळींच जरुरी नाहीं! या धमक्या हव्यात कशाला हा पहा, हा भोंसल्याचा बच्चा, या अदिलशाहीच्या तख्तासमोर तुझ्या अन्यायाचा जाब मागण्याकरितां खडा आहे! काय मगदूर असेल ती बेशक चालव! नाहीं-तर गुल्शनवर गहजब करीत असतांना, दरोड्याच्या रानांत शिवाजीच्या



**गुल्शन**—आधीं या गुल्शनला तोडावी लागेल. अंक ३ रा—पान ५३.

समशेरीनें जो हात कलम झाला, त्या पापी हातांत, पराक्रमाचें दिवाळें निघालें म्हणून बांगड्या भर !

गुलाबखान—ये क्या मै सूनता हूं ? गुलशनवर विसाजीनें गहजब केला ? विसाजी, पाहूं तुमचा हात.

अदिलशहा—देखो, अब्बीके अब्बी देखो !

विसाजी—आधीं दुष्मन छाटूं द्या !

[ तरवार उपसून शिवाजीवर धांवतो. शहाजी व अदिलशहा " खबरदार " म्हणून उभे राहातात. गुलाबखान विसाजीचा हात पकडून हातावरील वार पाहतो. गुलशन गोषा झुगारून मध्यें येऊन उभी राहते.]

गुलशन—सबूर-नादान सबूर ! आधीं या गुलशनला तोडावी लागेल आणि मग या राजाकडे तुझं पाऊल ! हुजूर, ही सैतानी समशेरच जर आजच्या दरबारांत न्यायी ठरणार असेल तर न्यायवंत, आधीं या गुलशनचे तुकडे या तख्तापुढं होऊं द्यात ! या गुलशनच्या उफाळणाऱ्या रक्तांत जरी हुजूरना न्याय दिसला नाहीं तरी अल्लाला डोळे आहेत ! या गुल्शनचा रक्तपात या दरबारीं जरी रुजू झाला नाहीं तरी खुदाच्या दरबारीं तो खात्रीनं रुजू होईल ! मानवी सिंहासन अन्यायी झालं म्हणून इलाईची गादी आसुरी कधींच होत नाहीं !

गुलाबखान—अहाहा ! गुल्शन, प्यारी लडकी चुकला हा तुझा बाप ! आज दिन भलतीकडे भडकला होता ! राजे शिवाजींच्या आजच्या या धडाडीनं माझे डोळे उघडले ! असल्या असली जातींच्या मोहऱ्याशीं दोस्ती करायची सोडून मीं विनाकारण दावेदारी साधली ! गुलबहार, या तुझ्या पापी बापाला भेटून त्याला क्षमा केली असें सांग.

गुलशन—कशी भेटूं ! बाबा, त्या छातीवर मी माझं शिर कसें विसावूं ! या कसाई दिलाचा हवाला मला कसा पटावा ! बाबा—

गुलाबखान—या हृदयांतले ठोकेच त्याची साक्ष देतील ! या गुलाबचें कसाई मन याच घडीपासून मेलें.

गुलशन—( गुलाबला भेटते.) अहाहा ! माझे बाबा मला पुन्हा मिळाले !

गुलाबखान—या विसाजीसारख्या कमजात अवलादीची कारवाई मला उमगली नाहीं !

विसाजी—धन्याचा अपमान विसरून, दुष्मनला दोस्त समजणारा कमजात कीं तख्ताच्या अपमानाकरतां देहाचे तुकडे करून घ्यायला तयार झालेला हा विसाजी कमजात, याचा इन्साफ हुजूरच करतील! (शिवाजीवर धावून जातो. शहाजी राजे मध्यें येतात.)

शहाजी—खबरदार विसाजी! यापुढें अतिप्रसंग होईल तर मात्र या मंगल-दिवशीं हें शहांचें तख्त खरोखरच तुझ्यासारख्या नीचाच्या रक्तानें रंगवून निघेल!

विसाजी—हुजूर, ही राजांची राजनिष्ठा!

शहाजी—या शहाजीची राजनिष्ठा या अदिलशाहींत आज कसाला लागायची नाहीं! राजनिष्ठेकरतां हत्तीच्या पायीं दिलें तरीसुद्धां हा शहाजी एका केंसाचाही अंगचोरपणा करणार नाहीं! साऱ्या अदिलशाहीचीं सूत्रें ज्या या शहाजीच्या हातीं, तो शहाजी जर दगाबाज असला, तर शहांच्या तख्तांत आणि या शहाजींत तुला इतकें अंतर कधींच दिसलें नसतें! हुजूर! कसूर माफ! दरबारच्या सुरवातीपासून हुजूर एक शब्दही बोलत नाहात! हुजूरना भोंसल्यांच्या राज-निष्ठेचा वहीम आला असल्यास हा शहाजी तख्तापुढें बेकदर खडा आहे! बेशक हत्तीच्या पायीं द्या! हूं कीं चूं न करतां, हुजूरकदमांवर बहाल केलेल्या या देहाचा चिखल करून घ्यायला मी तयार आहें!—पण शिवाजीच्या बाबतींत थोडा जरी अविचार आज दरबारकडून घडला, तरी ही शहाजीची समशेर कुणाचाच मुलाहिजा न धरतां एकदम काटाकाट सुरू करील! कदमाकदमाला रक्ताचीं कारंजीं सुरू होतील!

विसाजी—असल्या धमकावणीला—

आदिलशहा—खामोष. बेवकूफ हैवान—खामोष! शहाजीराजे, जिवाच्या करारावर आजदिन या शहाला त्याचे प्राण आपण अनेकदां संगीनमाऱ्यांत बहाल केले आहेत, ते दगाबाजी करण्याकरतां खास नव्हे हें आम्ही जाणतों! या घडीपर्यंत आम्हीं सबूर केली त्याचें कारण आमच्या दरबारीं नालायखांचा भरणा किती आहे हें आम्हांला अजमावून पाहायचं होतं! निमकहराम विसाजी, ये दरबार छोडकर अब्बीके अब्बी चले जाव! तेरा दरबारी इतमाम आजदिनसे रद्द किया है! चले जाव.

विसाजी—हुजूर—

आदिलशहा—चले जाव! [विसाजी जातो.] राजे शिवाजी—

शिवाजी—शहा आदिल !

आदिलशहा—जो हुवा सो हुवा ! आज आपल्यासारख्या बेडर बहादराचा दोस्तीचा हात—

शिवाजी—बरोबरीच्या नात्यानें आपल्या हातीं द्यायला-शहा आदिल, कांहींच हरकत नाहीं ! पण—

अदिलशहा—क्या ?

शिवाजी—राजकारणांत जाब खुला पाहिजे ! शहा, ही दोस्ती कांहीं अटीं-वरच होणें शक्य आहे.

आदिलशहा—सुना देव.

शिवाजी—मागणी कांहींच नाहीं. या विजापुरांत अमानुष रीतीनं होत असलेला गोवध एकदम बंद करून; हिंदूंना मुसलमानांप्रमाणं धर्मस्वातंत्र्यानें इथें वागूं द्यावें ! ज्याप्रमाणें मुसलमान या गादीची रयत आहे त्याचप्रमाणें हिंदूही आहे ! तख्ताची चाकरी मुसलमानांपेक्षां अधिक नाहीं तरी खास बरो-बरीनें हिंदूंनीं बजावली आहे, हें शहांना नाकबूल करून चालणार नाहीं.

अदिलशहा—राजे शिवाजी, हिं , मुसलमानांना बरोबरीनें वागवायला अदिल-शाही केव्हांही तयार आहे !-पण आपली दुसरी अट—

शिवाजी—शहा, ती अट कबूल करण्यावरच हिंदूंना विजापुरांत मुसल-मानांच्या बरोबरीनें न्याय मिळणार आहे ! गाईच्या बरोबर आम्हां हिंदूंच्या पवित्र भावना आज हजारों वर्षे एकजीव झाल्या आहेत ! त्या आमच्या धार्मिक भावनांना धक्का देऊन मुसलमानांच्या बरोबरीनें वागण्याचा शब्द देणें म्हणजे नुसता लपंडाव खेळणें होय.

अदिलशहा—राजे शिवाजी, आपल्या दोस्तीकरतां हा पेंच आम्ही सोड-वायला तयार आहों ! आजपासून विजापुरांत-उघडपणें गोवध कधींच होणार नाहीं-एवढेंच नव्हे तर रहदारीवर गोमांसाचा विक्रा करणाराला हिंदूंनीं वाटेल ती सजा केली तरी त्याची फिर्याद या अदिल दरबारीं मंजूर होणार नाहीं. कबूल आतां ? काय नाहीं ?-राजे, या अदिलशहाच्या वाढदिवशीं एकही गाय या विजापुरांत मारली जाणार नाहीं.

शहाजी—कबूल ! या उपकाराबद्दल विजापूरचे हिंदु हुजूरचे ऋणी आहेत !

अदिलशहा—राजे शिवाजी, आतां तरी दोस्तीचा हात—

शिवाजी—आपल्या हातीं द्यायला कांहींच हरकत नाहीं ! माझी मागणी पूर्णपणें मान्य झाली नाहीं. तरी पण ती अट मुसलमानांना जुलूम वाटली असती म्हणून मीच ती आनंदानें मागें घेतों ! शहा अदिल, बाबांना पूर्वींच वचन दिल्याप्रमाणें आजपासून ही आपली दोस्ती कायम झाली ! मराठे विजापूरला कधींच त्रास देणार नाहींत ! (हातांत हात देतात.)

गुल्शन—भोंसले, त्या मुक्या दुबळ्या गाईंचा इन्साफ या दरबारीं करून घेतलास, पण गुल्शनचा इन्साफ कोणत्या दरबारांत होणार ?

शिवाजी—खुदाच्या ! गुल्शन, त्या प्रेममय परमेश्वराच्या दरबारीं !

गुल्शन—काय ? खुदाच्या ! खुदाच्या ? हो खुदाच्याच ! ! ! (बेशुद्ध पडते.)

गुलाबखान—या अल्ला ! ये क्या आफत गुदराया ? (तिला सांवरून धरतो.) तोबा-तोबा—

शहाजी—
अदिलशहा— } याचा अर्थ ?

शिवाजी—हा कठोर शिवाजी ! !

## — अंक तिसरा समाप्त —

... वा... ता. ...

# अंक चौथा

## प्रवेश पहिला

[स्थळ—विजापूर. गुलाबखानाचा कसाईखाना. गुलाबखान.]

गुलाबखान—शेवटीं हरामजादा विसाजीच ठरला अं ! शिवाजी, कोणत्या रीतीनें तुला सर्फराज करूं ? गुल्शनला नजर करून-पण हें शक्य आहे का ? प्रत्यक्ष गुल्शनच्या इष्काचा इतबार ज्यानें अभिमानाच्या मोहबतीखातर राखला नाहीं तो माझ्या शब्दाचा काय मुलाहिजा राखणार ? [शिवाजी प्रवेशतो.] कोण ? शिवाजी ?

शिवाजी—हां जी खान ! आपण मला बोलावलें ?

गुलाबखान—हां राजाजी ! पण आपल्याला डर ?

शिवाजी—डर ? कां म्हणून ? हातघाईच्या झुंजींत दुष्मानाच्या शेंकडों समशेरींच्या कैचींत बेडर छातीनें उडी घ्यायचा या शिवाजीला चांगला अभ्यास आहे ! आणि छपत येणाऱ्या जंगलच्या शेराच्या किरणांतून शीरसलामत असा मी बहुत वेळां निसटलों आहें—

गुलाबखान—पण या गुलाबखानाच्या शब्दावर विश्वास ठेवून या कसाईखान्यांत पाऊल टाकतांना गेल्या प्रसंगाची आठवण नाहीं झाली ?

शिवाजी—जानाच्या मोलानें जबान देण्याचा या शिवाजीचा रिवाज असल्यामुळें जातिवंताच्या जबाबादर मी खुल्या दिलानें बेशक विसावतों ! उलट आणि या कसाईखान्यांत पाऊल टाकतांना तर पावलागणिक दयेचा रुजामा पसरल्याचा भास होऊन, दग्याची कल्पनासुद्धां मनाला शिवत नाहीं ! एकाद्या लाचार गाईचा प्राण या शिवाजीला पुण्याईची जोड करून देण्याकरतां हंबरडा फोडीत असेल अशीच माझी भावना होती.

गुलाबखान—पण या कल्पनांना फोल ठरविणारा दगाच जर घडला तर ?

शिवाजी—दग्यानें हल्ला चढविणारा ज्याप्रमाणें जातीचा मर्द नव्हे, त्याच

प्रमाणें सीध्या जबानाची कदर न राखणारी अवलाद अस्सल बीजाची नव्हे! जातिवंताचें तेज डोळ्याला डोळा भिडतांच हृदयाला पटत असतें! आणि धर्माधर्माचा विचार न करतां अस्सल बहाद्दर अशा जातिवंतापुढें खडा होतो! आपका इरादा?

गुलाबखान—निखालस दोस्तीका! मगर एकच सवाल—

शिवाजी—कोणता?


गुलाबखान—गाईचा पालनवालाच गाईचा खाटीक झाला तर फिर्याद कुठें न्यायची?

शिवाजी—म्हणजे काय समजूं मी खान?

गुलाबखान—खुल्या जाबानें खुलासा पाहिजे. राजा, राजा, तूं एक निर्दय खाटीक आहेस रे खाटीक आहेस! तुझ्या भयंकर कसाईपणापुढं या गुलाबच्या हातीं असलेला हजारों गाईंच्या रक्तानें निथळणारा सुरा शरमेनें थिजून जाईल! दिलदारीच्या जाळ्यांत भोळा जीव फशीं पाडून त्याला मारणाऱ्या कसायापेक्षां, राजरोस सुऱ्याखालीं गाईची कत्तल करणारा कसाई कसा पापी ठरेल! होय ना? ती पहा अल्लाच्या सुरीखालीं मान देतांना कावरीबावरी झालेली, सुटकेच्या आशेनें तुझ्याकडे टवकारून पाहणारी एक गरीब गाय! निर्ढावलेल्या या गुलाबच्या हृदयाला या देखाव्यानें कांहींच वाटत नाहीं; पण हे पहा, तुझ्या अंगावर शहारे आले! शुंजांत रक्तामांसाचा चिखल तुडविणारे तुझे पाय हा देखावा पाहून लटपटूं लागले! ती पहा, घाव बसणार इतक्यांत ती गाय तुझ्याच रोंखानें चौखूर उधळली! राजा, जिवाच्या करारावर तूं या वेळीं या दुबळ्या जिवाचें रक्षण करशील! (गाय धांवत येते. शिवाजी तिला मिठी मारतो.) अहाहा! या जिवावर स्वतःच्या देहाची ढाल घातलीस पण माझ्या गुल्शनच्या जिव्हारीं घाव घालतांना तुला दया नाहीं ना आली?

शिवाजी—कबूल-कबूल, त्रिवार कबूल! खान, हा शिवाजी कसाई आहे! पण या नकळत झालेल्या हत्येबद्दल-गुलाबखान, तसल्या कोमल भावनांना या शिवाजीचें हृदय स्मशान बनलें आहे! सरावानें बेछूट बनलेला आपला हातसुद्धां हा प्रसंग पाहून दयेनें या वेळीं कांपूं लागेल.

अल्ला—(रक्तानें निथळणारा मोठा सुरा घेऊन प्रवेशतो)—बिलकूल नहीं.



**शिवाजी**—हा कसाईखाना एकदम बंद करा. अंक ४ था—पान ५९.

**शिवाजी**—या दुनियेंतलीं मानवी दयेचीं बंधनं इतक्यांतच कायमचीं तुटलीं नाहींत ! अल्ला, अल्लाच्या नांवानें तुझ्या माचा जीव अल्लाघरीं जातांना शेवटच्या घडीला कसा तडफडत असेल, तो प्रसंग ध्यानीं आण ! आणि मग जिवाच्या आशेनं या शिवाजीचा आसरा घेऊन उभ्या असलेल्या या भेदरल्या जनावराकडे पहा ! कृतांत काळाचा डोळा पाण्यानें भरून येईल ! तो पहा, उचललेला तुझा हात खालीं होऊं लागला ! अल्ला, कसायाचं सुद्धां हृदय दयेला पारखं नसतं, समजलास ! गुलाब-गुलाब काय वाटेल तें मागा, पण या मुक्या जनावराला अभय द्या. काल दरबारीं मनगटाच्या जोरावर गोवधाचा प्रतिबंध करवला, पण आज तोच हा शिवाजी तुमच्याजवळ या गरीब गाईच्या जिवाची देणगी मागत आहे ! खान, मनगटाच्या मर्दुमकीवर घडून येणाऱ्या कृत्यांपेक्षां मनाच्या उमाऱ्यासरशीं होणारीं कृत्यें अधिक मोलाचीं असतात ! गुलाब, काय वाटेल त्या अटी घाला; पण हा कसाईखाना एकदम बंद करा.

**गुलाबखान**—अटी कबूल ?

**शिवाजी**—कबूल-एकदम—

**गुलशन**—( आंतून ) भोंसले, जाब रोखून धरा !-जाब रोखून धरा ! ( प्रवेशून ) बाबा, गुलशनचा इन्साफ झाला ! माझं आपल्याकडचं गाऱ्हाणं संपलं ! राजे शिवाजींनीं आपली अट पूर्ण केली असं समजून कसाईखाना एकदम बंद करा !

**गुलाबखान**—क्या ? क्या बात ?

**गुलशन**—बाबा, मी होऊन माझ्या इष्काला मूठमाती देऊन, आल्या घडीला तोंड द्यायला तयार आहें ! असला मोहरा शब्दाच्या पकडींत इरेस घालून, साऱ्या देशाचा तळतळाट मी कां घेईन ? गर्दन उतरणारी समशेर माथीं झळकली तरीसुद्धां ज्याच्या तोंडून दीनवाणा जबाब निघायचा नाहीं-तोच हा बरकंदाज आज लाचारीनं बाबा, आपल्या दारीं भिकारी झाला ! केवढं ताज तकदीर आपलं ! अल्ला, टाक-दे टाकून तो सुरा; आणि याच मुक्या जनावराला आपली पुण्याई समजून हिला परत घेऊन जा !

**शिवाजी**—गुलशन-गुलशन, या शिवाजीला आज तूं लाजवलेंस ! आजच्यासारखी नामुष्की साऱ्या हयातींत या शिवाजीला आली नाहीं ! माझ्या येत्या आयुष्यांतील बऱ्याबुऱ्या प्रसंगांची आठवण म्हणजे तुझें पुण्यस्मरण !- जा-

गोमाते, जा, ज्या या आवारांत मृत्यूचा थैमान तुला आजपर्यंत दिसला, त्याच या आवारांत नंदनवनांतलें सुख तुझ्या अनुभवाला येईल !!

गुल्शन—जा अल्ला. परवरदिगारचें नांव घेऊन, आजपर्यंतच्या पापाची क्षमा या मुक्या जिवाजवळ माग ! एका दुबळ्या हृदयाचा प्रेमाचा दुवा सात जन्मांच्या दावेदारीला शह देतो !

अल्ला—बेशक ! याच घडीपासून हा कसाई मामला खलास झाला ! चलो—[ गाईला नेतो.]

शिवाजी—गुलाबखान—

गुलाबखान—शिवाजी—

शिवाजी—आपली आठवण मी कधींच विसरणार नाहीं ! जातों मी.

गुलाबखान—पण गुल्शनची वाट ?

गुल्शन—भोंसले, आपला जबरीचा रुकार माझ्या कानीं कधींच आला नसता ! पण वेड्या प्रेमाला शरम नसते ! राजे, माझ्या इष्काचा हिरमोड करणारच ना ?—

पद २१ वें. [कवाली]

**हा जीव गुंतलाया। कुर्बान हीच काया। राया ॥ध्रु०॥**
**क्यां छेडिल्या सु ताना। दिल् इष्कमे निशाना। हा दिल्रुबा दिलाचा। कां हो फुटोनि वाया ? ॥१॥**
**चंडोल तूंहि माझा। बोलोनि गोड बोलां। कां मारिला भरारा ?। ही रीत काय सांगा ? ॥२॥**

गुलाबखान—राजा-राजा कठोर नको रे होऊं ! धर्माची राणी म्हणून नाहीं, पण निदान प्रेमाची तरी भिक्षा या निराश गुल्शनच्या पदरीं टाक.

शिवाजी—आणि असल्या कृत्यानें रंगेल अनीतीचा धडा मी होऊन माझ्या लोकांना घालून देऊं ! खान, माफ करा ! झाल्या गोष्टी विसरून जा. आपल्या आजच्या उपकाराखालीं दडपून गेलेला हा शिवाजी कायमचा विसरून जा ! गुल्शन-गुल्शन, तुझ्या बहरल्या उमरीचा अनादर करून, ओठीं लावलेला तुझा इष्काचा प्याला फोडून, तुला उभ्या आयुष्याचा तिट्कारा आणणाऱ्या या शिवाजीला, त्याचीं ऐहिक बंधनें तोडून आपल्या दारीं न्या असें खुदाला

विनवीत रहा ! खुदाच्या दारीं राष्ट्र, धर्म आणि जबाबदारी यांच्या कैचींतून कायमचा मुक्त झालेला हा शिवाजी–तुझ्या प्रेमाचे प्याले मनमुराद झोंकतांना, विश्वाच्या घडामोडीला कल्पांतापर्यंत विसरून जाईल !

पद २२ वें. [ राग–भैरवी, दादरा ]

**सखि ! नच प्रेमा मनीं येथ थारा । भावना-**
**सुखाचा सारा पसारा ॥ ध्रु० ॥ सुखें सुरपुरीं जातां ।**
**प्रेम-मधुर-पानीं । सेवनीं विसावूं सोडी विकारा ॥१॥**

[ जातो.

**गुलाबखान**—वारे बहाद्दर ! असला दाणा शिपाई अलमगिराच्या अलमगिराकडूनसुद्धां स्वतःची गादी हिसडून घेईल ! मनाची तेढ जाऊन हा गुलाब खुदाचा अवतार म्हणून शिवाजी तुला सलाम करीत आहे ! परवरदिगार, वैसा मोहरा, तुमारी मेहरबानीके आबादी आबादके वास्ते इस दुनियामें सलामत रखो.

**विसाजी**—(प्रवेशून) किस्कू-किस्कू सलामत रखो ? साहेब, किसकू सलामत रखो ? विश्वासानं हातांत हात घालून वागण्याचा बाहणा करून, वेळ येतांच नीचपणानें उलटून पडणारे कुणाच्या जिवाकरतां खुदाला विनवतात ? गुलाब, तुमची जात इतकी उलटी, दगाबाज आहे असें जर मला पूर्वींच कळतें तर दरबारांत तुमच्याकरतां जातभाईवर मी कधींच उलटलों नसतों ! दुसऱ्याला कमजात लेखून, विश्वासघातानं त्याचा गळा उतरणारी जात तुम्हां मुसलमानांशिवाय दुसरी कुणाचीच असणें शक्य नाहीं—

**गुलाबखान**—बेवकूफ हैवान ! ही जात मुसलमानांची नाहीं ! तुम्हां हिंदूंचीच ही अवलाद आहे समजलास ! हाडाचा कट्टा मुसलमान "मा" म्हणतांच तिच्याकरितां मान द्यायला तयार होईल; पण विश्वासघात करणार नाहीं ! शिवाजीसारखा जातिवंत हिंदु जसा परक्याच्या इभ्रतीला, स्वतःच्या अब्रूइतकाच जपतो तसाच नेकजात मुसलमानसुद्धां शिवाजीसारख्या पवित्र महात्म्याच्या पायांवर शीर बहाल करायला कमीपणा मानीत नाहीं ! दगाबाजी जातिवंताला माहीत नसते.

**गुलशन**—कशाला बोलतां बाबा ? दरोग्याच्या राईंत माझ्यावर हात टाकतांना, शिवाजीच्या समशेरीनं हाताचा पट्टा उतरला म्हणून चिडून गेल्यामुळं आपल्या खुदाच्या गुणांच्या जातभाईचासुद्धां ज्याला विसर पडला त्याच्याशीं बोलण्याचीच काय पण त्याच्याकडे पाहण्याची सुद्धां त्याची लायकी नाहीं.

विसाजी—शिवाजीच्या मोहिनीनें बेहोष झालेल्या बाजाऱ्या बेगम—

गुलाबखान—खामोष, बेफाट फूत्कार टाकणारी ती जहरी नागीण पुढच्या फूत्काराबरोबर बत्तीशीचे चिरे उखळून बाहेर हिसडली जाईल!

विसाजी—या नटव्या पोरीला माझ्या हातून सोडवतांना प्रत्यक्ष शिवाजीच्या समशेरीला ज्याचें हृदय बिचकलें नाहीं त्याला एका लेच्यापिच्या सरदाराच्या लवचिक जिभलीची काय दहशत वाटणार?

गुलशन—ज्या पापाला आजपर्यंत तोंडांतून वाव मिळाला नाहीं, तेंच पाप आज आपण होऊन बाहेर पडलं!

गुलाबखान—आतां तरी कबूल झालास? दोस्तीच्या पोटीं माझ्या पोरीच्या अब्रूवर टपलेला चोर तूं—

विसाजी—होय. मीच–मीच! सरदारसाहेब हा विसाजीच! इतक्या दिवस आपली भुलावणी झाली, पण आतां मात्र आपल्याला कशाचीच काळजी नको! भयाची मर्यादा ओलांडून निराशेवर स्वार झालेला कुठंही उघडपणानं संचार करायला माघार घेत नाहीं!

गुलाबखान—विसाजी, कुणापुढें हें बोलतोस? गुलशनचा बाप जिवंत हाडानें तिचा पाहरा करीत असतांना, चोरी तर राहोच; पण नुसत्या वांकड्या नजरेबरोबर डोळ्यांचे गोळे बाहेर पडतील! कांहीं शीलाची चाड?

विसाजी—त्याजबरोबर तुम्हीं आपल्या शीलाचा विचार नको का करायला? या विसाजीला विश्वास देऊन, एकदम मोहरा फिरवतांना, तुम्हीं आपल्या शीलाचा विचार केला होता का? महत्त्वाकांक्षेची पूर्तता करतांना पापपुण्याचा विचार मानवी हृदयांत रहात नाहीं आणि मत्सरी मनाचा डाव त्याच्या दुष्मनाच्या राखेबरोबर गाडला जातो! गुलाबसाहेब! बोला, घेतलेली अल्लाची कसम तुम्हीं पाळायला तयार आहांत कीं नाहीं?

गुलाबखान—जान जाईल; पण तुझ्या हातीं माझा दोस्तीचा हात राहणार नाहीं!

विसाजी—दोस्तीच्या पोटीं नाहीं तर दुष्मनाच्या दावेदारीनें, या मनगटाच्या जोरावर, जागच्या जागीं डांबून, दुष्मन म्हणून शेवटचा सवाल करतों–बोल, तुझ्या या बिजलीच्या, इष्काच्या जाळ्यांत त्या भोंसल्याला पकडून आज रात्रीं याच ठिकाणीं माझ्या हवालीं करणार कीं नाहीं? पोरीच्या ओढणीआड

शिवाजीला जीवदान देऊन, आपल्या हातीं आपले प्राण गमावणार कीं पोरीहातून शिवाजीला माझ्या स्वाधीन करण्याचा हवाला पटवून प्राण वांचवणार ?

गुलाबखान—कुत्तेकी अवलाद! हा जिवंत मुसलमान, या जिवापेक्षां लाखों दुब-यांच्या पोशियालाच वांचवील.

विसाजी.—ठीक आहे! तर मग मर! एका शिवाजीच्याच रक्तानें रंगणारे हे हात तुझ्या पोरीच्या आणि मग शिवाजीच्या रक्तानें रंगतील येवढेंच ना! कूच फिकीर नहीं! या कट्यारीच्या घावानें तुझे डोळे मिटतात न मिटतात तोंच, तुझ्या या रंगेल पोरीच्या भरल्या छातींत, तुझ्या रक्तानें निथळणारी ही कट्यार तूंच पाहशील! जा-मर—(कट्यार मारतो.)

गुलाबखान—या अल्ला! परवरदिगार! (पडतो.)

गुलशन—अल्ला-अल्ला ये क्या हो गया? मेरे जान, तुमारा लडकीका आगे खुदाका दरबार तुमकू कैसा मंजूर हुवा?

विसाजी—बस्स, बेगम खुदानें एवढेंच मंजूर केलें नाहीं तर या गुलजार गुल्शननें जर माझ्या मनासारखा नूर बदलला नाहीं तर एकाद्या फुलाप्रमाणें या हातानें अशी चुरडून—(हात धरतो).

गुलशन—छोड. हरामजादा, छोड-छोड देव! बाबांच्या मरत्या वडीला धांवून यायला वेळ लागलेला परवरदिगार या गुल्शनची अब्रू मातीला मिळण्या-आधींच इथं खडा होईल!-समजलास! ते पहा, जिजामांच्या मेण्याबरोबर राजे शहाजी-माझा परवर दिगार-तुझा काळ!

विसाजी—काय शहाजी?

गुल्शन—धावा-धावा. शहाजीराजे, जिजामा, धावा.

शहाजी—(आंतून)-कुणीं पुकारलें? कोण? गुल्शन आणि विसाजी?

विसाजी—(स्वगत) अरे, डाव उलटला अं! शिवाजीच्या जिवाची ही कळसूत्री बाहुली याच वेळीं मोडून उपयोगी नाहीं! हे जीव-मृत्यूचे पवित्रे यशस्वी चालवायचे तर या वेळीं मलासुद्धां हा असा-पळता पवित्राच घेतला पाहिजे!

गुल्शन—धावा, हा पळता बदमाष जीवें सोडूं नका.

विसाजी—हा पळना बदमाष जीवें तर सुटलाच; पण तुमचे जीव मात्र बरोबर घेऊन चालला !—                                                    [ जातो.

शहाजी—( प्रवेशून ) काय ? पळाला ? आणि हें काय ? खान ! खून ? विसाजी ! धाव, हिंदूच्या बीजाचा असशील तर शहाजीच्या समशेरीच्या टापूंत खडा रहा !-राणी, गुल्शनला महालीं न्या. गुल्शनचा अपराधी तिच्यासमोर बांधून आणतों !—                                                    [ जातो.

गुल्शन—काय झालं हें ? मा-मासाहेब काय झालं हें ? जिवाचा आधार म्हणून ज्याला मनाचा रंगमहाल बहाल केला, त्यानं त्यावर अंगार ठेवला ! प्रेमाचा बाप या कसायाहातीं खुदाच्या दारीं गेला ! आणि एकटी पोरकी पोर जगाच्या सुखाला मुकून अशी जिवंत राहिली ! जान ठेवूं कुणाकरतां ? मा, तरुण मनाचे खेळ खुल्या दिलानं कसे सांगूं ? खुदानं आपल्या शिवरायासारखा हिरा हातीं दिला; पण माझ्या कमनशिबानं कुठं हरपून गेला ! पाहातां पाहातां हातचा बुलबुल भरारला ! त्याची भिक्षा मी नाहीं मागत; पण एकच आशा पुरवा ! या पोळून गेलेल्या जीवाचं समाधान करा; माझा दुष्मन विसाजी, राजे शिवाजीहातींच मरूं द्या ! ज्याच्या कारणानं हा दिल् शिवाजीवर आषक्त झाला तें कारण शिवाजीहातींच नाहींसें करून माझा जीव मोकळा होऊं द्या ! एवढी-एवढीच जोड मला द्या—

जिजाऊ—काय सांगितलंस गुल्शन ! वेडे पोरी, आंतड्याला पीळ पडून या भोळ्या जीवाला आधार देण्याकरतां बाळाला पुढें करावा असं वाटतं; पण समाजतेजाच्या दृष्टीनं मन कठोर करावं लागतं ! ठीक आहे; तुझ्या प्रेमाच्या पुण्याईनं जर तो चांडाळ राजांच्या समशेरींतून वांचला, तर तीन घटकांच्या आंत, शिवाजीची समशेर, तुझ्या दुष्मनाचं रक्ताळलेल मस्तक तुझ्या पायीं हजर करील !!                                                    [ पडदा.

---

## प्रवेश दुसरा

[ स्थळ—विजापूर. अल्ला फकीरी वेषांत प्रवेशतो.]

अल्ला—या अल्ला. क्या तरी हालत ? गुलाबखान खतम हुवा ! खाटीकखाना-खाटीकखाना तर त्या बेट्या शिवऱ्यानें ओस पाडला !

मी मी म्हणणाऱ्या गाईंना लोळवणाऱ्या या अल्लाला एखाद्या मव्या गाईनें सुद्धां आतां खुशाल हुशी द्यावी असा बुरा वक्त आला आहे! होता नव्हता तेवढा इष्काचा खजिना त्या गजरेपुढें उधळून दिला, पण इष्काचेंच दिवाळें निघून, शेवटीं इष्काचा एक थेंब सुद्धां चाखायला नाहीं मिळाला तो नाहींच! खरेंच, नव्या पोरींच्या नादीं लागून, पागलपणानें बुड्ढ्या बुड्ढ्यांच्या अकलेचें सुद्धां दिवाळें वाजायचें! ही इष्काची आबादानी म्हणजे एक जात पागलपणाचा बाजार! अल्ला, तेरी हालत!

**गजरा**—( प्रवेशून स्वगत ) जीवाची मैत्रीण गुल्शन, तिच्या संसाराची ती तशी दशा झाली! गुलाबखान सोडून गेले! आणि मी मात्र अशी धट्टीकट्टी राहिलें! एकनिष्ठ जिण्याला धन्यामागं जगणं मरणापेक्षांही कठीण असतं! आतां करूं तरी काय?

**अल्ला**—क्या किया जाय? अल्ला, क्या किया जाय?

**गजरा**—हा मेला कोण इवळतोय इथं! सगळी दुनियाच रडूं लागली कीं काय? कोण? अगबाई! हा तर मेला अल्ला!

**अल्ला**—कौन? प्यारी गजराजान!

**गजरा**—नादान, अरे धनी मरून पडला आहे तरीसुद्धां प्यारीचा नाद नाहीं ना सुटत?

**अल्ला**—गजराजान, धनी मेले म्हणून या अल्लाला किती वाईट वाटतं म्हणून सांगूं? रडून रडून अश्रु आटले! आणि आतां तर तूं समोर उभी! डोळ्यांतले अश्रु जिथल्या तिथंच थबकून जर त्यावर निराळीच चमक तुला दिसली तर ती जादू तुझी! खरा मर्द इष्कापायीं कबर फोडून बाहेर पडेल!! मग मी तर काय? इष्काच्या निशाणाखालचा बांका बरकंदाज! दुःखानें मेलों म्हणून मनानें ही मेलों कीं काय?

**गजरा**—अल्ला, इष्काचं नांव निघतांच तुझे अश्रु थबकून,—आनंदानं तुझे डोळे चमकायला लागले; पण माझे अश्रु थिजून डोळेसुद्धां पांढरे व्हायची वेळ आली त्याला मी काय करूं?

**अल्ला**—त्याला एकच उपाय! गाईची गर्दन उतरणाऱ्या या अल्लाच्या सुऱ्याला जी जखम उभ्या आयुष्यांत करतां आली नाहीं ती जखम सहजा-सहजीं करणाऱ्या त्या तुझ्या डोळ्यांच्या आधीं खांचा कर! बोलघुमटाऱ्या

कलाकुसरीवर मात करणाऱ्या हातांनीं घडवलेला तुझा हा मुखवटा, एकाद्या फत्तरफोड्यासमोर आधीं ने-आणि त्याच्यावर आधीं टाकी देऊन टाक ! 'गुल्शनला शिवाजीस भेटूं दिलें तर मी तुमच्याशीं शादी करीन' असें वचन तूंच ना दिलें होतेंस ?

गजरा—मग ? वेळेपुरतं कुणालाही वचन द्यायला काय हरकत ?

अल्ला—म्हणजे ? तें खोटेंच कीं काय ?

गजरा—म्हणजे ? तें खरंच कीं काय ?

अल्ला—मग त्याच वेळीं तसें साफ कां नाहीं सांगितलेंस ?

गजरा—मूर्खाला फसवणं किती सोपं असतं याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला—

पद २३ वें. [ कवाली ]

**या जगिं असे फुका का प्रेमा ? । प्रणयकामा ।**
**सांग काय रामा ? ॥ ध्रु० ॥ हंसे क्षणाला । रुसे**
**क्षणाला । पावे नितांत गुणांत प्रेमी विरामा ॥ १ ॥**

अल्ला—आज फारशी बेताल बडबडतेस ?

गजरा—पुरुष असे बेताल झाले म्हणजे त्यांना ताळ्यावर आणण्याकरतां बायकांना व्हावंच लागतं असं बेताल !

अल्ला—पण चार दिवसांपूर्वी "अल्ला" म्हटलें, कीं तुला देव दिसत होता; आणि आजच—

गजरा—पण आज परिस्थितीनें या अल्लाचे पाय पुरे मोडले आहेत हें मला पक्कं माहीत आहे !

अल्ला—आणि माझे पाय असे मोडले म्हणून तुला हे नवे फुटले वाटतें ? आणि पायांबरोबर जिभेलाही फाटा फुटला वाटतें ?

गजरा—जिथं मेल्या पुरुषांच्या अकलेला फाटा फुटला तिथं बायकांच्या जिभेला सुद्धां फाटा फुटूं नये कीं काय ?

अल्ला—बस्स, मा माझे-सबूर ! जीव गुदमरला अगदीं ! शेवटीं काय करायचें ठरवलें आहेस तूं ?

गजरा—राजे शिवाजीबरोबर, पुण्याकडं जायचं आणि जिजामांच्या सेवेंत सारं आयुष्य घालवायचं !

म. ... वा. क. ... ९९५ नों. दि ... वि. ...

**अल्ला**—ठीक ! या सैतानानें विजापुरांत आल्या दिवसापासून काय हायदोस हमामा मांडला आहे हा ? गुल्शनसारख्या अकले-दर्जांच्या बेगमला भुलवतां भुलवतां, शेवटीं माझ्यासारख्या बाजारबुणग्याच्याही इष्कावर याची धाड आली अं ? वा रे शिवाजीराजा ! !

**गजरा**—अकलेला द्या आतां रजा ! शिवाजी एवढाच उद्योग करता तर साऱ्या दुनियेंतली स्त्रीजात त्याची बटीक होती ! पण पतितांना पावलागणिक सांवरणाऱ्या या "शिवसम्राटा"ला या विषयाचा वीट आला आहे ! आणि म्हणूनच गुल्शनबीची अशी अवस्था झाली आहे बरं !

**अल्ला**—जाना देव-जाना देव ! गजरा, कशाला हव्यात या मोठ्यांच्या गोष्टी आपणां गरिबांना ? पण गजरा, पुण्याला जातां जातां या गरिबाला एकदां आपल्या पदरांत घेऊन—पुण्याईची जोड कर ! कांहीं दया ? माया ?—अगदीं कसाबासारखी कां ग वागायला लागलीस ? कसाबाशीं वागतांना कसावकरणीच करावी कीं काय ?

**गजरा**—अलबत् ! मला आतां तुझ्याशीं वायफळ बडबडायला मुळीं वेळच नाहीं. गुल्शनबी राजांच्यावरोबरच पुण्याकडे जाणार. त्यांची व्यवस्था मला करायची आहे. अल्ला तुझ्या इष्काचा प्याला फोडून टाकतांना, थोडं सुद्धां मला वाईट वाटत नाहीं बरं का ? तुझ्यावर दया करण्याकरितां, हृदयांत दयेला थारा देऊन, स्वतःबरोबर स्वकीयांचा अधःपात करण्यापेक्षां धर्मांतर टाळून, एकाद्या जातिवंताच्या पायीं बटीक होऊन राहणं चांगलं बरं का ?—

पद २४ वें. [भैरवी कवाली.]

**येई उदयाचला हा नवा सूत्रधार ॥ ध्रु० ॥ भोळी भाळी नार । त्यजोनिया विकार । "स्वधर्म" करि पुकार ॥ हा० ॥ १ ॥ विलासी विचार । मनीं घे न थार । स्वधर्म एक प्यार ॥ २ ॥**

**अल्ला**—या अल्ला ! तोबा-तोबा ! बोलघुमटावर कोळ्याच्या धाग्यानें टांगलेला माझ्या आशेचा भोंपळा, बेदरकार फोडून, त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या कीं या पोरीनें ! माझ्या इष्काच्या नाटकांतला शेवटचा प्रवेश शेवटीं असा रंगला अं ? या रानवट हिंदूंना दयेची पछान नाहीं ! दाढी कापून डोक्याला शेंडी म्हणून चिकटवण्याची परवानगी जर माझ्या धर्मानें ठेवली असती, तर

इष्कापायीं मरून पडलेल्या शेंकडों मुसलमानांचे तांडेच्या तांडे कबरा फोडून बाहेर पडले असते! अल्ला, क्या तेरी हालत! बस्स, ठरला मनसुबा! गजरा नाहींतर नाहीं-पण गजरेच्या गेंदाची बरोबरी करणाऱ्या गेंदबाज फुलांचे हारगजरे अंगावर लेवून, साऱ्या हयातभर, इष्काचे खडे बोल-या विजापुरांत सारखा छेडत राहणार! इष्काचा बहाद्दर इष्काच्या रणांगणावरच गारद झाला पाहिजे! बस्स ठरला मनसुबा—

**इष्काचा प्यारा। इस नगरीमें भुलगया अल्ला।**
**गजराका प्यारा। इस दुनियामें गिर गया अल्ला ॥१॥**

---

## प्रवेश तिसरा

[स्थळ—**विजापूर**. शहाजीचा बाग; **गुलशन** ताज गुंफीत आहे.]

**गुलशन**—आलें अं बाबा! थांबा,-एक घडीभर धीर धरा. या गुलशनच्या आयुष्याच्या शेवटच्या निराश घडींतली आशा पूर्ण होते का पाहूं या! आपल्या दुष्मनचा सूड या माझ्या आशेच्या घटकेला आहे! माझ्या मातीमोल इष्काचं समाधान याच घटकेला आहे! विसाजीच्या दुष्मनगिरीच्या मुर्दावर हा राहिलेलीं शेवटचीं फुलं उधळून-विजयी हिंदू मर्दाला-रानदौलतीचा हा पादशाही ताज माझ्या इष्काची शेवटची निशाणी म्हणून नजर करून दुष्मानाचा सूड घेतल्या-बद्दल, त्याच्याच पायीं हा देह ठेवतें बरं! बाबा-बाबा, या दुनियेच्या बागशाहींत माझ्याकरतां आतां एकही फूल नाहीं हें मला कळतं; आतां निराशेच्या सरणावर जित्या जिवानं जळून, मनानं हिंदू बनलेल्या या गुलशननं-आपल्या अपुऱ्या इच्छेच्या पूर्णतेकरतां, या निराशेच्या जगांत, शिवाजीच्या पायीं पुन्हां जन्माला येण्याकरतां देवादारीं धरणं धरून बसायचं-एवढंच उरलं आहे! बाबा, आयुष्याच्या सांखळींतला जिवाशीं जडलेला एकादा आशेचा दुवा एकाएकीं निखळला तर वासाशिवाय फूल, फुलाशिवाय बागशाही, किंवा चांदाशिवाय आकाश आणि आकाशाशिवाय चांदण्या अशी विपरीत स्थिति झाल्याशिवाय कशी राहील? दुनियेच्या पादशहा, शिवरायाला हा ताज अर्पण करून, आपल्या हातीं इष्काची

फकिरी घेण्याच्या आधींच या गुल्शनच्या सुखदुःखाच्या भावना हृदयांतल्या हृदयांत मरून जाऊं दे—

**विसाजी**—(रक्तानें न्हालेला विसाजी प्रवेशतो.) शहाजीची नजर चुकवून पलीकडच्या रस्त्यानें निसटलों ! आतां काय ? मातीला मिळेपर्यंत भोंसल्याशीं वैर आणि शेवटीं मृत्यु–मृत्यु–मृत्यु हाच माझ्या वांकड्या मार्गाचा शेवटच विजय का ?

**गुल्शन**—कोण विसाजी ?

**विसाजी**—गुल्शन ! वा रे तकदीर ! नाहीं–मृत्यूपेक्षां मोठा विजय आयुष्याच्या या शेवटच्या घडीला मी मिळवीन !

**गुल्शन**—मेरा दुष्मन्—

**विसाजी**—हां जी बेगम ! मरणाच्या दारीं, स्वर्ग, नरक किंवा ही दुनिया यांच्या सीमेवर कुठं तरी घोंटाळणारा तुझा दुष्मन् ! तुझ्या शिवाजीचा दुष्मन्–'हिंदवी–स्वराज्या'च्या भ्रामक कल्पनेचा दुष्मन् !

**गुल्शन**—शिवाजीचा दुष्मन् ? 'हिंदवी–स्वराज्या'चा दुष्मन् ? दिवाना विसाजी, तुझ्यासारख्या कमअस्सलानं, जरी हिंदवी–स्वराज्याची दुष्मनगिरी करण्यांत आपल्या आयुष्याची अशी माती केली तरी शिवाजीचा पादशाही ताज–असा आपोआप तयार होत आहे, त्याला तूं काय करणार ? मानवी दुष्मनगिरीला मूटमाती देणारा बहाद्दर शिवाजी खुदाच्या दयेनं जन्माला आला त्याला तूं काय करणार ? देवाची पूजा तुमच्यांत फुलानं करतात; कोणत्याही पवित्र कार्यांत फुलांचा उपयोग प्रथम करतात ! त्याचप्रमाणं विसाजी, तुझ्या दुष्मनगिरीला तुझ्याबरोबर गाडून, विजयानं शिवाजीराजे इकडे येतांच, या ताजानं तुमच्या धर्मांप्रमाणं त्यांची पूजा बांधीन ! !

**विसाजी**—बेलगाम बेगम, आनंदाच्या वेळीं आमच्यांत ज्याप्रमाणें फुलांचा उपयोग करतात, त्याचप्रमाणें प्रेतयात्रेच्या वेळीं सुद्धां फुलांचा उपयोग करण्याचा आमच्यांत रिवाज आहे—

**गुल्शन**—नादान ! प्रेतावर पडणारीं फुलं गुलालाच्या रंगानं रंगलेलीं असतात ! हा पांढरा कुंदाचा ताज, हिंदवी स्वराज्याची प्रभा अलम् दुनियेंत पसरणार म्हणून थेट हिमालयापासून कुमारीपर्यंत, एकाद्या कपारीपासून तों एकाद्या बगीच्यापर्यंत फुलून, हें स्वराज्याचं मंगल गीत–आपल्या गोड वासानं उधळीत राहील !

**विसाजी**—उन्मादानें बेहोष झालेल्या वेड्या पोरी, हीं फुलें–हा तुझ्या शिवाजीचा पादशाही ताज, सरणावर जळूं पाहणाऱ्या या हातानें हा असा मातीला मिळवून, स्वतःच्या रक्ताच्या गुलालांत घोळून, शिवाजीच्या प्रेतयात्रेला योग्य करायला मला किती वेळ लागणार ? (ताज हिसडून विस्कळीत करतो.)–पहा, या निराश पाकळ्यांकडे ! तुझ्या निराशेची काळिमा या प्रत्येक पाकळीवर दिसूं लागली ! गुल्शन, माझ्यासारख्या दुष्ट मनाच्या माणसाशीं दुष्मनगिरी प्रत्यक्ष परमेशालाही जाचक होईल ! असल्या पवित्र कार्याकरितां तोडलेल्या फुलांना अपवित्र करण्याकरतां रक्ताचाच काय, पण शरीरांत रक्ताचा एकही थेंब उरला नाहीं, तरी स्मशानांत चितेवर धडाड जळतांना, उफाळणाऱ्या भडक ज्वालांच्या रंगानें हीं फुलें रंगवून प्रेतयात्रेला योग्य करायला मी कधीं कमी करणार नाहीं.

**गुल्शन**—बेवकूफ्,आधीं आपली प्रेतयात्रा चुकव आणि मग दुसऱ्याचा विचार–

**विसाजी**—धडाडलेल्या चितेवर पाऊल ठेवूनच माझ्यासारखा भडकलेला जीव जवान खुली करतो ! फुलार बेगम, या गळ्याभोंवतीं यमाचा पाश पडला असतांना, दुष्मनचा भयंकर सूड म्हणून प्यारी, या हातानें तुला अशी डांबून या पापी ओंठांची निशाणी तुझ्या—( तिचा हात धरून बलात्कारानें तिच्या हाताचें चुंबन घेतो.)—बस्स ! आतां खुशाल कल्पांतापर्यंत जिवंत रहा ! या जिवाचा हेतु तडीला गेल्यावर मरणाची कदर कुणाला ?

**गुल्शन**—अरेरे–सैतान–ज्या तोंडानं या गुल्शनचा पवित्रपणा विटाळलास, तेंच तोंड एका घटकेच्या आंत याच पायीं ठोकरा खात येईल.

( पडद्यांत–" पकडा–कोंडून धरा–पकडा " )

**विसाजी**—शहाजी ! इतक्यांत जवळ भिडला ! ठीक आहे; शौर्यापेक्षां गनिमीकावाच विजयी होतो, हेंच याला दाखाविलें पाहिजे. [जातो.

**गुल्शन**—झालं ! आशेची माती–माती झाली ! राजे शिवाजीकडे नुसत्या इष्काच्या नजरेनं पाहण्याचा सुद्धां या गुल्शनला अधिकार उरला नाहीं ! या सैतानानं विटाळलेल्या देहाची दृष्टि जर त्या इलाही अवतारावर भलत्या भावनेनं पडली तर तें राजस रूप काळवंडून जाईल ! खुदाच्या दारीं मी गुन्हेगार ठरेन !–खुदालाच माझं नातं मंजूर नव्हतं !—

( पडद्यांत शहाजी–" हरामजादा, मरायला तयार हो " )

काय ? शहाजींनीं विसाजीला पकडलं ? शिवरायांनीं प्रतिज्ञा मोडली ? माझी सरती आशा–पण हें काय ? राजे शिवाजी ! मेरा तकदीरका शहान्शहा–!

**शिवाजी**—(पडद्यांत) बाबा, तरवार मागें घ्या ! विसाजी माझा बळी आहे! मासाहेबांच्या कुंकवाची आण घेऊन मीं ही प्रतिज्ञा केली आहे.

**गुलशन**—अहाहा ! एकच शिताफीचा वार ! मस्तक धडावेगळं झालं ! धडांतून उसळणाऱ्या रक्ताच्या कारंजांत अगदीं चिंब झालं ! माझी शेवटची आशा पूर्ण झाली ! किती बेहोष दिसतात ? गुलशन, फिरव-फिरव ही दृष्टि, या विसाजीबरोबरच ही इष्काची दृष्टि मरून जाऊं दे ! आणि विजयी शिवराय पुढं येतांच ही इष्काची नजर उघडून-त्यांच्या तोंडावर खिळल्याबरोबर 'भाई' अशी हांक या तोंडून निघूं दे !

[ विस्कळीत झालेला ताज फिरून गुंफूं लागते. शिवाजी व शहाजी प्रवेश करतात.]

**शिवाजी**—( विसाजीचें मस्तक ठोकरीनें उडवून )–हें घे बेगम, प्रतिज्ञेप्रमाणें तुझ्या दुष्मनाचें मस्तक या शिवाजीच्या पायीं तुझ्याकडे ठोकरा खात आलें आहे !--

**गुलशन**—भाई—

**शिवाजी**—काय-काय ऐकलें मीं ? भाई-भाई-गुलशन, केवढा विजय मिळवलास हा ! मासाहेबांना किती आनंद होईल !!

पद २५ वें. [ राग–जोगीमांड, दादरा ]

**जिंकिला पण तुवां आज हा । कोमला । भावना ।**
**बळवुनी । दाविला । विजय हा शुभदाया । ॥ध्रु० ॥**
**व्हाया मान्या । बाला जनाला । खचित तपन कालीं**
**या ॥ १ ॥**

**जिजाऊ**—(प्रवेशून) पण 'भाई' शब्द उच्चारतांच बिचारीच्या हृदयाला होणाऱ्या जखमेची कल्पना येतांच मन उदास होतं !

**गुलशन**—भाई, तुझ्या बहिणीच्या हातचा हा तुटकामोडका "हिंदवी स्वराज्याचा" ताज, नजराणा म्हणून स्वीकारशील का ?—

**शिवाजी**—हा नजराणा भावी यशाचा पूर्वगामी गौरव म्हणून मी आजन्म हृदयाशीं ठेवीन ! पण हा असा विस्कळीत कसा झाला ? कलाकुसरीच्या कामांत आमच्या पडदानशीन बेगम इतक्या मागसलेल्या !

गुलशन—नाहीं ! भाई, कलाकुसरीचे नाजूक हलके हात नेहमीं गोषांतच राहायचे ! पण कुलवंत मराठा मर्दाला शकुनानं केलेला हा " ताज " मरतां मरतां त्या दुष्मनानं असा मातीला मिळवला !

शहाजी—अरेरे ! आमचेच लोक नीचपणानें " स्वराज्याची " अशी दावेदारी साधूं लागले, तर अपयशाबद्दल कुणाला दोष द्यायचा ?

शिवाजी—पण कर्तबगारीच्या जोरावर, असले मातीला मिळालेले मुकुट पुन्हा त्याच मातींतून चमकायला लावतां येतात ! बाबा, " हिंदवी-स्वराज्याचें " वैभव स्वकीयांपेक्षां परक्यापायींच अधिक खुलत जाणार, असाच विधिसंकेत दिसतो ! गुलशन, उमामहेशाच्या कृपेनें, " हिंदवीस्वराज्याची " अशीच उत्क्रांति करण्याची प्रेरणा, तुझ्यासारख्या देवतांच्या हृदयांत होत जावो म्हणजे झालं !

गुलशन—राजा तुझ्यासारखा " दख्खनचा मोहरा " जोंपर्यंत मराठ्यांचा बादशहा आहे तोंपर्यंत मराठशाहीचा जयजयकार नी जयजयकारच होत राहील !!

शहाजी<br>जिजाऊ<br>शिवाजी } तथास्तु ! तथास्तु !! तथास्तु !!!

## कोरस

पद २६ वें. [ राग–अरबी, त्रिताल]

**विजया । भारत-भू-माता । कलि जरि । करि न**
**कधीं । संकरा भुवनिं या ॥ ध्रु० ॥ शिव-विमल-विभा ।**
**अखिल जगा । दिपवि सर्वदा । लव नच कदा । दिसे ।**
**कुणा । यशीं । हता । अमरपदा । पावली भुवनिं या ॥१॥**

समाप्त

**गजरा**—(स्वगत) हा तर 'मरगया' ओरडला ! आणि तरवार तर खालीं पडल्याचा आवाज आला ! हा खरंच मेला कीं मेल्यानं मेल्याचं नुसतं सोंग केलं ! कांहींच कळत नाहीं ! पुढंही होण्याचं धाडस होईना ! आतां पारडं उलटणार कीं काय ?

**अल्ला**—( पडल्या जागेवरून ) मी खराच जिवंत आहें कीं सैतानच फरारी झाला ? कीं मीच सैतानाच्या राज्यांत आहें ?

**गजरा**—( स्वगत ) करावाच जिवाचा धडा ! पाहतें हळूच मेला कीं काय तें ! मेला असला तर करावा पोबारा—(हळुहळू चालूं लागते.)

**अल्ला**—( स्वगत ) पावलांची चाहूल ! अफ़सोस ! या वेळीं माझ्यावर जर एकदम कवर उत्पन्न होईल तर आतां खात्रीनें वांचेन—

**गजरा**—कुठंच नाहीं ! मेला पळाला कीं काय ? ( अल्लाला पाय लागून अडखळते ) अगबाई, हा तर मेला जिवंत ! कीं नुसता भास ? अल्ला-हलत सुद्धां नाहीं, मी गजरा—

**अल्ला**—(एकदम उठून) कोण ? गजरा ! भले बहाद्दर ! मग इतका वेळ मीं धोतरा खाल्ला होता कीं काय ?

**गजरा**—( स्वगत ) हं भरलीं आतां शंभर ! मेल्या बायकी बुद्धीनं दगा दिला ! आतां आल्या प्रसंगाला तोंड दिलंच पाहिजे.

**अल्ला**—हरामजादी ! तरवारीनं मान कापणार होतीस नाहीं ? बोल, इथें कशी आलीस ?

**गजरा**—जसा तूं तशीच मी !

**अल्ला**—माझ्या जिवावर उठण्याकरतां ?

**गजरा**—आणि मघाशीं तूं शिवाजीच्या जिवावर उठला होतास तेव्हां ?

**अल्ला**—म्हणजे ? सर्वांचा घोंटाळा तूं केलास तर ? तरी म्हटलें या अल्लाचा मनसुबा फसला कसा ? हरामजादी—

**गजरा**—हां—सबूर अल्ला ! मघाशीं तूं कुणाला दुखवलं आहेस ध्यानांत आहे ना ? त्याच्याच बाजूनं वागलास तर तुझं कोटकल्याण होईल; नाहीं तर—

**अल्ला**—जान गमवायचा वख्त आला तरी हरकत नाहीं; पण धन्याचें निमक विसरणार नाहीं !